श्रेष्ठ ख्रिस्ती साहित्य मालिका

तरुणांसाठी विचार

लेखक – जॉन चार्ल्स राइल (१८१६-१९००)

अनुवाद – क्रॉसी उर्टेकर

तरुणांसाठी विचार

अनुक्रमणिका

१. तरुणांस बोध करण्याची कारणे

अ. धर्म असणे.....४

ब. न्यायाचा विसर.....६

क. भवितव्य निश्चित करणे.....८

ड. सैतानाशी मुकाबला.....१०

इ. दु:खापासून बचाव.....११

२. तरुणांना असलेले धोके

अ. गर्व.....१३

ब. चैनीची आवड.....१५

क. अविचारीपणा.....१८

ड. धर्माचा तिरस्कार.....१९

इ. लोकमताचे भय.....२१

३. तरुणांना सर्वसाधारण मसलत

अ. पापाची दुष्टता पाहा.....२३

ब. ख्रिस्ताची थोरवी जाणून घेण्याची खटपट करा.....२५

क. तुमच्या जीवाचे महत्त्व.....२६

ड. देवाची सेवा करणे.....२७

इ. बायबल तुमचा मार्गदर्शक होऊ द्या.....२९

फ. देवाशी मैत्री असणाऱ्यांशी मैत्री जोडा.....३१

४. तरुणांसाठी खास नियम

अ .प्रत्येक पापाशी लढून मुक्त व्हा.....३३

ब. पापाची प्रत्येक संधी टाळा.....३४

क. देवाच्या नेत्रांचा कधीही विसर पडू देऊ नका.....३६

ड. सार्वजनिक कृपेच्या सर्व साधनसंपत्तीचा वापर करा.....३७

इ. प्रार्थना करा.....४०

५. समारोप.....४२

उजळणी व चर्चेसाठी प्रश्नावली.....४५

ABOUT THE CHRISTIAN CLASSIC SERIES

The Classic Series consists of great works from past centuries made accessible to many through reprinting key chapters or the entire books. In each case, the work has proven invaluable to Christians everywhere over centuries.

** indicates a course edition is available through Mount Zion Bible Institute. b - booklet; p – paperback*

				Pages
b	voth	Vanity of Thoughts, The (1665)	Goodwin	32
b	foli	Fountain of Life, The (~1680)	Flavel	20
b	coje	Cabinet of Jewels, A (1670)	Brooks	36
b	caif	Charity and Its Fruits (1738)	Edwards	48
b	hawo	Heaven: A World of Love (1738)	Edwards	40
b	ppfe	Pilgrim's Progress (condensed, 1678) *	Bunyan	48
b	prov	Proverbs (1794-1869)	Bridges	36
b	tfym	Thoughts for Young Men (1865) * (complete)	Ryle	32
b	toda	Treasury of David, The (1885)	Spurgeon	48
b	wtwo	Words to Winners of Souls (1855) * (complete)	Bonar	40
p	aogr	All of Grace (1880) * (complete)	Spurgeon	144
p	aogo	Attributes of God (1930) * (complete)	Pink	112
p	dore	Doctrine of Repentance (1675) (complete)	Watson	84
p	gwoh	God's Way of Holiness (1850) (complete)	Bonar	96
p	gwop	God's Way of Peace (1860) (complete)	Bonar	80
p	hpa1	Holiness, part 1 (1870) * (complete)	Ryle	192
p	hpa2	Holiness, part 2 (1870) * (complete)	Ryle	176
p	hspi	Holy Spirit, The (1935) * (complete)	Pink	192
p	skoc	Saint's Knowledge of Christ's Love (complete)	Bunyan	80
p	sogo	Sovereignty of God, The (1932) * (complete)	Pink	176

We are grateful to Calvary Press (855-222-5827; www.calvarypress.com) for many of the footnotes originally used in their 1993 edition. Calvary Press publishes many useful books from prior centuries.
© Copyright 2006 Chapel Library; Pensacola, Florida. Printed in the USA. All Scripture quotations are from the King James Version unless indicated otherwise. Permission is expressly granted to reproduce this material by any means

1. if it is not charged for beyond a nominal sum for cost of duplication,
2. if this copyright notice and all the text on this page is included.

This edition features summary questions for reflection and discussion; a complete **study guide** is available from Mount Zion Bible Institute at the same address below.

Chapel Library is a faith ministry that relies entirely upon God's faithfulness. We therefore do not solicit donations, but we gratefully receive support from those who freely desire to give. Chapel Library does not necessarily agree with all the doctrinal positions of the authors it publishes.

Worldwide, please contact one of our international distributors listed on our website, or download material directly without charge.

In **North America**, for additional copies of this booklet or other classic Christian materials, please contact

CHAPEL LIBRARY
2603 W. Wright St. • Pensacola, Florida 32505 USA
chapel@mountzion.org • www.ChapelLibrary.org
Phone: (850) 438-6666 • Fax: (850) 438-0227

Translated and Published by **Love Maharashtra** with permission from Chapel Library USA
लव्ह महाराष्ट्र, १७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३, बाबाजान चौक, पुणे – ४११००१. महाराष्ट्र
दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३ **ईमेल:** lovemaharashtra@gmail.com **वेबसाईट:** lovemaharashtra.org

तरुणांसाठी विचार

"तसेच तरुण पुरुषांनी मर्यादशील असावे म्हणून त्यांना बोध कर."

— *तीत २:६*

जेव्हा संत पौल, सेवक म्हणून असलेल्या आपल्या कर्तव्यांविषयी तीताला पत्र लिहितो, तेव्हा वृद्ध स्त्रिया व तरुण स्त्रियांविषयी बोलल्यानंतर तो हा थोडक्यात अर्थपूर्ण सल्ला देतो — "तसेच तरुण पुरुषांनी मर्यादशील असावे म्हणून त्यांना बोध कर." मी प्रेषित पौलाचा हा सल्ला पाळत आहे. तरुण पुरुषांना मोजक्या शब्दांत मित्रत्वाचा बोध करणे हा माझा उद्देश आहे.

मी स्वत: वृद्ध होत आहे, पण माझ्या तारुण्याच्या दिवसांतील काही गोष्टी माझ्या चांगल्या स्मरणात आहेत. तरुण मनुष्याच्या जीवनाला घेरणाऱ्या व सोबत देणाऱ्या गोष्टी म्हणजे सुखे व दु:खे, आशा व भये, मोह व अडचणी, चुकीची पारख व अयोग्य प्रेम, चुका व उत्कट इच्छा यांचे मला अगदी स्पष्ट स्मरण आहे. जर काही तरुणांना योग्य मार्गात राखण्यासारखे — त्यांच्या चुकांपासून व पापापासून सध्या आणि सर्वकाळाकरता त्यांचे भवितव्य राखण्यासारखे काही मी बोलू शकलो तर मी फार आभारी होईन.

मी चार गोष्टी करू इच्छितो:

१. तरुण पुरुषांना का बोध करण्याची आवश्यकता आहे याची काही *कारणमीमांसा* करावी.
२. माझ्या नजरेस आलेल्या काही खास *धोक्यांविषयी* तरुणांना इशारा करावा.
३. काकुळतीची विनंती करून तरुणांना आवश्यक असलेली सर्वसाधारण *मसलत* त्यांना प्राप्त करून द्यावी.
४. तरुण पुरुषांनी कडकपणे पाळावेत असे *आचारसंहितेचे काही नियम* आखून त्यांना द्यावेत.

या चारही मुद्यांवर मला काही बोलायचे आहे, आणि मी प्रार्थना करतो की मी जे सांगेन ते काहींच्या जिवांचे तरी भले करणारे असावे.

१. तरुण पुरुषांस बोध करण्याची कारणे

पहिला मुद्दा असा की, तरुण पुरुषांना खास बोध करण्याची गरज असणारी सर्वसामान्य कारणे कोणती? मी क्रमाने त्यापैकी काही सांगतो.

अ. धर्म असणे

एक गोष्ट अशी की, एक खेदजनक सत्य असे आहे की कोठेही पाहा, फारच थोड्या तरुण पुरुषांना धर्मच असतो. मी कोणी व्यक्ती नजरेसमोर ठेऊन हे विधान करत नाही. मी सर्वसाधारण दिसते त्याविषयी बोलतो. उच्च किंवा कनिष्ठ, गरीब किंवा श्रीमंत, सौम्य किंवा भोळा, सुशिक्षित किंवा निरक्षर, ग्रामीण किंवा शहरी — तो कोणीही असो. पण हे निरीक्षण केल्यावर माझा थरकाप होतो की, अगदी थोडकी मनुष्ये कशी आत्म्याने चालवली जातात, काही थोडकी मनुष्ये कशी जीवनाकडे जाणाऱ्या अरुंद मार्गाने जातात, किती थोडकी मनुष्ये वरील गोष्टींवर लक्ष लावून प्रेम करतात, किती थोडी मनुष्ये वधस्तंभ उचलून घेऊन ख्रिस्ताला अनुसरतात (मत्तय ७:१४;

कलसै ३:२; मत्तय १६:२४). हे मी खेदाने सांगतो, पण देवाच्या समक्षतेत सांगतो. मी अगदी पूर्ण सत्य सांगत आहे.

तरुणांनो, या देशाच्या लोकसंख्येत तुमचा फार महत्त्वाचा मोठा वर्ग आहे, पण कोठे आणि कोणत्या परिस्थितीत आहे तुमचा अविनाशी आत्मा? कोणत्याही प्रकारचे उत्तर येऊ द्या शेवटी अहवाल एकच व समान असणार.

सुवार्तेची सेवा करणाऱ्या *विश्वासू सेवकाला* विचारू या, आणि तो काय म्हणतो, ते लक्षात घेऊ या. किती अविवाहित तरुण लोकांची प्रभुभोजन घेणाऱ्यांमध्ये गणना होऊ शकेल? कृपेच्या साधनांविषयी सर्वात मागास कोण आहेत? (कृपेची साधने — मनुष्याच्या अंत:करणात पवित्रीकरणाचे व तारणाचे कार्य सिध्दीस नेण्यासाठी ज्या साधनांचा वापर करण्यास देव संतुष्ट असतो: वचनाची घोषणा करणे, बायबलवाचन व अभ्यास, गीतगायन, प्रार्थना, बाप्तिस्मा, प्रभुभोजन आणि देवभीरू लोकांशी सहभागिता.) रविवारच्या उपासनेला सर्वात अनियमित कोण आहेत? आठवड्यातील शास्त्राभ्यासवर्ग, प्रार्थनासभांना कोणाला आकर्षून घेणे अधिक अवघड जाते? कोण संदेशांकडे नेहमीच सर्वाधिक दुर्लक्ष करणारे आहेत? आपल्या मंडळीतील कोणत्या वर्गाची त्यांना अधिक चिंता वाटते? कोण रऊबेन आहेत की ज्यांनी खोलवर अंत:करणाची झडती घ्यायला हवी आहे? त्याच्या कळपात असे कोण आहेत की ज्यांना हाताळणे अतिशय कठीण आहे असे त्याला वाटते? कोणाला वारंवार अधिकाधिक इशारे देऊन त्याला त्यांची कानउघडणी करावी लागते? कोण त्याच्यावर अतिशय अस्वस्थ व दु:खी करणारे प्रसंग आणतात? कोणाच्या आत्म्यांची ते आशाहीन वाटल्याने त्याला सतत भीती वाटत असते? खात्रीने समजा की त्याचे नेहमीच उत्तर असेल, *"तरुण मनुष्य."*

कोणत्याही मंडळीच्या *पालकांना* विचारा व सर्वसामान्यपणे ते काय म्हणतात ते पाहा. त्यांच्या कुटुंबात त्यांना सर्वात जास्त दु:ख व त्रास देणारे कोण आहे? कोणासाठी त्यांना अधिक दक्षता घ्यावी लागते आणि बहुधा त्यांना मनस्ताप व निराशा कोण देते? जे योग्य त्यापासून बहकणारे प्रथम कोण असतात आणि धोके व चांगल्या सूचना लक्षात ठेवण्यात अखेरचे कोण असतात? व्यवस्था व मर्यादा राखणे कोणाला जास्त कठीण जाते? उघडपणे पाप कोण करतात, आपल्या नावाला बट्टा कोण लावतात, मित्रांना कोण दुखवतात, आपल्या नात्यातल्या वृद्धांचे मन कोण कटू करतात, आणि पांढऱ्या केसांना दु:खाने कबरेकडे कोण ओढतात? सामान्यत: त्यांचे उत्तर असेल *"तरुण मनुष्य."*

आपण *न्यायाधीश* व *न्यायाधिकाऱ्यांना* विचारू या, आणि त्यांचे उत्तर लक्षात घेऊ या. खाणावळ्या व बिअरच्या दुकानात सर्वाधिक कोणाची वरदळ असते? शब्बाथ मोडणारे सर्वाधिक कोण आहेत? कोण दंगली करण्यास जमावाला उद्युक्त करतो व राजद्रोहाच्या सभा घेतो? दारूबाजी, शांतताभंग, हाणामारी, चोरून शिकार करणे, चोऱ्या, लूटमार, हल्ले, असले काहीतरी करण्यास बहुधा कोण आकर्षिले जाते? तुरुंगे, गुन्हेगारांसाठी असलेली सुधारगृहे, गुन्हेगारवाहू जहाजे कोणत्या लोकांनी भरलेली आहेत? कोणत्या गटावर अविरत पहारा देण्याची व देखरेख ठेवण्याची गरज असते? खात्रीने सांगतो की ते याच लोकांकडे इशारा करतील — ते म्हणतील; *" तरुण मनुष्ये."*

आपण *श्रीमंत वर्गाकडे* वळू या आणि त्यांच्याकडून काय अहवाल येतो, पाहू या. एखाद्या कुटुंबातील पुत्र नेहमी वेळ, आरोग्य, आणि पैसे स्वार्थासाठी व चैनीचा पाठपुरावा करण्यात व्यर्थ घालवतात. दुसऱ्या कुटुंबात मुलगे काहीही व्यवसाय न करता आपल्या जीवनाची वर्षांमागून मोलवान वर्षे काहीही न करता फुकट वाया घालवतात. आणखी दुसऱ्या कुटुंबात, ते नावापुरता एखादा व्यवसाय निवडतात पण त्याबाबत आपली कर्तव्ये पार पाडण्याकडे लक्षही देत नाहीत.

आणखी तिसऱ्या कुटुंबात ते सतत चुकीचे संधान साधतात. जुगार, सट्टा, कर्जबाजारी, कर्जाचा डोंगर, वाईट संगत, सतत काळजीचा ताप असतो. अरेरे पद, हुद्दा, किताब, संपत्ती आणि शिक्षण अशा गोष्टींना प्रतिबंध घालू शकत नाहीत. चिंतातूर बाप, भग्नऱ्हदयी माता आणि खेद करणाऱ्या बहिणी त्यांच्याविषयीच्या कथा सांगत होत्या, व भीषण सत्य समोर येत होते. जग देऊ करील ते सर्व अनेक कुटुंबांकडे होते. त्यातील काहींची नावे त्या संदर्भात उच्चारली जात नाहीत — उच्चारली गेलीच तर खेदाने व शरमेनेच. — काहींचे मुलगे, भाऊ, भाचे किंवा पुतणे — आपापलाच मार्ग धरतात आणि त्यांच्या परिचयातील सर्वांनाच दु:ख देतात.

ज्यांच्या देहात असा काही काटा नाही, आनंदाच्या पानाला डाग लागला नाही, काही चिंता व यातनांच्या उगमातून चालत नाहीत अशी श्रीमंत कुटुंबे क्वचितच आढळतात, आणि बहुधा या सर्वांचे मूळ कारण *"तरुण पुरुषच"* नव्हेत का?

या गोष्टींसंबंधाने आपण काय बोलावे? हे वास्तव आहे. ते वास्तव हेच आहे की : डोळे सताड उघडे ठेऊन आपण ते वास्तव पाहावे, हे वास्तव आपल्या आजूबाजूला सर्वत्र आहे, हे वास्तव आपण नाकारू शकत नाही. किती भयंकर आहे हे! हा विचारच किती भयानक आहे की प्रत्येक वेळी जेव्हा मला एखादा तरुण मनुष्य भेटतो, तो देवाचा बहुधा शत्रू असण्याची शक्यता आहे, नाशाला जाणाऱ्या रुंद मार्गावरून चालणारा तो वाटसरू आहे (मत्तय ७:१३), स्वर्गाला जाण्यासाठी अपात्र आहे! अशी कारणे माझ्या नजरेसमोर असल्यामुळे तुम्हाला बोध करावा असे मला वाटते! म्हणून *तुम्हाला बोध करायची* मला परवानगी द्या.

ब. न्यायाचा विसर

दुसरी एक गोष्ट म्हणजे इतर सर्वांप्रमाणेच तरुण पुरुषांसमोरही मरण व न्याय ही ठेवली आहेत, आणि त्या सर्वांना त्याचा विसर पडलेला दिसतो. तरुण पुरुषांनो, तुम्ही एकदा मरणार हे नेमून ठेवले आहे (इब्री ९:२७); आता तुम्ही कितीही निरोगी असलात तरी कदाचित मरणाचा दिवस जवळच असेल. मी तरुण पुरुषही वृद्धांप्रमाणेच रुग्ण असल्याचे पाहातो. मी तरुणांची तसेच वृद्धांचीही प्रेतक्रिया करतो. मी प्रत्येक कबरस्तानातील शिलालेखांवरील नावांमध्ये तुमच्यापेक्षा लहान असलेल्यांचीही नावे वाचतो. मृतांच्या नोंदवहीवरून माझ्या लक्षात आले की बालके व वृद्ध लोक सोडल्यास १३-२० वयोगटातील मृतांचा आकडा इतर वयोगटांपेक्षा मोठा आहे. तरीही तुम्ही अशा अविर्भावात जीवन जगत असता की जणू तुम्हाला कधी मरणच येणार नाही.

तुम्ही अशा विचारात आहात का, की *उद्या* तुम्ही यावर विचार कराल? तर मग शलमोन राजाचे बोल लक्षात घ्या: "*उद्याची* खात्री मानू नको, कारण एका दिवसात काय होईल हे तुला कळत नाही" (नीतिसूत्रे २७:१). प्राचीन ग्रीसमधील थेबेस नगराच्या थेबानी रहिवाशाने आर्खियासला म्हटले आहे, "गंभीर गोष्टी *उद्यासाठी*." (आत्मचरित्र लिहिणारा प्लुटार्क सैन्यातील अर्खियास या विदेशी जनरलची गोष्ट लिहिताना सांगतो की, पिलोपिदास त्याला दुसऱ्या दिवशी ठार करणार असल्याचे पत्र त्याला पाठवले होते. पण त्याला धोका देणारे पत्र वाचण्याचे त्याने *उद्यावर* ढकलले तेव्हा त्याने हे उद्गार काढले.) त्याला येणाऱ्या धोक्याचा पूर्वइशारा मिळाला होता, पण त्याचा *उद्या* आलाच नाही. *उद्याचा* दिवस सैतानाचा आहे, पण आजचा दिवस देवाचा आहे. तुमच्या इच्छा किती आत्मिक आहेत आणि तुमचे निश्चय किती पवित्र आहेत याची सैतानाला काही पर्वा नसते, फक्त त्या *उद्यासाठी* आयोजित केल्या आहेत का एवढेच त्याला पुरे असते. याबाबत सैतानाला तुम्ही अजिबात जागाच देऊ नका. त्याला म्हणा, "अरे सैताना, नाही, नाही, हे सर्व आजच करायचे ठरवले आहे. "सर्व मनुष्ये काही इसहाक, याकोब अशा पूर्वजांप्रमाणे जगणार नाहीत. पुष्कळ मुले आपल्या बापापूर्वीच मरण पावतात. दाविदाला आपल्या दोन पुत्रांसाठी शोक करावा लागला होता; तर ईयोबाने आपली दहा मुले एकाच दिवशी गमावली.

तुम्ही या दोहोंपैकी एका वर्गात असाल; आणि जेव्हा मृत्यूचे बोलावणे येईल तेव्हा *उद्याविषयी* बोलणे व्यर्थ ठरेल — तुम्हाला लागलीच जावे लागेल.

तुम्ही या सर्व गोष्टींवर थोड्याच वेळात आपल्या *सोयीच्या वेळी* विचार करू अशा विचारात आहात का? पौलाने ज्यांना उपदेश केला, तो फेलिक्स व अथैनेकर असाच विचार करत होते (प्रे. कृ. २४:१०-२२; १७:२२), पण ती वेळ आलीच नाही. नरकाची वाट अशा मोहांनी अच्छादलेली आहे. करता येते तेव्हाच खात्रीपूर्वक काम करा. जे सार्वकालिक आहे, ते सर्व हातावेगळे केल्याशिवाय राहू नका. तुमचा जीव धोक्यात असताना मुळीच कसली जोखीम पत्करू नका. माझ्यावर विश्वास ठेवा, जिवाचे तारण होणे ही काही साधीसुधी गोष्ट नाही. तुम्ही तरुण असा की वृद्ध, सर्वांनाच महान तारणाची गरज आहे. सर्वांचा नवीन जन्म झालाच पाहिजे; सर्वांनी ख्रिस्ताच्या रक्तात धुतले जाणे आवश्यक आहे; सर्वांचे पवित्र आत्म्याद्वारे पवित्रीकरण होण्याची गरज आहे (योहान ३:३; प्रकटी १:५; १पेत्र १:२). जो मनुष्य या गोष्टी अनिश्चित ठेवत नाही तो आनंदित होय. पण त्याच्या अंतर्यामाला पवित्र आत्मा जोवर साक्ष देत नाही की तो देवाचे मूल आहे, तोवर तो स्वस्थ राहत नाही.

तरुण मनुष्यांनो, तुमचे आयुष्य खूप अल्प आहे. तुमच्या आयुष्याची मर्यादा केवळ वीतभर आहे — सावलीसारखे, वाफेसारखे, लवकरच कथाकथनासाठी इतिहासजमा होईल असे आहे. तुमची शरीरे पितळेची नाहीत. यशया म्हणतो, "तरुण थकतात, भागतात, भरज्वानीतले ठेचा खातात" (यशया ४०:३०). एका क्षणात तुमचे आरोग्य तुमच्यापासून हिरावले जाईल: त्याला फक्त निमित्त लागते. ताप, सूज, एखादी नस तुटणे एवढे कारणही पुरे झाले — आणि लवकरच किडे तुम्हाला कुरतडून त्यावर जगू लागतील. तुमच्यापैकी कोणातही व मृत्यूमध्ये फक्त एका पावलाचे अंतर आहे. आज रात्री तुमचा जीव मागितला जाऊ शकतो (लूक १२:२०). लवकरच तुम्ही या जगाच्या रहाटीप्रमाणे निघाले आहात; आणि लवकरच तुम्ही निघून जाल. तुमचे जीवन अगदी अनिश्चित आहे; तुमचे मरण व न्याय ही पूर्णपणे खात्रीची आहेत. तुम्ही सुध्दा आद्य दिव्यदूताच्या तुतारीचा नाद ऐकणार आहात व मोठ्या पांढऱ्या सिंहासनासमोर उभे राण्यास सामोरे जाणार आहात (प्रकटी २०:११). तुम्हीही त्या हाकेचे पालन करणार आहात. इ.स. ३४५-४२० दरम्यान जेरोम नावाचा बायबलचा भाषांतरकार व मठवासी वादाचे समर्थन करणारा होऊन गेला. तो म्हणत असे की त्याच्या कानी सतत खुद्द न्यायाधीश वापरतात ती भाषा कानात घुमत असे की, "अहो मृतांनो उठा, आणि न्यायासाठी हजर व्हा." "पाहा मी लवकर येतो" (प्रकटी २२:७). म्हणून मी तुम्हाला एकटे सोडण्याचे धाडस करणार नाही आणि तसे करू शकतही नाही.

अहो, तुम्ही सर्व उपदेशकाच्या पुढील शब्दांवर मनापासून गांभीऱ्याने विचार करा: "हे तरुणा, आपल्या तारुण्यात आनंद कर; तुझ्या तारुण्याच्या दिवसात तुझे ऱ्हदय तुला उल्लास देवो; तू मनास वाटेल त्या मार्गाने व नजरेस येईल तसा चाल; पण या सर्वांबद्दल देव तुझा झाडा घेईल हे तुझ्या लक्षात असू दे" (उपदेशक ११:९). असे भवितव्य असताना कोणीही मनुष्य निष्काळजी व बेफिकीर राहील हे अविश्वसनीय व नवलाचे वाटते. नक्कीच असा वेडेपणा कोणी करणार नाही की मरणाची तयारी न करता तो समाधानाने आयुष्य कंठील. हे खरे आहे की, मनुष्यांचा अविश्वास ही जगातील अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे.बायबलमध्ये अगदी सुस्पष्ट भाकिताचे सुरुवातीचे शब्द आहेत, "आम्ही ऐकलेल्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आहे?" (यशया ५३:१). प्रभू येशूने म्हटले, "मनुष्याचा पुत्र येईल तेव्हा त्याला पृथ्वीवर विश्वास सापडेल काय?" (लूक १८:८). तरुण पुरुषांनो, वरील कोर्ट दरबारी तुमच्यापैकी अनेकांविषयी हाच अहवाल असेल अशी मला भीती वाटते. "ते विश्वास ठेवणार नाहीत," मला भीती वाटते की तुम्ही

जगाबाहेर गेल्यावर जागृत व्हाल व घाई कराल पण मरण व न्याय हे वास्तव आहेत हे समजायला तुम्हाला उशीर झाला असेल.

या सर्व गोष्टींची मला भीती वाटते, म्हणून *मी तुम्हाला बोध करतो*.

क. भवितव्य निश्चित करणे

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तरुण मनुष्ये पुढे काय होतील, याविषयीच्या सर्व शक्यता, ते आता कसे आहेत यावर अवलंबून आहेत आणि ते ही गोष्ट विसरलेले दिसतात. संपूर्ण आयुष्याचे बीज तयार होण्याचा समय तारुण्य होय. मानवी जीवनाच्या जडण घडणीचा हा अल्पसा काळ असतो, मनुष्याच्या मनाला कलाटणी मिळण्याचा तो ऐतिहासिक क्षण असतो. अंकुरावरून आपण झाडाची पारख करतो. बहरण्यावरून आपण फळाची पारख करतो. वसंत ऋतूवरून आपण कापणीची पारख करतो. सकाळ पाहून आपण दिवसाची पारख करतो. आणि तरुण मनुष्याच्या चारित्र्यावरून बहुधा तो मोठा झाल्यावर काय होईल याची सर्वसाधारण पारख करतो.

तरुण मनुष्या, फसू नकोस. तारुण्याच्या आरंभीच आपल्या इच्छेप्रमाणे सर्व वासना व चैनींचे लाड आपण पुरवू शकतो आणि आयुष्याच्या अखेरच्या काळात सहजतेने प्रभूची सेवा करायला निघू शकतो असा विचार करू नकोस. एसावासारखे आपण जगू शकतो आणि याकोबाप्रमाणे मरू शकतो असे समजू नकोस. या प्रकारे देवाशी व तुझ्या आत्म्याशी दोन हात करणे थट्टा आहे. आपली बहरात असलेली ताकद आपण जगाला व सैतानाला देऊ शकतो, असे समजणे व मग तुमच्या ताकदीचे नाश पावलेले अवशेष, नको असलेले सारे सटरफटर, तुमच्या अंत:करणातील उरले सुरलेले खरकटे घेऊन राजांच्या राजासमोर येणे म्हणजे ही एक क्रूर थट्टा आहे. अगदी भयानक चेष्टा आहे, आणि तेव्हा तुम्हाला तुमचे मोल देऊन समजेल की काहीही साध्य होऊ शकत नाही.

मी हे म्हणण्याचे धाडस करतो की *उशीरा पश्चात्ताप* करणाऱ्यांमध्ये तुमची गणना होत आहे. तुम्ही काय करत आहात हे तुम्हाला समजत नाही: देवहीनांमध्ये तुमची गणना होत आहे. पश्चात्ताप व विश्वास ही देवापासून प्राप्त होणारी दाने आहेत. देवाने ती दाने देऊ केली असता ती दाने घ्यायला व्यर्थ विलंब लावला तर बहुधा तो ती आवरून घरतो. मी तुम्हाला खात्री देतो की खरा पश्चात्ताप कधी विलंब लावत नाही, तरी त्याच वेळी मी तुम्हाला इशारा देतो की उशीराने केलेला पश्चात्ताप बहुधा खरा नसतो. मी आठवण करून देतो की एक पश्चात्तप्त चोर अखेरच्या घटकेला तारण पावला, यासाठी की कोणी निराश होऊ नये. पण मी इशारा देतो की तेव्हा तो एकटाच तसा तारण पावला, म्हणून कोणी हे गृहीत धरून चालू नये. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की, येशू "त्याच्याद्वारे देवाजवळ जाणाऱ्यांस पूर्णपणे तारण्यास समर्थ आहे" (इब्री ७:२५). पण मला इशारा देऊ द्या की त्याच आत्म्याने असेही लिहिले आहे की, "मी हाक मारली पण तुम्ही आला नाही; मी आपला हात पुढे केला पण कोणी लक्ष दिले नाही; यास्तव तुमच्या विपत्काली मीही हसेन; तुमच्यावर संकट आले असता मी थट्टा करीन" (नीति १:२४,२६).

माझ्यावर विश्वास ठेवा, तुमच्या इच्छेस येईल तेव्हा देवाकडे वळणे हे इतके सोपे नाही हे तुमच्या लक्षात येईल. स्कॉटलंडमध्ये पवित्र व नम्र जीवनासाठी प्रसिद्ध असलेले ग्लास्कोचे उत्तम आर्चबिशप रॉबर्ट लायटन (१६११-१६८४) यांचे प्रसिध्द, सत्य बोल आहेत की, "पापाचा मार्ग उतरणीचा आहे; मनुष्य हवे तेव्हा थांबू शकत नाही." पवित्र इच्छा व गंभीर खात्री त्या शताधिपतीच्या चाकरांसारखी नसते (मत्तय ८:५), तुमच्या इच्छेला हवे त्याप्रमाणे ती हाकेला ये-जा करू शकत नाहीत, तर उलट ती ईयोबातील गव्याप्रमाणे असते (ईयोब ३९:९): ते तुमचा हुकूम मानणार नाहीत, तुमच्या आज्ञेला हजर होणार नाहीत. प्राचीन काळच्या प्रसिद्ध सेनापती हन्नीबाल (ख्रि. पू. २४७ – ख्रि. पू. १८३) विषयी म्हणत असत की जेव्हा त्याने रोमविरुद्ध

लढाई केली, तेव्हा तो ते हस्तगत *करू शकला असता*, पण त्याने तेव्हा ते काबीज केले नाही. कालांतराने त्याला ते काबीज करावेसे वाटले, पण तेव्हा ते तो काबीज *करू शकला नाही*. सावध राहा; सार्वकालिक जीवनासंदर्भात तुमच्या जीवनात असेच न घडो.

हे सर्व मी का सांगत आहे? *सवयींचा जबरदस्त प्रभाव* पडतो म्हणून मी हे सांगत आहे. मी यासाठी सांगत आहे की अनुभव मला सांगतो की लोकांच्या अंत:करणाचे तरुणपणी परिवर्तन झाले नाही तर ती क्वचितच पुढे बदलतात. खरोखर पुरुष वयस्कर झाल्यावर क्वचितच परिवर्तन पावतात. सवयीची पाळेमुळे फार खोल असतात. पापाला एकदा का तुमच्या उरात शिरकाव करायला मिळाला की तुमच्या हाकेला ते तेथून मागे फिरणार नाही. रहाटी हा दुसरा स्वभावच बनतो, आणि त्यांची मालिका तीनपदरी दोरीसारखी अतूट असते. संदेष्टा योग्यच बोलतो की, "कूशीला आपली कातडी, चित्त्याला आपले ठिपके पालटता येतील काय? असे घडेल तरच दुष्टतेला सवकलेल्या तुम्हास चांगले आचरण करता येईल" (यिर्मया १३:२३). सवयी ह्या डोंगरावरून घरंगळत येणाऱ्या दगडांसारख्या आहेत: जितके ते घरंगळत पुढे जातात, तितका त्यांचा वेग वाढतो आणि त्यांचा मार्ग हाताबाहेर जातो. वर्षांमागून वर्षे जात असता बळकट होणाऱ्या वृक्षाप्रमाणे सवयी असतात. ओक वृक्षाचे रोप लहान मूलही वाकवील पण तो पूर्ण वाढून वृक्ष झाल्यावर शंभर मनुष्यांनी बळ लावले तरी तो ते उपटू शकणार नाहीत. थेम्स नदीच्या उगमापाशी लहान मूलही तिच्या झऱ्यातून चालू शकेल; पण समुद्राच्या मुखाशी ती पोहंचते तेव्हा जगातील प्रचंड जहाजे तिच्या पाण्यावर तरंगतात. असेच सवयींचे असते: जितक्या सवयी जुनाट तितक्या त्या बळकट — जितक्या अधिक काळ त्यांचा अंगिकार कराल तितक्या त्या सोडून देणे अवघड होईल. आपल्या वयाबरोबर त्या वाढत राहतात, आणि आपल्या शक्तीसोबत त्या शक्तिमान होत राहातात. चाल ही पापाची परिचारिका आहे. पापाचे प्रत्येक नवीन कृत्य भय कमी करते व विसावते, आपले अंत:करण कठीण करते, आपल्या विवेकभावाच्या कडा बोथट करते आणि आपला अधर्माकडचा कल वृद्धिंगत करते.

तरुण मनुष्यांनो, तुम्ही कल्पना कराल की मी या मुद्द्यावरून तुमचा ताणतणाव फार बोजड करत आहे. जर माझ्याप्रमाणेच तुम्ही वृद्धांकडे पाहिले, ज्यांचा एक पाय कबरेत आणि एक पाय बाहेर असलेले, भावनाशून्य, शुष्क, निष्ठुर, मृत, गोठलेले, जात्याच्या तळीसारखे कठीण (जात्याची एक तळी जमीनीत पुरलेली असते. त्यावर दुसरी तळी फिरेल अशी बसवतात. दोहोंच्या मध्ये धान्य रगडले जाते. खालची तळी वरच्या तळीचा भार पेलेल अशी कणखर असावी लागते) असलेले तुम्हाला ते दिसले — तर तुम्ही अशी कल्पना करणार नाही. माझ्यावर विश्वास ठेवा, तुमच्या जिवाविषयी तुम्ही स्तब्ध राहून चालणार नाही. बऱ्या वाईट सवयी रोज तुमच्या अंत:करणात दृढ होत असतात. रोज तुम्ही देवाच्या अधिक जवळ येत असता किंवा दूर जात असता. दरवर्षी तुम्ही पश्चातप्त न होणे चालूच ठेवत असाल तर तुम्ही व स्वर्ग यामधील भिंत अधिकच उंच व जाड बनत जात राहाते आणि ओलांडाव्या लागणाऱ्या खंदकाची लांबी रुंदी वाढत जाते. अरे बापरे! सतत पापात रेंगाळत राहण्याचे परिणाम किती पाषाणासारखे कठीण करणारे व भयानक आहेत! आताचाच समय स्वीकारण्यास योग्य आहे. तुमच्या आयुष्याच्या हिवाळ्याच्या दिवसात तुमचे पलायन होऊ नये म्हणून सांभाळा. तारुण्यातच तुम्ही प्रभूला प्राप्त करण्याची खटपट केली नाही, तर सवयीची ताकद अशी आहे की कदाचित तुम्ही त्याला कदापि प्राप्त करणार नाही. याचीच मला भीती वाटते, म्हणून मी तुम्हाला *बोध करीत आहे*.

ड. सैतानाशी मुकाबला

महत्त्वाची गोष्ट अशी की, तरुण पुरुषांच्या जीवाचा नाश करण्याची सैतान विशेष उत्कंठा बाळगतो, आणि त्यांना त्याची कल्पनाही नसल्याचे दिसते. सैतानाला चांगले ठाऊक आहे की

तुम्ही पुढची पिढी होणार, मग तुम्हाला आपलेसे करता यावे म्हणून वेळेपूर्वीच तो प्रत्येक कौशल्य कामाला लावतो. त्याच्या या कपटी युक्तीविषयी मी तुम्हाला अज्ञान ठेऊ इच्छित नाही.

तुमचा वर्ग असा आहे की तुमच्याशी तो त्याच्या निवडक मोहांचा वापर करून खेळ खेळतो. तुमची अंत:करणे त्याच्या जाळ्यात अडकवण्यासाठी दक्षतेने व काळजीपूर्वक तो जाळे टाकतो. त्याच्या सामर्थ्याखाली आणण्यासाठी गळाला तो गोड घास आमिष म्हणून लावतो. त्याचे अत्यंत निंद्य पण साखरी विष खावे म्हणून तुम्ही ते विकत घेण्यासाठी खोटेपणाने तुमच्या देखत त्याचा माल सादर करतो. तुम्ही त्याच्यासाठी हल्ल्याचे उत्तम सावज आहात. प्रभूच त्याला धमकावो, आणि त्याच्या हातून तुमची सुटका करो.

तरुणांनो, त्याच्या पाशात ओढले जाऊ नये म्हणून सावधगिरी बाळगा. तुमच्या डोळ्यांत तो धूळ फेकील आणि कोणत्याही गोष्टीचे खरे रंग ओळखण्यापासून तुम्हाला प्रतिबंध करील. वाईट तेच तुम्हाला उत्तम व उत्तम तेच वाईट भासवील (यशया ५:२०). तुम्ही पापाच्या प्रेमात पडावे म्हणून तो पापाला रंगवून, आकर्षक बनवून तो पाप पांघरून येईल (२ करिंथ ११:१५). खऱ्या धर्माविषयी तुम्हाला नावड निर्माण व्हावी म्हणून त्याचे बेरूप व अयोग्य प्रकारचे व्यंगचित्र तो तुमच्यापुढे सादर करील. दुष्टाईत सुख असल्याचे उंचावून दाखवील, पण त्याचा चावा तुमच्यापासून लपवून ठेवील. तुमच्या नेत्रांसमोर वधस्तंभ व त्याच्या यातना तो उंचावून दाखवील, पण सार्वकालिक मुकुट तुमच्या नजरेआड ठेवील. केवळ तुम्ही त्याची सेवा केली तर ख्रिस्ताला अभिवचन दिले तसे तुम्हालाही सारे काही देण्याचे तो अभिवचन देईल (मत्तय ४:८). तुम्ही फक्त सामर्थ्याकडे दुर्लक्ष केले तर तो तुम्हाला धर्माचे केवळ रूप धारण करायला मदत करील (२ तीमथ्य ३:५). तुमच्या जीवनाच्या प्रारंभीच तो तुम्हाला सांगेल की देवाच्या सेवेला लागण्याची ही वेळ फार लवकरची झाली; ती जीवनाच्या अखेरीस कर असे सांगेल; पण तेव्हा *फार उशीर* झाल्याचे तुमच्या लक्षात येईल. अहो, फसू नका!

या शत्रुपासून कसा धोका आहे हे तुम्ही फार कमी जाणता, या तुमच्या अज्ञानाचीच मला भीती वाटते. तुम्ही खड्ड्याखुड्ड्यातून चालणाऱ्या अंध मनुष्यासारखे आहात: तुमच्या सर्व बाजूंनी संकटे कशी आ वासून बसली आहेत हे तुम्हाला दिसत नाही (लूक ६: ३९).

तुमचा शत्रू फार *समर्थ* आहे. त्याला "या जगाचा अधिपती" म्हटले आहे (योहान १४:३०). येशूला त्याच्या संपूर्ण सेवाकाळात त्याने विरोधच केला. आदाम हवेला त्याने मना केलेले फळ खाण्यास मोह घातला, व या प्रकारे जगात पाप व मरण ही आणली (उत्पत्ती ३). देवाला प्रिय असलेला देवाचा माणूस दावीद, यालाही त्याने मोहात पाडले व त्याच्या आयुष्याचे अखेरचे दिवस त्याला पूर्ण दु:खात घालवणे भाग पाडले (२ शमुवेल ११:२). त्याने निवडलेला प्रेषित पेत्र, यालाही भुरळ घातली आणि त्याच्या प्रभूला धिक्कारायला त्याला भाग पाडले (मत्तय २६:६९). खरेच त्याच्या शत्रुत्वाचा तिरस्कार नको का वाटायला? तुमचा शत्रू अस्वस्थ आहे. तो कधी झोपत नाही. तो गरजणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरत असतो (१ पेत्र ५:८). भूतलावर तो सतत इकडून तिकडे ये जा करत असतो (ईयोब १:७). तुमच्या जिवाविषयी तुम्ही निष्काळजी असाल, पण तो नाही. त्यांना तो स्वत:सारखेच दु:खी दरिद्री करू इच्छितो व शक्य झाल्यास आपले करू पाहातो. खरोखर त्याच्या शत्रुत्वाचा तिरस्कार नको का वाटायला?

तुमचा शत्रु *चतुर* आहे. सुमारे सहा हजार वर्षे तो एकच पुस्तक वाचत आहे, ते पुस्तक म्हणजे मानवाचे ऱ्हदय. त्याला ते चांगलेच समजून घ्यायचे आहे, आणि ते त्याला समजते: त्याची सर्व दुर्बलता, त्याची सारी फसवेगिरी, त्याच्या सर्व चुका. आणि त्याच्या जवळ अशा मोहपाशांचा साठा आहे की बहुधा ते उपद्रवच देतील. तो तुम्हाला सापडणार नाही अशी जागाच नाही.

शहरात जा: तो तेथे असेल. अरण्यात जा: तो तेथेही असेल. दारुबाजी व चैन करणाऱ्यांसोबत बसा, तो तेथे तुम्हाला मदत करायला हजर असेल. उपदेश ऐका, तो तुमचे लक्ष विचलित करायला तेथे असेल. खरेच अशा शत्रुचा तिरस्कार वाटायला नको का?

तरुण मनुष्यांनो, तुम्ही फारसा विचार करत नसाल, पण हा शत्रू तुमच्या विनाशासाठी परिश्रम करत आहे. बक्षीस म्हणून तुम्हाला प्राप्त करण्यासाठी तो खास झगडत आहे. त्याला पुढे तुम्ही तुमच्या काळासाठी शाप होणार की आशीर्वाद होणार हे त्याला दिसते. तो तुमच्या अंत:करणात अडथळे आणून त्यांचा लवकर परिणाम घडवून आणू इच्छितो यासाठी की तुम्ही त्याचे राज्य कालांतराने वाढवत न्यायला मदत करावी. त्याला चांगलेच समजते की कळी उमलण्यापूर्वीच खराब करणे हा फुलाला कलंकित करण्याचा खात्रीचा मार्ग आहे. दोथानातील अलिशाच्या चाकराच्या नेत्रांप्रमाणे तुमचे नेत्र उघडले तर किती बरे होईल (२ राजे ६:१३-१७)! तुमचे नेत्र उघडे आहेत, तरी पण पाहा, सैतान तुमची शांती हरण करायला कशा योजना आखत आहे!
तुम्ही ऐका किंवा ऐकू नका. मी तुम्हाला एकटे सोडायचे धाडस करू शकत नाही आणि करणारही नाही. मी तुम्हाला इशारा दिलाच पाहिजे; मी तुम्हाला *बोध केलाच पाहिजे.*

इ. दु:खापासून बचाव

महत्त्वाची गोष्ट म्हणजे तरुणांना बोध करणे यासाठी गरजेचे आहे की, त्यामुळे दु:खापासून त्यांचा बचाव होईल, व आताच ते प्रभूच्या सेवेला लागतील. पाप ही सर्व दु:खांची आई आहे, व तारुण्यातील पापे दुसऱ्या कोणत्याही पापांपेक्षा अधिक दु:ख व यातना देतात असे आढळून येते. वृद्ध मनुष्याने मूर्खपणाची केलेली कृत्ये, त्याने वाया घालवलेला वेळ, त्याने केलेल्या चुका, त्याने धरलेली वाईट संगत, त्याने आपले शरीर व जीव या दोहोंना केलेली इजा, आनंदाच्या चालून आलेल्या संधी त्याने झुगारल्या, उपयुक्त ठरण्यास उघडलेल्या दारांकडे त्याने दुर्लक्ष केले — या सर्व गोष्टी बहुधा त्याचा विवेकभाव कटु करतात, त्याच्या जीवनाच्या संध्याकालावर खिन्नता आणतात, आणि आपल्या आयुष्याच्या अखेरच्या घटका तो शरमेने स्वत:ला दूषण देण्यात घालवतो.

काही मनुष्ये तुम्हाला सांगतील की तारुण्यातील पापामुळे त्यांनी अकाली आपले *आरोग्य कसे गमावले*. यातनादायी आजार त्यांच्या अवयवांना वेदना देतात, आणि त्यांचे जीवन कंटाळवाणे होते. त्यांच्या स्नायुंची ताकत त्यांनी इतकी वाया घालवलेली असते की टोळाचे वजनही त्यांना भारी वाटू लागते. त्यांची नजर अकाली अंधूक होते आणि त्यांचा स्वाभाविक जोमही कमी झालेला असतो. त्यांच्या दिवसाच्या प्रहरीच त्यांच्या आरोग्याचा सूर्य मावळलेला असतो; आणि आपला देह व मांस क्षीण होत असलेले पाहून ते शोक करतात. माझ्यावर विश्वास ठेवा, हा प्याला प्यायला फार कटू आहे

दुसरे काही लोक तुम्हाला *आळशीपणाच्या परिणामांचे* खेदजनक अहवाल देतील. त्यांनी शिकण्याची सुवर्णसंधी झुगारून दिली. जेव्हा त्यांची बुद्धी ग्रहण करायला सक्षम होती आणि त्यांची स्मरणशक्ती जतन करू शकण्यास अगदी सज्ज होती अशा समयी त्यांनी ज्ञानार्जन केले नाही. आणि आता फार उशीर झाला आहे. आता बसून अभ्यास करायला त्यांना फुरसतच नाही. आता त्याना फुरसत असली तरी तेव्हासारखी शक्ती नाही. गेलेली वेळ परत येत नाही. हा देखील प्याला प्यायला कठीण आहे!

इतर लोक त्यांनी *निर्णय घेताना केलेल्या गंभीर चुकांबद्दल* तुम्हाला सांगतील, ज्याचे परिणाम त्यांना आयुष्यभर भोगावे लागले आहेत. ते स्वत:ला हवे तेच करत असत. सल्ला घेत नसत. त्यांनी असे संबंध जोडले की ज्यांनी त्यांचा आनंद हिरावून घेतला. त्यांनी असा व्यवसाय

निवडला की जो त्यांच्यासाठी मुळीच योग्य नव्हता. आता ते त्यांना दिसते, पण आता चूक दुरुस्त करण्यापलीकडे असताना त्यांचे डोळे उघडले आहेत. हा प्याला सुद्धा प्यायला कडू आहे.

तरुण पुरुषांनो, *तारुण्यातील पापांच्या* लांबच लांब यादीने तुमचा विवेकभाव भारलेला नसला तर तुम्हाला किती आरामदायी वाटेल हे अनुभवाने तुम्हाला समजावे असे मला वाटते. त्यांचे व्रण फार खोलवर रुतलेले असतात. ह्या पापांचे बाण मनुष्याचा आत्माच घोटतात. त्याच्या टोकाचे लोह मनुष्याच्या जिवात प्रवेश करते. स्वत:शी दयेने वर्ता. प्रभूला लवकर प्राप्त करा, म्हणजे कितीतरी कटू अश्रू तुम्ही टाळू शकाल.

हे सत्य ईयोबाला जाणवलेले दिसते. तो म्हणतो, "तू माझ्या नावावर कठीण शिक्षा लिहितोस; माझ्या तारुण्यातील पातकांचे फळ मला भोगावयास लावतोस" (ईयोब १३:२६). त्याचा मित्र सोफर, दुर्जनांविषयी बोलताना म्हणतो. "त्याच्या हाडांत तारुण्याचा जोम भरला आहे; पण तो त्याच्याबरोबर मातीस मिळेल" (ईयोब २०:११).

दाविदालाही हे सत्य जाणवले. तो प्रभूला म्हणतो, "माझ्या तारुण्यातली पातके व माझे अपराध आठवू नको" (स्तोत्र २५:७).

१५१९-१६०५ मधला स्विस धर्मसुधारक थिओडर बेझा (तो फ्रेंच प्रॉटेस्टंट असून ईश्वरविज्ञानाचा विद्वान होता. धर्मजागृतीच्या आरंभीच्या काळात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती) याला हे सत्य इतक्या प्रकर्षाने जाणवले की त्याने आपल्याला १६ व्या वर्षी देवाच्या कृपेने या जगातून पाचारण करण्यात आले ही 'खास दया' झाल्याची आपल्या मृत्युपत्रात नोंद करून ठेवली.

जा, आणि विश्वासी जनांना विचारा. मला वाटते कित्येक तुम्हाला अशाच प्रकारची साक्ष देतील, "अरेरे माझे तारुण्यातले दिवस मला पुन्हा जगता आले तर काय बहार होईल!" तो कदाचित म्हणेल. "वाहवा! माझ्या आयुष्याचे सुरुवातीचे दिवस मी उत्तम प्रकारे घालवले! बरे झाले मी वाईट सवयींचा पाया माझ्या मार्गात माझ्या वसंताच्या काळात भक्कम प्रकारे घातला नाही.

तरुण मनुष्यांनो, शक्यतो तुमच्या या सर्व दुखण्यांपासून मला तुमचा बचाव करायचा आहे. नरक हे सत्य फार उशीरा समजते. वेळेवर सुज्ञ बना. तारुण्यात जे पेराल, त्याचीच वृद्धापकाळी कापणी कराल. जे तुमच्या अखेरच्या काळी तुम्हाला आराम देणार नाही अशा गोष्टींसाठी तुमच्या आयुष्याचा मोलवान मोसम वापरू नका. तर स्वत:ची नीतिमत्वात पेरणी करा (म्हणजे देवाशी योग्य संबंध प्रस्थापित करा: सरळ मार्गाने चाला, नैतिक शुद्धता व सद्गुण जोपासा); पडिक जमीन लागवडीसाठी तयार करा, काटेरीत पेरणी करू नका (यिर्मया ४:३; होशेय १०:१२).

आता पाप हलकेच तुमच्या हातातून सुटून जाईल किंवा तुमच्या जिभेवरून सहजगत्या बाहेर पडेल; पण हे ठाम समजा की, कालपरत्वे तुम्ही व पाप पुन्हा पुन्हा भेटतच राहाल. तरीही तुम्हाला त्याविषयी नावडच राहील. जुन्या जखमा वारंवार दुखतात आणि बऱ्या झाल्यानंतरही बऱ्याच कालावधीनंतरही वेदना देतात; त्यांचे व्रण तसेच राहतात — पापाचेही तसेच आहे असे तुम्हाला आढळून येईल. प्राण्यांच्या पायांचे ठसे एके काळी ओली वाळू असलेल्या खडकांच्या पृष्ठभागांवर सापडतात, ते ठसे मागे ठेऊन गेलेले प्राणी तर हजारो वर्षांपूर्वीच मरून गेलेले असतात — तशीच तुमच्या पातकांची गत असते.

एक म्हण आहे की, "अनुभव ही फार प्रिय शाळा वाटते. पण मूर्खांशिवाय त्या शाळेत कोण शिकत नाही." त्या शाळेत शिकल्यामुळे येणारे दु:ख तुम्ही टाळावे असे मला वाटते. तारुण्यातील पापांमुळे खात्रीने ओढवणारे दारिद्र्य तुम्ही टाळावे असे मला वाटते. तुम्हाला *बोध करण्याचे* अखेर हेच कारण आहे.

२. तरुणांना असलेले धोके

तरुणांना काही खास धोके आहेत, त्यासंदर्भात त्यांना इशारा देणे गरजेचे आहे. मी हे जाणून आहे की तसे सर्वच भयानक संकटात आहेत. मग तुम्ही वृद्ध असा की तरुण असा; सर्वांना शर्यतीत धावायचे आहे, लढाई लढायची आहे, मन दुखावले जायचे आहे, जगावर मात करायची आहे, शरीर नियंत्रणाखाली ठेवायचे आहे, सैतानाला प्रतिकार करायचा आहे — आणि आपण असेही कदाचित म्हणू की एवढे सर्व करायला कोण पुरेसा आहे? पण तरीही प्रत्येक वयोगटाला व परिस्थितीला आपापल्या स्तरावरील खास मोहपाश असतात, आणि त्यांची माहिती असणे उत्तम आहे. ज्याला पूर्वसूचना असते तो पूर्वतयारीने सज्ज असतो. मी यादी देत असलेल्या धोक्यांपासून तुम्हाला स्वत:चे रक्षण करण्याबाबत मी तुमचे मन वळवू शकलो, तर मला खात्री आहे की मी तुमच्या जिवाला उत्तम सेवा देऊ शकलो असे होईल.

अ. गर्व

तुमच्या तारुण्यातील एक धोका म्हणजे गर्व. गर्व हे जगातील सर्वात जुनाट पाप आहे; खरे तर ते जगापूर्वीचे आहे. गर्वामुळेच सैतान व त्याच्या दुतांचे पतन झाले; त्यांच्या पहिल्या वतनामध्ये ते संतुष्ट नव्हते. अशा प्रकारे नरकाच्या संग्रही प्रथम गर्वाची वसाहत आली.

गर्वामुळे आदाम सुखलोकाबाहेर फेकला गेला. त्याला देवाने प्रथम दिलेल्या स्थानात तो समाधानी नव्हता. त्याने स्वत:ला उंचावण्याचा प्रयत्न केला — आणि तो पतन पावला (उत्पत्ती ३). अशा प्रकारे पाप, दु:ख व मरण यांचा प्रवेश झाला.

स्वभावत:च गर्व आपल्या सर्वांच्या अंत:करणात वसत असतो. आपण गर्विष्ठच जन्मतो. गर्व आपल्याला स्वसंतुष्टपणात विसावू देतो, आपण आहोत तसे फार चांगले आहोत अशा भ्रमात आपल्याला ठेवतो, कोणत्याही सल्ल्यासाठी आपले कान बंद ठेवतो, ख्रिस्ताची सुवार्ता धिक्कारायला लावतो, आणि प्रत्येकाला आपापला मार्ग धरायला भाग पाडतो (शास्ते २१:२५; यशया ५३:६). पण तरुणाच्या अंत:करणात गर्व जितक्या सामर्थ्यानिशी वसतो तितक्या सामर्थ्यानिशी इतरत्र वसत नाही.

सामान्यत: तरुण पुरुष सल्ला दिल्यास अत्यंत तापट, उन्मत्त व सहन करू न शकणारे झाल्याचे आढळते. त्यांच्या संबंधात काही घडले की ते बहुधा उर्मट व असभ्य वागतात. त्यांना वाटते की त्यांच्या पात्रतेप्रमाणे त्यांची किंमत केली जात नाही व त्यांना सन्मानाने वागवले जात नाही. थोडे निवांतपणे बसून मोठ्यांचे दोन शब्द ऐकून घ्यायला ते थांबत नाहीत. त्यांना वाटते त्यांना सर्व समजते. त्यांना आपल्याच ज्ञानाचा फारच अहंकार असतो. ते वडील जनांना, विशेषत: आप्तांना, मूर्ख, गतिमंद, संथ समजतात. त्यांना कोणत्याही शिकवणीची किंवा बोधाची गरज नाही अशी त्यांची कल्पना असते: त्यांना सर्व गोष्टींचे ज्ञान असते. त्यांना काहीही बोलले तर ते रागावतात. उमद्या घोड्यांना जसे जराही नियंत्रण चालत नाही तसे ते असतात. गरजेचे सर्व आपण आपल्या पद्धतीने स्वतंत्रपणे करावे असे त्यांना वाटते. ईयोबाने उल्लेखल्याप्रमाणे ते विचार करतात की, "आम्हीच काय ते मानवप्राणी; आम्ही मेलो की ज्ञान नष्ट झालेच" (ईयोब १२:२). हा सगळा गर्व आहे.

असाच होता रहाबाम, जे वडील जन त्याच्या बापाच्या तैनातीस हजर असत अशा अनुभवी लोकांचा सल्ला त्याने तुच्छ मानला, आणि आपल्या पिढीतील तरुणांचा सल्ला त्याने

स्वीकारला (१ राजे १२:८). त्याच्या या चुकीचे परिणाम त्याच्या हयातीतच त्याला भोगावे लागले. त्याच्यासारखे असे कित्येक जण आहेत.

दाखल्यातील उधळ्या पुत्र असाच होता. आपल्या मालमत्तेचा वाटा घेणे त्याला महत्त्वाची गरज असल्याचे वाटले, तेच त्याच्या अंगाशी यायला कारण झाले (लूक १५). आपल्या बापाच्या छत्राखाली त्यांच्या अधीन राहून तो निवांतपणे जगू शकला नाही, त्याला दूर देशीच जायला हवे होते व स्वत:चा धनी स्वत:च व्हायचे होते. लहान मूल जसे आईचा हात सोडून एकटेच चालू लागते तसे त्याला एकटेच जगायचे होते. लवकरच त्याला त्याच्या चुकीची अद्दल घडली. जेव्हा डुकरांबरोबर बसून त्याला त्यांचे खाद्य खावे लागले तेव्हा तो शहाणा झाला. पण अनेक जण त्याच्यासारखे आहेत.

तरुण मनुष्यांनो, मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो: गर्वापासून सावध राहा. जगात दोन दृश्ये दुर्मिळ समजली जातात: एक म्हणजे नम्र तरुण मनुष्य, दुसरे, समाधानी वृद्ध मनुष्य. मला वाटते, ही म्हण खरी ठरू नये.

आपल्या स्वत:च्या क्षमतांविषयी, आपल्या बाह्यस्वरूपाविषयी किंवा आपल्या बुद्धिमत्तेविषयी गर्विष्ठ असू नका. स्वत:विषयी किंवा देवाने जन्मत: दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या देणग्यांविषयी गर्व करू नका. तुम्ही स्वत:ला व जगाला समजून न घेतल्याने हे होत असते. वय वाढेल व जसजसे तुम्ही निरीक्षण कराल तसतसे तुम्ही गर्विष्ठ होण्यास कारणे सापडणार नाहीत. अज्ञान व अनुभव नसणे ही गर्वाचा पाया आहेत; एकदा का हा पाया दूर केला की लवकरच गर्व खाली उतरेल.

लक्षात घ्या की देवाचे वचन किती वारंवार नम्रतेच्या आत्म्याची श्रेष्ठता आपल्यासमोर ठेवते. आपल्याला किती जोरदारपणे इशारा दिला आहे की, "आपल्या योग्यतेपेक्षा स्वत:ला अधिक मानू नका" (रोम १२:३). किती साध्या सोप्या रीतीने आपल्याला सांगितले आहे की "जर कोणाला वाटत असेल की, आपल्याला एखादी गोष्ट कळते तर ज्याप्रमाणे कळले पाहिजे त्याप्रमाणे त्याला अद्याप कळत नाही" (१ करिंथ ८:२). किती कडक आज्ञा दिली आहे की " — लीनता — धारण करा" (कलसै ३:१२). पुन्हा "नम्रतारूपी कमरबंध बांधा" (१पेत्र ५:५). अरेरे, कित्येक लोक हे वस्त्र न पांघरल्याने चिंध्या पांघरल्यासारखे वाटतात!

याबाबत आपला प्रभू येशू ख्रिस्त किती महान आदर्श आपल्यापुढे ठेवतो याचा विचार करा. "जसे मी तुम्हाला केले तसे तुम्हीही करावे" (योहान १३:१५) असे म्हणत त्याने आपल्या शिष्यांचे पाय धुतले. असे लिहिले आहे की, "तो धनवान असता तुम्हाकरता दरिद्री झाला" (२ करिंथ ८:९). पुन्हा असे लिहिले आहे, "त्याने स्वत:ला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे रूप धारण केले; आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वत:ला लीन केले" (फिलिपै २:७,८). खरेच, गर्विष्ठ असणे म्हणजे ख्रिस्तासारखे असण्याऐवजी अधिक करून सैतानासारखे व पतित आदामासारखे असणे होय. येशूसारखे होणे कदापि नीच किंवा खालच्या पातळीचे ठरणार नाही हे मात्र नक्की!

कधी होऊन गेला नाही अशा अति ज्ञानी मनुष्याविषयी विचार करा — मला म्हणायचे आहे की शलमोनाविषयी विचार करा. तो स्वत:विषयी कसे शब्द वापरतो पाहा, "मी तर केवळ लहान मूल आहे, चालचलणूक कशी ठेवावी ते मला कळत नाही" (१ राजे ३:७,८), म्हणजे मी स्वत:ला ताब्यात ठेवू शकत नाही. त्याचा भाऊ अबशालोमापेक्षा त्याची वृत्ती एकदम निराळी आहे. अबशालोम स्वत:ला कशाहीपेक्षा सरस लेखणारा होता: "मला या देशात न्यायाधीश केले

असते तर किती बरे झाले असते? एखाद्याने आपला कज्जा किंवा प्रकरण माझ्याकडे आणले असते तर मी त्यास न्याय दिला असता" (२ शमुवेल १५:४). तसेच त्याचा दुसरा एक भाऊ अदोनीयापेक्षा पण त्याची वृत्ती निराळी होती. "तो तर शिरजोर होऊन म्हणाला, मी राजा होणार" (१ राजे १:५). नम्रता ही शलमोनाच्या ज्ञानीपणाची सुरुवात होती. तो आपल्या अनुभवातून लिहितो की, "आपल्या शहाणपणाची घमेंड बाळगणारा इसम तुला दिसतो काय? अशा मनुष्यापेक्षा मूर्खाला अधिक आशा आहे" (नीतिसूत्रे २६:१२).

तरुण मनुष्यांनो, आता दिलेल्या संदर्भवचनांवर गांभीर्याने विचार करा. तुमच्या मतावर अतिविश्वास दाखवू नका. आपलेच सर्व नेहमीच बरोबर असते आणि दुसऱ्यांचे सर्व चूकच असते अशी खात्री बाळगणे थांबवा. आपल्याहून वरिष्ठांनी दिलेले विशेषत: आपल्या आईवडिलांचे मत निराळे असल्याचे पाहून ते बेभरवशाचे आहे असे धरून चालू नका. वय अनुभव देते त्यामुळे त्याचा आदर व्हायला हवा. ईयोबाच्या पुस्तकातील अलीहूच्या ज्ञानाचे हे लक्षण होते की, "ते वयाने मोठे होते म्हणून तो भाषण करावयास मिळेपर्यंत थांबला होता" (ईयोब ३२:४). आणि त्यानंतर तो म्हणतो, "मी अल्पवयी आहे, व तुम्ही वयोवृद्ध आहा; म्हणून मी मुरवत धरली, आपले मत तुमच्यापुढे प्रकट करण्यास मी कचरलो. मला वाटले जास्त दिवस पाहिलेल्यांनी भाषण करावे, बहुत वर्षे घालविलेल्यांनी अक्कल सांगावी" (ईयोब ३२: ६-७). मर्यादशीलता व मौनत्व हे तरुण लोकांचे सुरेख व आकर्षक सद्गुण आहेत. शिकणारे बनण्याची कदापि लाज बाळगू नका. जेव्हा मंदिरात येशू बाराव्या वर्षी सापडला तेव्हा तो असा होता. तो "गुरुमंडळामध्ये बसून त्यांचे भाषण ऐकताना व त्यांस प्रश्न करताना त्यांस आढळला" (लूक २:४६). अति ज्ञानी लोक तुम्हाला सांगतील की ते नेहमी शिकतच असतात, आणि नम्रपणे कबुली देत असतात की आपल्याला किती कमी ज्ञान आहे. सर ऐझाक न्यूटन हा थोर मनुष्य नेहमी म्हणत असे की समुद्र किनाऱ्यावरून ज्ञानाचे थोडे मोलवान खडे वेचणाऱ्या लहान मुलापेक्षा मी चांगला आहे असे मुळीच नाही. (ऐझक न्यूटन १६४२-१७२० या काळात होऊन गेला. तो पदार्थशास्त्र व गणिताचा शास्त्रज्ञ होता. स्वभावत: तत्ववेत्ता होता. वैज्ञानिक क्रांतीतील प्रमुख होता. सर्व युगांवर प्रभाव पाडणारा विख्यात शास्त्रज्ञ होता.)

तरुण मनुष्या, तू जर ज्ञानी असशील, जर तू आनंदी असशील, तर मी देत असलेला धोक्याचा इशारा ध्यानात ठेव: *गर्वापासून सावध राहा.*

ब. चैनीची आवड

तरुण मनुष्यांना असलेला दुसरा धोका म्हणजे चैनीची आवड. तारुण्यात आपल्या वासना फार तीव्र असतात आणि बेफाम मुलाप्रमाणे लाड पुरवण्यासाठी त्या मोठ्ठ्याने रडतात. तारुण्याच्या काळात आपल्यात बहुधा उत्तम आरोग्य व बळ असते: मरण दूर वाटत असते, आणि या आयुष्यात आपण मजा मारायची हेच सर्वस्व वाटत असते. तारुण्याचा काळ असा असतो की बहुतेक तरुणांना फार थोड्या जगिक चिंता असतात किंवा त्यांनाच लक्षपूर्वक पेलाव्या लागतील अशा फारशा काळज्या नसतात. त्यामुळे तरुणांना चैनीचाच विचार सुचत असतो, तरुणांना प्रश्न केला की "तुम्ही कोणाची सेवा करता?" तर पुष्कळ जण हेच उत्तर देतील की, "मी चैनबाजी व वासनांची सेवा करतो."

परिणाम

तरुण पुरुषांनो, चैनीची आवड कोणत्या फळांचे उत्पादन करते व कोणत्या प्रकारे तुम्हाला उपद्रव करते हे मी सांगू लागलो तर वेळ पुरणार नाही. मजाहजा, मेजवान्या, दारूबाजी, सट्टा — जुगार, चित्रपटगृहात जाणे, नाचगाणी व अशाच प्रकारांविषयी मी का बोलावे? थोडकेच असे आढळतील की जे ह्या गोष्टींच्या कटू अनुभवातून गेलेले नाहीत व त्यांना या गोष्टींविषयी विशेष

माहिती नाही. ही तर फक्त उदाहरणे दिली. ज्या सर्व गोष्टी थोडा वेळ उत्साहवर्धक संवेदना देतात, ज्या सर्व गोष्टी विचारांत बुडवून टाकतात व मन सतत चक्रावून सोडतात, ज्या सर्व गोष्टी इंद्रियांना संतोष देतात व देहाला खूष करतात — (दैहिकता किंवा देह हे शब्द मनुष्याच्या स्वार्थी आवडींसंदर्भात वापरले जातात. त्या दैहिकतेचा आत्म्याशी लढा चालू असतो) — अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये तुमच्या या काळात प्रचंड सामर्थ्य असते, आणि त्यांचे सामर्थ्य चैनीच्या आवडीच्या ऋणात राहते. स्वत:वर पहारा ठेवा. पौल ज्यांचे वर्णन करतो, "देवावर प्रेम न करता विषयावर प्रेम करणारे" (२ तीमथ्य ३:४); तसे होऊ नका.

मी सांगतो ते लक्षात ठेवा: जर तुम्ही जगिक सुखांना बिलगलात, तर याच गोष्टी जिवांचे खून करणाऱ्या आहेत. शुष्क विवेकभाव आणि कठीण व निष्ठुर अंत:करण प्राप्त होण्याचा अधिक खात्रीशीर मार्ग देहाच्या व मनाच्या इच्छांना मोकळी वाट करून देण्याशिवाय दुसरा कोणता नाही (१तीमथ्य ४:२). आरंभी तसे काही जाणवत नाही, पण कालांतराने खरे ते उघड होते.

आध्यात्मिक इशारे

पेत्र काय म्हणतो यावर विचार करा: "जिवाबरोबर लढणाऱ्या दैहिक वासनांपासून दूर राहा" (१ पेत्र २:११). त्या जिवाच्या शांतीचा विध्वंस करतात, ती दुर्बल करतात, तिला कडक गुलामगिरीत नेतात आणि गुलाम करतात.

पौल काय म्हणतो तेही विचारात घ्या. "पृथ्वीवरील तुमचे अवयव जिवे मारा" (कलसै ३:५). जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी दुर्वृत्ती व वासना यांसुद्धा देहाला वधस्तंभावर खिळले आहे" (गलती ५:२४). "मी तर आपल्या शरीराला बुकलून त्यास दास करून ठेवतो." (१ करिंथ ९:२७). एके काळी शरीर जिवाचा परिपूर्ण महाल असे होते. आता ते भ्रष्ट, अव्यवस्थित, सतत पहारा द्यावा असे बनले आहे. ते जिवाला भार असे झाले आहे, मदतनीस राहिलेले नाही, तर अडखळण झाले आहे. ते उपयुक्त सेवक बनू शकते, पण ते नेहमीच एक *वाईट मालक असते.*

पुन्हा पौलाच्या शब्दांवर विचार करा: "तर तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका" (रोम १३:१४). रॉबर्ट लिफ्टन (१६११-१६८४) स्कॉटलंडमधील ग्लास्कोचे आर्चबिशप म्हणतात की, "हेच वचन वाचून ऑगस्टीनने त्या वचनाचे पालन केले, आणि अतिशय भयानक अनैतिक तरुण मनुष्याचे ख्रिस्त येशूच्या विश्वासू सेवकात रूपांतर झाले." तरुण पुरुषांनो, हेच तुम्हा सर्वांच्या संदर्भात घडावे अशी मी सदिच्छा बाळगतो.

पुन्हा लक्षात घ्या की, जर तुम्ही जगिक सौख्यांना बिलगलात तर ती सर्व तृप्ती न करणारी, रिक्त व व्यर्थ आहेत. प्रकटी ९:३-११ मधील दृष्टांतामधील टोळांप्रमाणे त्यांच्या मस्तकावर मुकुट दिसतात पण त्या टोळांप्रमाणेच, त्यांनाही नांग्या आहेत, त्यांच्या शेपटात खरोखर नांग्या आहेत. सर्वच काही चकाकणाऱ्या सोन्याप्रमाणे नाही. सर्वच काही गोड चव देणारे चांगले नाही. सर्वच काही काळ संतोष देणारे सुख नाही.

जा आणि जगात भरून असलेली तुम्हाला हवीत ती सुखे घ्या — तुमचे अंत:करण कदापि तृप्त होत नसल्याचे तुमच्या प्रत्ययास येईल. अंतर्यामातून नीतिसूत्रातील जळवांप्रमाणे "दे, दे" ओरडणारा सतत एक रडका सूर निघत राहील! (नीति. ३०:१५). तेथे एक रिक्त स्थान आहे, ते देवाशिवाय कोणीच भरून काढू शकत नाही. शलमोनाप्रमाणेच तुम्हाला आढळेल की जगिक चैनी एक व्यर्थ देखावा आहेत — आत्म्याचा नाश आणि मनस्ताप, चुना लावलेल्या कबरा, दिसायला सुंदर पण आतून राखेने व पूर्ण भ्रष्टतेने भरलेल्या. वेळीच शहाणे झालात तर बरे. जगिक सुखांवर चिठ्ठी चिकटवा, "जहर". त्यांच्यातील जे कायदेशीर असेल, त्याच्या वापराविषयी तर

विशेष संयम राखा. तुम्ही आपले अंत:करण त्यांना वाहिले तर ती सर्व जिवाचा नाशच करणारी आहेत. दुसऱ्या पेत्रावर ॲडम्स म्हणतात, "चैनींना प्रथम परवानगीचे कारण हवे; *अधिकृतता* हवी की ती चैन पापविरहित आहे — मग तिचा अतिरेक होत नाही ना याचे *मापन* करा."

अशुद्धता

याबाबत मी सर्वच तरुणांना सातवी आज्ञा लक्षात ठेवण्याचा इशारा देण्यापासून हात आखडता घेणार नाही (निर्गम २०:१४): व्यभिचार, जारकर्म आणि सर्व प्रकारची अशुध्दता यापासून सावध राहा. देवाच्या या विषयावरील नियमांवर स्पष्टपणे फार कमी बोलले जाते. पण मी जेव्हा पाहतो की हा विषय संदेष्ट्यांनी व प्रेषितांनी कसा हाताळला, जेव्हा मी पाहतो की आपल्या मंडळीच्या धर्मसुधारकांनी उघडपणे त्याविषयी कसा दोष दिला; जेव्हा मी पाहतो की रऊबेन, हफनी, फिनहास आणि अम्मोन यांच्या पावलांवर पाऊल ठेवून काही तरुण जात आहेत — तेव्हा माझ्या चांगल्या विवेकभावाने मी शांत बसू शकत नाही. या आज्ञेविषयी अतिरेकी मौन बाळगून जगाने काही काही साध्य केले असे मला वाटत नाही. वैयक्तिक रीतीने मला असे वाटते की तरुण पुरुषांना उद्देशून बोलताना, पूर्वीच्या प्रख्यात कल्पनेनुसार *"तरुण पुरुषांच्या पापांबद्दल"* तो नाजूक विषय आहे असे समजून त्यावर न बोलणे चुकीचे असून वचनाला धरून नाही.

सातव्या आज्ञेचा भंग हे सर्व पापांहून महापाप आहे. होशेय म्हणतो, "ते त्यांचा विवेक नष्ट करतात"(होशेय ४:११). मनुष्य जे कोणते पाप करील त्यापेक्षा हे पाप जीवावर खोल जखमा करते. गत काळात या पापाने प्रत्येक युगात हजारोंचे बळी घेतले आहेत आणि देवाच्या काही पवित्र जनांनाही उलथून टाकले आहे. लोट, शमशोन आणि दावीद हे याचे भयानक पुरावे आहेत. या पापाकडे पाहून माणूस हसण्याचे धाडस करतो. *चालण्याची ढब, अस्थिरता, रानटीपणा, ओबडधोबडपणा* या नावांखाली ते गुळमुळीत करून टाकतो. पण या पापाबद्दल सैतान तर फार आनंद करतो, कारण तो अशुद्ध आत्मा आहे (मार्क १:२३; ३:३०; ५:२; ७:२५ इ.). या पापाचा देव विशेष तिरस्कार करतो आणि त्या पापाचा तो न्याय करणार आहे असे घोषित करून टाकतो (इब्री १३:४).

तरुण पुरुषांनो, जर तुम्ही आपल्या जीवनावर प्रेम करत असाल तर "जारकर्मापासून दूर राहा" (१ करिंथ ६:१८). "पोकळ भाषणाने कोणी तुम्हास फसवू नये; कारण अशा पापांमुळे आज्ञाभंग करणाऱ्या पुत्रांवर देवाचा कोप होतो (इफिस ५:६). अशा प्रसंगांपासून, जे तुम्हाला त्यात ओढतील अशांच्या संगत सोबतीपासून, ज्या ठिकाणी हा मोह तुम्हाला गाठील अशा स्थळांपासून दूर राहा. मत्तय ५: २८ मध्ये याविषयी आपला प्रभू काय म्हणतो, वाचा. पवित्र ईयोबासारखे व्हा: "तुमच्या डोळ्यांशी करार" करा. त्याविषयी *गप्पा चालू असता तेथून पळ* काढा. ही एक गोष्ट आहे जिच्याशी तुमचे नाव जोडले जाऊ नये. डांबराच्या गाळाला हात लावला तर तुम्ही मळीन होणार नाही असे होऊ शकत नाही. *त्या विचारांपासूनच पळ काढा*; त्यांना प्रतिकार करा, त्यांचा पाणउतारा करा, त्याविरोधात प्रार्थना करा — त्यांना वाट मोकळी करून देण्याऐवजी त्यासाठी वाटेल तो यज्ञ करा. कल्पनाविश्व हे या पापांना उबण्यास व वाढीला लागण्यास असलेले अनुकूल कुरण आहे. तुमच्या विचारांवर पहारा ठेवा, म्हणजे ती कृती तुमच्या हातून होण्याचे फारसे भय उरणार नाही.

मी देत असलेल्या इशाऱ्यांवर विचार करा. इतर सर्व विसरलात तरी चालेल, पण *ह्याचा* विसर पडू देऊ नका.

क. अविचारीपणा

तरुण पुरुषांना असलेला दुसरा धोका म्हणजे अविचारीपणा. विचार करण्याचा अभाव या साध्या क्षुल्लक कारणाने हजारो जीव सर्वकाळासाठी दूर केले जातात. पुरुष विचार करणार नाहीत, दूरवर

दृष्टिक्षेप टाकणार नाहीत, सभोवार कटाक्ष टाकणार नाहीत, सध्या धरलेल्या मार्गाच्या शेवटावर विचार करणार नाहीत, सध्याच्या चालचलणुकीचे खात्रीने होणारे परिणाम लक्षात घेणार नाहीत. शेवटी अविचारामुळे नाश झाल्यानंतर ते जागे होतील.

तरुण मनुष्यांनो, यामुळे तुमच्या स्वत:खेरीज दुसरे कोणी इतक्या धोक्यात नाही. तुमच्या सभोवतालच्या संकटाविषयी तुम्हाला फार थोडी ओळख आहे आणि तुम्ही कसे चालत आहा याविषयी तुम्ही बेफिकीर आहात. शांतचित्ताने, निवांतपणे विचार करण्याचा त्रास घेणे तुम्हाला आवडत नाही, त्यामुळे तुम्ही चुकीचे निर्णय घेता, आणि तुम्हाला मग दु:खाने मान खाली घालण्याची वेळ येते. तरुण एसावाला एका वाटीभर वरणासाठी आपला ज्येष्ठत्वाचा हक्क विकण्याची गरज वाटली (उत्पत्ती २५:२९-३४). एक दिवस मला त्याची गरज पडणार आहे असा त्याने मुळीच *विचार* केला नाही. तरुण शिमोन व लेवी यांना त्यांची बहीण दीनासाठी बदला घेण्याची गरज वाटली आणि त्यांनी शखेमकरांची हत्या केली (उत्पत्ती ३४:२५-३०). त्यांचा पिता याकोब व त्याच्या संपूर्ण घराण्यावर ते काय गदा आणत आहेत याचा त्यांनी जराही *विचार केला नाही*. ईयोबाला आपल्या मुलांच्या अशा अविचारीपणाची कल्पना असावी: असे लिहिले आहे की त्यांचे भोजनसमारंभ होत आणि "हे भोजनसमारंभ आटोपल्यावर ईयोब त्यांना बोलावून आणून त्यांची शुद्धी करी; तो प्रात:काळी उठून त्या सर्वांच्या संख्येइतक्या बलींचे हवन करी; कारण तो म्हणे की न जाणो माझ्या पुत्रांनी पाप केले असेल आणि आपल्या मनाने देवाचा अव्हेर केला असेल. असा ईयोबाचा नित्यक्रम असे" (ईयोब १:५).

माझ्यावर विश्वास ठेवा, हे जग असे नाही की, विचार न करता आपण उत्तम राहू शकू, आणि आपला जीव उत्तम राखणे तर सोडाच. "विचार करू नकोस," सैतान कानात कुजबुजतो. त्याला ठाऊक आहे की परिवर्तन न झालेले अंत:करण हे अप्रामाणिक व्यापाऱ्याच्या नोंदवह्यांप्रमाणे आहे; त्यांची बारकाईने तपासणी होत नाही. देवाचे वचन म्हणते, "आपल्या मार्गाविषयी विचार कर," जरा थांब आणि विचार कर; नीट विचार कर आणि सुज्ञ राहा. एक स्पॅनिश म्हण आहे की, "घाई सैतानापासून येते." जसे पुरुष घाईगडबड करून विवाह करतात आणि मग दीर्घकाळ त्यांच्यावर पश्चात्ताप करायची वेळ येते. तसेच ते एका मिनिटात त्यांच्या जिवासंदर्भात चूक करतात आणि वर्षानुवर्षे दु:ख सोसत राहतात. वाईट नोकर असेच काहीतरी चुकीचे करतो, आणि मग म्हणतो, "तेव्हा मी विचारच केला नाही." तसेच तरुण पुरुष पापाकडे धाव घेतात आणि मग म्हणतात, "मी तेव्हा त्याविषयी विचारच केला नाही, ते पापासारखे दिसलेच नाही." पापासारखे दिसले नाही! तुमच्याकडे काय आहे? "मी पाप आहे" असा पुकारा करीत पाप येत नसते. केलीच तर ते थोडीशीच इजा करील. पाप हातून घडत असताना नेहमी असेच वाटते की ते "चांगले आहे, सुखद आहे, आणि हवेहवेसे वाटावे असे आहे" (उत्पत्ती ३:६). "अहो, ज्ञान संपादन करा, सुज्ञता संपादन करा" (नीतिसूत्रे ४:७). शलमोनाची वचने लक्षात ठेवा: "आपल्या पायांची वाट सपाट कर; तुझे सर्व मार्ग निश्चित असोत" (नीतिसूत्रे ४:२६). इंग्लिश तत्त्ववेत्ता, मुत्सद्दी राजकारणी, वैज्ञानिक, कायदेपंडित, वक्ता, निबंधकार व लेखक लॉर्ड फ्रान्सिस बेकन (१५६१-१६२६), यांचा एक सुविचार आहे की, "उतावळेपणाने काहीही करू नका. आहे त्या अवस्थेत राहा, म्हणजे अखेरही लवकर करता येईल."

मी धाडसाने हे सांगतो की काही लोक आरोप करतील की मी अतर्क्य गोष्टी करायला सांगत आहे; कारण तारुण्याचा काळ मुळीच गंभीर आणि विचारपूर्वक जीवन जगण्याचा काळ नाही. त्याला माझे उत्तर आहे की: हल्लीच्या काळात जर त्यांनी जास्त लक्ष दिले तर धोका कमी आहे. मूर्खपणाचे बोलणे, चेष्टामस्करी, विनोद, आणि प्रमाणबाह्य मौजमजा या गोष्टी सर्रास चालतात. या सर्व गोष्टींसाठी थोडा वेळ असावा हे ठीक आहे, यात शंकाच नाही; पण नेहमीच सर्व गोष्टींकडे सारासार विचाराने व गांभीर्याने न पाहाता त्यांना क्षुल्लक लेखणे हे कसेही असले तरी

सुज्ञतेचे नक्कीच नाही. मनुष्यासाठी सुज्ञपणाचे आहे तरी काय? —"भोजनोत्सवगृही जाण्यापेक्षा शोकगृही जाणे बरे; कारण प्रत्येक मनुष्याचा शेवट हाच आहे; जिवंताच्या मनात ही गोष्ट बिंबून राहील. हसण्यापेक्षा खेद करणे बरे; मुद्रा खिन्न असल्याने मन सुधारते. शहाण्यांचे चित्त शोकगृहाकडे लागते; पण मूर्खांचे चित्त हास्यविनोदगृहाकडे असते" (उपदेशक ७:२-४). संपूर्ण बायबलवर अत्यंत उपयोगी असा भाष्यग्रंथ लिहिणारे, बायबलचा उलगडा करणारे प्युरिटन मॅथ्यू हेन्री (१६६२-१७१४) एका मुत्सद्दी राजकारण्याची गोष्ट सांगतात. १५३२-१५९० या काळात होऊन गेलेला फ्रान्सिस वॉल्सिंगहॅम हा राणी एलिजाबेथच्या सैन्याच्या हेरखात्याचा प्रमुख होता. सामाजिक सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतरच्या काळात गंभीरपणे विचार करण्यास त्याने स्वत:ला झोकून दिले. त्याचे पूर्वीचे छचोर सोबती त्याला भेटायला आले, तेव्हा त्याला म्हणाले, "तू फार खिन्न होत चाललेला दिसतोस." तेव्हा तो म्हणाला, "नाही, मी गंभीर झालो आहे. कारण माझ्या सभोवतालचे सर्व गंभीर आहे. देव आपले निरीक्षण करताना गंभीर आहे; ख्रिस्त आपली मध्यस्थी करताना गंभीर आहे; पवित्र आत्मा आपल्या वतीने पराकाष्ठा करताना गंभीर आहे; देवाची सत्ये गंभीर आहेत; आपले आध्यात्मिक शत्रू आपल्याला धुळीस मिळवण्याच्या कामी गंभीर आहेत; हरवलेले बिचारे पापी नरकामध्ये गंभीर आहेत — मग तुम्ही आणि मीच का गांभीऱ्याने वागू नये? असे मला वाटते."

अहाहा, हे तरुण मनुष्या, विचारी असायला शीक! तू काय करत आहेस आणि तू कोठे निघाला आहेस यावर विचार करायला शीक. त्यावरील निष्कर्षांवर शांतपणे चिंतन कर. आपल्या अंत:करणाशी सुसंवाद कर आणि स्तब्ध राहा. मी दिलेला धोक्याचा इशारा लक्षात ठेव: केवळ विचार न केल्यामुळे हरवला जाऊ नकोस.

ड. धर्माचा तिरस्कार

तरुण पुरुषांना आणखी एक धोका असतो, तो म्हणजे धर्माचा तिरस्कार. हा देखील तुमचा एक खास धोका. तरुणांइतके धर्माकडे एवढे कमी लक्ष देणारे दुसरे कोणी नसेल असे मला वाटते. ज्या साधनाद्वारे देव मनुष्याच्या ऱ्हदयाशी संपर्क साधतो, त्या कृपेकडे कोणी तातडीने लक्ष पुरवीत नाही. जेव्हा ती सेवेस हजर असते तेव्हा त्या सेवेची कोणी हवी तशी दखलही घेत नाही. बायबल, प्रार्थनेची पुस्तके यांचा किती अल्प वापर करतात, किती थोडी गाणी गातात, किती थोडया प्रमाणात उपदेश ऐकतात. दर आठवडी जिवाला सहाय्यक ठरणाऱ्या प्रार्थनासभा, शास्त्रवर्ग, संदेश अशा उपक्रमांना सहसा तेच गैरहजर असतात. तरुण पुरुषांना वाटते की त्यांना या गोष्टींची गरजच नाही: त्यांना वाटते, या गोष्टी स्त्रियांसाठी व वृद्धांसाठी चांगल्या आहेत, पण त्यांच्यासाठी नव्हे. ते आपल्या जिवाविषयी अगदीच बेफिकीर दिसतात. कोणाला वाटेल की स्वर्गाला जाणेच ते अपमानास्पद लेखतात की काय. ह्यालाच म्हणतात, *धर्माचा तिरस्कार!* याच वृत्तीतून त्या मुलांनी अलीशाची थट्टा केली होती (२ राजे२:२३); आणि याच वृत्तीविषयी मी सर्व तरुणांशी बोलत आहे: सावध व्हा. ख्रिस्ती होणे जर इतके लाख मोलाचे आहे, तर ख्रिस्ती धर्माविषयी आस्था बाळगणे देखील तितकेच लाख मोलाचे आहे.

पवित्र गोष्टींचा तिरस्कार वाटणे हा ख्रिस्ती धर्म न मानण्याचा महामार्ग आहे. एकदा का एखाद्या मनुष्याने ख्रिस्ती विश्वासाच्या एखाद्या भागावर थट्टा व विनोद करायला सुरुवात केली, तर ती व्यक्ती पूर्णपणे अविश्वासी झाल्याचे पुढे माझ्या कानावर आल्यास मला त्याचे आश्चर्य वाटणार नाही.

तरुण मनुष्या, याविषयी तू खरोखर तुझे मन तयार केले आहेस का? धर्माच्या तिरस्काराला तू असाच चिकटून राहिला आहेस तर तुझ्यासमोरचा खोल दरा तू नीट पाहिला आहेस का?

दाविदाचे बोल आपल्या स्मरणात आण; "मूढ आपल्या मनात म्हणतो की देव नाही" (स्तोत्र १४:१). *मूर्ख*, दुसरा कोणी नव्हे तर मूर्खच! तो हे *बोलत आहे* पण त्याने ते कधीच सिद्ध केले नाही. जर आरंभापासून शेवटपर्यंत, सर्व पुराव्यांनिशी स्वत:स सिद्ध करून दाखवणारे कोणते एखादे पुस्तक असेल तर ते केवळ बायबलच आहे. सर्व शत्रू व दोष काढणाऱ्यांच्या हल्ल्यांना याने प्रतिकार केला आहे. देवाचे वचन खरोखर कसास उतरले आहे (स्तोत्र १८:३०). सर्व प्रकारे ते कसोटीस लावले गेले आहे, आणि जितके अधिक ते कसोटीस लावण्यात आले, तितके ते पुराव्यानिशी देवाचीच हस्तकृती असल्याचे सिद्ध झाले आहे. जर बायबलवर तुम्ही विश्वास ठेवला नाही तर तुम्ही कशावर विश्वास ठेवाल? मग जे मूर्खपणाचे आणि हास्यास्पद अशावर विश्वास ठेवण्याखेरीज काहीच उरत नाही. म्हणून बायबलवरच अवलंबून राहा, बायबल हे देवाचे वचन आहे असा विश्वास धरणे जो मनुष्य नाकारतो, त्याच्याइतका उघडपणे चटकन फसणारा कोणी माणूस नाही. आणि जर हे देवाचे वचन आहे, तर मग त्याचा तुम्ही तिरस्कार करणार नाही याविषयी खबरदारी बाळगा.

काही मनुष्ये तुम्हाला सांगतील की बायबलमध्ये काही अशा अवघड बाबी आहेत की त्या समजायला कठीण आहेत. असे नसते तर ते देवाचे पुस्तक म्हणता आले नसते. आणि अशा गोष्टी असल्या म्हणून काय झाले? तुमचा डॉक्टर तुमच्या औषधांविषयी जे काही करतो त्याचे तुम्ही स्पष्टीकरण देऊ शकत नाही म्हणून तुम्ही त्या औषधाचा तिरस्कार करत नाही. लोक वाटेल ते म्हणोत, तारणासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी दिवसाच्या प्रकाशासारख्या त्यात स्पष्ट आहेत. याविषयी अगदी खात्री बाळगा: बायबल समजत नाही म्हणून लोक ते मुळीच धिक्कारत नसतात. त्यांना ते फारच चांगले समजते: त्यांना समजते की त्यांचे वर्तन ते दोषी ठरवते, त्यांच्या वैयक्तिक पापांविषयी साक्ष देते, आणि त्यांना न्यायाला पाचारण करते. ते खोटे व निरुपयोगी असल्याचा विश्वास धरण्याचा ते प्रयत्न करतात कारण ते सत्य असल्याची साक्ष त्यांना द्यायला नको असते. राजाचे व दरबारातील सदस्यांचे सल्लागार, लॉर्ड जॉन रॉचेस्टर (१६४७-१६८०) बायबलवर हात ठेवून बोलले की; "वाईट जीवन, केवळ वाईट जीवनाविषयीच हे पुस्तक आक्षेप घेते." जे ॲग्लिकन पाळक होते, व ज्यांचे संदेश "प्रथम श्रेणीचे दर्जेदार" ईश्वरी विज्ञान समजले जातात ते रॉबर्ट साऊथ (१६३४-१७१६) म्हणतात, "माणसे ख्रिस्ती सत्यावर प्रश्न करतात, कारण त्यांना त्याप्रमाणे आचरण करायला नको असते."

तरुण मनुष्यांनो, देव आपले वचन पाळण्यात कधी अपयशी ठरला? कधीच नाही. तो जे बोलला, ते त्याने नेहमीच केले. आणि तो जे बोलला ते नेहमी त्याने चांगलेच केले. जलप्रलयाच्या वेळी तो आपला शब्द पाळण्यात अपयशी ठरला? — नाही. सदोम व गमोराच्या कामी तो अपयशी झाला? — नाही. अविश्वासी यरुशलेमाबाबतीत तो अपयशी ठरला? — नाही. आता या क्षणापर्यंत तो यहूद्यांसंबंधी अपयशी ठरला आहे? — नाही. तो आपले वचन पूर्ण करण्यात कधीही अपयशी ठरला नाही. काळजी घ्या. देवाच्या वचनाचा तिरस्कार करणाऱ्यांमध्ये तुम्ही सापडू नये.

ख्रिस्ती धर्माकडे पाहून हसू नका. पवित्र गोष्टींची थट्टा करू नका. जे आपल्या जिवाविषयी गंभीर आहेत व आस्थेने त्याकडे लक्ष देतात अशांची चेष्टा करू नका. एक वेळ अशी येईल की ज्यांना तुम्ही हसलात त्यांची आनंदित असलेल्यांमध्ये तुम्ही गणना कराल — तेव्हा तुमच्या हसण्याचे दु:खात आणि तुमच्या चेष्टामस्करीचे जड ओझ्यात रूपांतर झालेले असेल.

ई . लोकमताचे भय

तरुणांना आणखी एक भय असते, ते लोक काय म्हणतील याचे. "मनुष्याची भीती पाशरूप होते"(नीति २९:२५) हे खरे आहे. या गोष्टीचे बहुतेकांच्या मनावर भयंकर दडपण असते, खास

करून तरुणांच्या मनावर. फार थोडक्यांना स्वत:चे मत असते, किंवा स्वतंत्रपणे काही विचार करू शकतात. भरतीच्या प्रवाहाबरोबर ते मृत माशाप्रमाणे वहावत जातात: लोक ज्याला बरोबर म्हणतात त्याला ते बरोबर म्हणतात, ज्याला लोक चूक म्हणतात, त्याला ते चूक म्हणतात. जगात मुळातच फारसे विचारवंत असलेले लोक नसतात. बहुतेक पुरुष मेंढरासारखे असतात: ते पुढाऱ्यामागून चालत राहतात. जर रोमन कॅथोलिक चर्चच्या विश्वासावर निष्ठा ठेवण्याची फॅशन असेल, तर ते तसा विश्वास धरतात; मुस्लिम निष्ठेची फॅशन असेल तर ते मुस्लिम निष्ठा दाखवतात. चालू काळातील कल्पनांच्या प्रवाहाविरुद्ध जायला ते घाबरतात. थोडक्यात सांगायचे तर त्या दिवसाचे मत हेच त्यांचा धर्म, त्यांचा विश्वासांगिकार, त्यांचे बायबल आणि त्यांचा देव असते.

" माझे मित्र माझ्याविषयी काय म्हणतील, काय विचार करतील?" हा विचार आरंभालाच उत्तम कल खुडून टाकतो. आपले निरीक्षण होत आहे, आपल्याला हसत आहेत, किंवा आपल्याला मूर्खात काढत आहेत याचे भय अनेक चांगल्या सवयींना अडवून अडथळा आणते. त्यांनी धाडस केले तरच अनेक बायबल आज वाचली जातील. त्यांना माहीत आहे की त्यांनी ते वाचलेच पाहिजे, पण त्यांना भीती वाटते: "लोक काय म्हणतील?" आज रात्रीच काही गुडघे प्रार्थनेसाठी टेकले जातील, पण मनुष्यांचे भय त्यांना मना करते: "मला प्रार्थना करताना पाहून माझी पत्नी, माझे भाऊ, माझे मित्र, माझे सोबती काय म्हणतील?" अरेरे किती दरिद्री गुलामगिरी आहे ही! शौल शमुवेलाला म्हणाला; "मी लोकांस भिऊन त्यांचे म्हणणे ऐकले" (१ शमुवेल १५:२४), म्हणून परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केले. यहूदाचा विवेकशून्य व दुष्ट सिद्किया राजा म्हणाला: "मला यहूद्यांची भीती वाटते" म्हणून त्याने यिर्मयाने दिलेल्या सल्ल्याचे पालन केले नाही (यिर्मया ३८:१९). जमलेले पाहुणे काय म्हणतील याची भीती हेरोदाला वाटली म्हणून ज्याविषयी त्याला "अतोनात दु:ख" होईल असे कृत्य त्याने केले: त्याने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा शिरच्छेद केला (मत्तय १४:८-१०). पिलात यहूद्यांची मने दुखवायला घाबरला आणि त्याच्या विवेकबुद्धीला जे न्याय्य नसल्याचे त्याला पक्के ठाऊक होते, तेच त्याने केले: आणि त्याने ख्रिस्ताला वधस्तंभी देण्यासाठी त्यांच्या स्वाधीन केले (मत्तय २७:१७-२४). ही गुलामगिरी नाही तर काय आहे?

तरुण पुरुषांनो, या बंधनातून तुम्ही मुक्त व्हावे असे मला वाटते. जेव्हा आपल्या कर्तव्याची वाट स्पष्ट असते, तेव्हा तुम्ही लोकांच्या मतांची मुळीच पर्वा करू नये असे मला वाटते. माझ्यावर विश्वास ठेवा, "नाही" म्हणू शकणे ही फार मोठी गोष्ट आहे! यहोशाफाट या चांगल्या राजाची हीच दुर्बल बाजू होती: आहाबाशी व्यवहार करताना तो फार सैल व शरणागती पत्करणारा राहिला, त्यामुळेच त्याच्यावर बरीच संकटे गुदरली (१ राजे २२:४). "नाही" म्हणायला शिका! आपण चांगले नाही असे दिसू या भयापोटी "नाही" म्हणणे जड जात असते. जेव्हा पापी जन तुम्हाला भुलथाप देतील तेव्हा निश्चयपूर्वक "मी वश होणार नाही" असे म्हणायला शिका (नीति १:१०).

मनुष्याचे भय किती *अवास्तव* आहे एवढाच विचार करा. मनुष्याचे शत्रुत्व किती अल्पायुष्यापुरते आहे, आणि ते तुम्हाला किती थोडा उपद्रव करू शकते! "तू मर्त्य मनुष्याला, तृणवत् मानवपुत्राला भितेस अशी तू कोण? आकाश पसरणारा, पृथ्वीचा पाया घालणारा परमेश्वर तुझा कर्ता याला तू का विसरलीस?" (यशया ५१:१२,१३). आणि हे भय किती *कृतघ्न* आहे! आणि खरे तर त्यामुळे तुमच्याविषयी कोणाचे मत अधिक चांगले होत नाही. जे देवाविरुद्ध धैर्याची कृत्ये करतात, अशांचा जग नेहमी सन्मान करते. अरेरे! तोडा ही बंधने आणि काढून फेकून द्या तुमच्या ह्या शृंखला! तुम्ही स्वर्गाला जाऊ इच्छिता हे लोकांना कळू देण्याची लाज

बाळगू नका. तुम्ही देवाचा सेवक आहात हे दर्शवण्यात अपमान वाटू देऊ नका. योग्य ते करण्याचे भय वाटू देऊ नका.

प्रभू येशूचे बोल आठवा: "जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका; तर आत्मा व शरीर या दोहोंचा नरकात नाश करावयास जो समर्थ आहे त्याला भ्या" (मत्तय १०:२८). फक्त देवाला संतोषविण्याचा प्रयत्न करा आणि लवकरच तो इतरांना तुमच्याविषयी खूष करील. "मनुष्याचे मार्ग परमेश्वराला आवडले म्हणजे तो त्यांच्या शत्रूंसही त्यांच्याशी समेट करायला लावतो" (नीतिसूत्रे १६:७).

तरुण मनुष्यांनो, हिंमत धरा. लोक काय म्हणतात किंवा काय विचार करतात याविषयी विचार करू नका: तुम्ही नेहमीसाठी जगासोबत असणार नाही. मनुष्य तुमचे तारण करू शकतो का? — मुळीच नाही. हिशेब द्यायच्या त्या महान दिवशी काय माणूस न्यायाधीश असणार आहे? — मुळीच नाही. मनुष्य तुम्हाला जीवनात उत्तम विवेक भाव, मरणसमयी उत्तम आशा, पुनरुत्थानाच्या प्रभातसमयाविषयी उत्तम उत्तर देऊ शकतो का? — नाही! नाही! नाही! मनुष्य असे काहीही करू शकत नाही. मग "मर्त्य मानव नावे ठेवतील त्यांस भिऊ नका; त्यांच्या निंदेने घाबरू नका. कारण वस्त्राप्रमाणे त्यांस कसर भक्षील. लोकरीप्रमाणे त्यांस कीड खाऊन टाकील" (यशया ५१:७,८). एक इंग्लिश उत्तम उपदेशक कर्नल जेम्स गार्डीनर (१६८७-१७४५) यांचे थॉमस वॉट्सनचे 'हेवन टेकन बाय स्टॉर्म' हे पुस्तक वाचून अद्भुत रीतीने परिवर्तन झाले होते, त्यांचे बोल लक्षात घ्या, "मी देवाला भितो; म्हणून मला कोणाला भिण्याची गरज नाही." जा आणि त्याच्यासारखे व्हा.

खालील इशारे मी देतो ते ऱ्हदयात साठवून ठेवा. त्यावर मनन करण्याजोगे ते आहेत. त्यांची फारशी गरज नाही असे मी म्हणालो तर ती मोठी चूक ठरेल. देव करो आणि तुम्हाला दिल्यानंतर ते व्यर्थ जाऊ नयेत.

३. तरुण पुरुषांसाठी सर्वसाधारण मसलत

या तिसऱ्या टप्प्यात मी तरुण पुरुषांना काही सर्वसाधारण मसलत देऊ इच्छितो.

अ. पापातील अधर्म पाहा

महत्त्वाची गोष्ट म्हणजे पापाच्या अधर्माविषयी स्पष्ट दृष्टिकोन ठेवण्याचा प्रयत्न करा. तरुण पुरुषांनो, तुम्हाला पाप काय आहे, आणि पापाने तुम्हाला काय केले आहे हे समजले, तर मी तुम्हाला बोध करीत आहे याबद्दल तुम्हाला काही चमत्कारिक वाटणार नाही. तुम्हाला त्याचे खरे रंग समजत नसतात. पापामुळे येणारी अपराधाची भावना व वाटणारा धोका याविषयी तुमचे नेत्र अंध असतात, त्यामुळे मी कशामुळे एवढा चिंताग्रस्त होतो, हे तुम्हाला समजू शकत नाही. पाप क्षुल्लक आहे असे म्हणत सैतानाने तुमचा पिच्छा पुरवण्यात यशस्वी होऊ नये !

क्षणभर बायबल पापाबद्दल काय म्हणते यावर विचार करा:

- जिवंत असलेल्या प्रत्येक स्त्री, पुरुषाच्या ठायी ते स्वभावत:च वसते (उपदेशक ७:२०; रोम. ३:२३).
- ते आपले विचार, शब्द व कृती कसे भ्रष्ट करते आणि तेही सातत्याने (उत्पत्ती ६:५; मत्तय १५:१९).
- पवित्र देवाच्या दृष्टीला संपूर्ण अपराधी व घृणास्पद अवस्थेत दाखवते (यशया ६४:६; हबक्कूक १:१३).
- आपल्याला तारणाची काही आशाच नसल्यासारखे आपल्याला स्वत:कडे पाहायला लावते

(स्तोत्र १४३:२; रोम. ३:२०).

- या जगात त्याचे फळ लज्जा असते, व येणाऱ्या जगात त्याचे फळ, मरण असते (रोम. ६:२१,२३).

शांतपणे या सर्व मुद्दयांवर विचार करा. न समजता विष पिऊन मरणे यापेक्षा जिवंत असताना त्याविषयी माहीत नसणे हे जास्त खेदाचे नाही का?

विचार करा, आपल्या सर्वांच्या स्वभावात *पापाने केवढा भयानक बदल घडवून आणण्याचे काम केले आहे*. देवाने मानवाला जेव्हा मातीचे घडले, तेव्हा मानव जसा होता, तसा राहिलेला नाही. देवाच्या हातातून तो नीतिमान पापविरहित असा बाहेर पडला (उपदेशक ७:२९). निर्मितीच्या दिवशी तो, इतर सर्व गोष्टींप्रमाणेच "बहुत चांगला" होता (उत्पत्ती १:३१). आणि आता पाहा माणूस कसा आहे?:

- पतित प्राणी, धुळीस मिळालेला, सर्वत्र भ्रष्ट झाल्याच्या खुणा धारण केलेला.
- नबुखद्रेसराप्रमाणे त्याचे ऱ्हदय जगिक, खालच्या पातळीवर आलेला, ताठ मानेने वर नव्हे तर खाली पाहाणारा.
- सर्व कारभार अव्यवस्थित असण्याची आवड, कोणाचे स्वामित्व न स्वीकारणारा, सगळीच उधळपट्टी आणि गोंधळ.
- त्याचे ज्ञान मंदावणाऱ्या प्रकाशाप्रमाणे, मार्गदर्शन करण्यास कमकुवत, त्यामुळे तो बऱ्यावाईटाचा भेद करू न शकणारा.
- त्याची इच्छा सुकाणू नसलेल्या जहाजासारखी, प्रत्येक इच्छेनुसार पुढेमागे हेलकावे घेणारे, आणि देवाचा मार्ग सोडून सतत कोणताही मार्ग धरणारा.

अरेरे! माणूस कसा झाला असता याच्या तुलनेत आता किती नाश पावला आहे! अशा मानवी आकृतीचे वर्णन चितारताना पवित्र आत्मा अंधत्व, बहिरेपण, रोग, निद्रा, मरण अशी रूपके आपल्याला समजण्यासाठी वापरतो. आणि लक्षात ठेवा आता मानव जो काही आहे तो त्याच्या पापामुळे असा झाला आहे.

प्रायश्चित्त म्हणजे गुन्ह्याचे ऋण फेडून समेट घडवून आणण्यासाठी, पाप्याला क्षमायाचना केल्यावर *क्षमाप्राप्तीची तरतूद होण्याकरता, पापाबद्दल काय मोबदला भरून द्यावा लागला* यावरही विचार करा. आपण केलेल्या आज्ञाभंगामुळे मिळालेल्या शापापासून मुक्ती मिळण्यासाठी, त्या मुक्तीचे मोल भरून देण्याकरता, देवाच्या स्वत:च्या पुत्राला या जगात येऊन आपला स्वभाव धारण करावा लागला (गलती ३:१३). जो प्रारंभापासून पित्याबरोबर होता, आणि ज्याच्याद्वारे सर्व झाले, (इब्री १:१-३), त्या नीतिमानाला, अनीतिमानांसाठी पापांबद्दल दु:खसहन करावे लागले. कोणाही जिवासाठी स्वर्गाचा रस्ता खुला होण्यापूर्वी, या पुरुषाने मरणे भागच होते (१पेत्र ३:१८). प्रभू येशू ख्रिस्त मानवाकडून कसा तुच्छ लेखला गेला, धिक्कारला गेला, चाबकांचा मार खावा लागला, थट्टा सहन करावी लागली ते पाहा (यशया ५३); कालवरीवर वधस्तंभावर रक्त वाहात असता त्याला पाहा, यातनेने "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" (मत्तय २७:४६) ही त्याने दिलेली आरोळी ऐका; सूर्य कसा काळा पडला आणि हे दृश्य पाहात असता खडक कसे फुटले (मत्तय २७:४५,५१); ते लक्षात घ्या — आणि मग तरुण मनुष्या, पापाची अपराधी भावना व अधर्म कसा असेल यावर मनन कर.

पापाने या भूतलावर काय करून ठेवले आहे, यावरही विचार करा. त्याने आदाम हव्वेला एदेन बागेतून कसे बाहेर काढले, प्राचीन जगावर जलप्रलय कसा आणला, सदोम गमोरावर अग्निचा कसा वर्षाव होऊ दिला, फारो व त्याच्या सैन्याला तांबड्या समुद्रात कसे बुडवले, कनानातील

सात दुष्ट राष्ट्रांचा कसा नायनाट केला, इस्राएलांच्या बारा वंशांना संपूर्ण भूतलावर कसे पांगवले यावर विचार करा. केवळ पापानेच हे सारे घडून आले.

याखेरीज आणखी विचार करा की पाप सर्व दारिद्र्य व दु:खाला कसे कारण झाले आहे, आजही पापच हेच याचे कारण आहे. यातना, रोग, आणि मरण; संघर्ष, भांडणे आणि फुटी; हेवा, मत्सर आणि कपट; लबाडी, अफरातफरी आणि फसवणूक; हिंसा, दडपण आणि लूटमार; स्वार्थ, निष्ठुरता आणि कृतघ्नता — ही सर्व पापाचीच फळे आहेत; या सर्वांचा पालक पाप आहे. पापाने देवाच्या संपूर्ण निर्मितीचा चेहरामोहरा कलंकित करून बिघडवून टाकला आहे.

तरुण मनुष्या, या गोष्टींवर विचार कर, आणि तुला समजेल की जे चालू आहे तेच आम्ही घोषित करतो. खरोखर तुम्ही त्याविषयी बारकाईने विचार केला तर तुम्ही कायमचे पाप टाकून द्याल. तुम्ही विषाशी खेळाल? नरकाशी खेळाल? आग हातात घ्याल? तुमच्या अत्यंत धोकादायक शत्रूला आपल्या उराशी थारा द्याल? तुमच्या पापांची क्षमा होवो न होवो, त्याला काही हरकत नाही अशा बेदरकार वृत्तीने जीवन कंठत राहाल — पापाचे तुमच्यावर की तुमचे पापावर वर्चस्व चालू द्याल?

अहो, पापाचा पापिष्टपणा व धोक्याच्या जाणीवेने जागृत व्हा! शलमोनाचे बोल लक्षात घ्या: "मूर्खाला" दुसऱ्या कोणाला नव्हे "मूर्खालाच अपराध करणे म्हणजे थट्टा वाटते" (नीतिसूत्रे १४:९). ऐका तर आज जी विनवणी मी तुम्हाला करत आहे: देवाने तुम्हाला पापाचा खरा अधमपणा शिकवावा म्हणून प्रार्थना करा. मग तुमचे तारण व्हावे म्हणून उठा व प्रार्थना करा.

ब. ख्रिस्ताची थोरवी जाणून घेण्याची खटपट करा

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताशी ओळख करून घेण्याची खटपट करा. ख्रिस्ती विश्वासात ही खरोखर महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. ख्रिस्ती विश्वासाचा हा कोनशिला आहे. हे तुम्हाला जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत माझी सल्लामसलत व इशारा व्यर्थ आहे आणि तुम्ही जे काही प्रयत्न कराल तेही व्यर्थ आहेत. मुख्य स्प्रिंगशिवाय घड्याळ जसे काही कामाचे नाही तसेच ख्रिस्ताशिवाय ख्रिस्ती धर्म काही कामाचा नाही.

पण माझ्या बोलण्यावरून गैरसमज करून घेऊ नका. केवळ ख्रिस्ताचे नाम माहीत असणे पुरेसे नाही असे मला म्हणायचे आहे. तर त्याची दया, कृपा व सामर्थ्य माहीत असायला हवे — केवळ कानांनी ऐकून तो माहीत नसावा, तर तुमच्या अंत:करणाने अनुभव घेऊन तो तुम्हाला माहीत असावा. तुम्ही त्याला विश्वासाने ओळखावे असे मला वाटते; पौल म्हणतो त्याप्रमाणे तुम्ही त्याला ओळखावे; "त्याच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य व त्याच्या दु:खाची सहभागिता ह्यांची, त्याच्या मरणाला अनुरूप होऊन ओळख करून घ्यावी" (फिलिपै ३:१०); असे मला वाटते. तुम्ही असे म्हणावेसे मला वाटते की: तो माझी शांती व माझे बल आहे; माझे जीवन व माझा दु:खपरिहार करणारा आहे, माझा वैद्य व माझा मेंढपाळ; माझा तारणारा व माझा देव आहे.

मी ह्या मुद्याला एवढे महत्त्व का देत आहे? मी हे करण्याचे कारण एवढेच की केवळ ख्रिस्ताच्या ठायीच "सर्व पूर्णता वसते" (कलसै १:१९), कारण केवळ त्याच्या ठायीच आपल्या जिवाला लागणाऱ्या सर्व आवश्यक गोष्टींचा पूर्ण पुरवठा उपलब्ध आहे. आपण सर्व तर गरीब, रिक्त मानवप्राणी आहोत: नीतिमत्ता व शांतीबाबत रिक्त आहोत, सामर्थ्य, समाधान याबाबत रिक्त आहोत, धैर्य व सहनशीलतेबाबत रिक्त आहोत, उभे राहून वाटचाल चालू ठेवण्याचे आपल्या ठायी सामर्थ्य नाही, की या दुष्ट जगात आपण काही प्रगती करू शकत नाही. केवळ ख्रिस्तामध्येच आपल्याला या सर्व गोष्टी सापडतात: कृपा, शांती, ज्ञान, नीतिमत्ता, पवित्रीकरण

आणि मुक्ती (१ करिंथ १:३०). (पवित्रीकरण हे देवाच्या आत्म्याचे काम असून त्याद्वारे विश्वासी व्यक्तीचे रूपांतर होत राहून ती देवाच्या प्रतिमेची होत राहते, पापाला अधिकाधिक मरत राहाते व धार्मिकतेसाठी जगत राहते.) जितके आपण त्याच्या ठायी राहू लागतो त्या प्रमाणात आपण बलशाली ख्रिस्ती बनत जातो. आपला स्व काहीच राहत नाही आणि ख्रिस्तावरच आपला पूर्ण भरवसा असतो, मगच आपण साहसी कृत्ये करू शकतो. मगच आपण जीवनाच्या लढ्यासाठी सशस्त्र होतो आणि विजयी होतो. मगच आपण जीवनाच्या प्रवासासाठी तयार होतो आणि पुढे कूच करतो. ख्रिस्तावर विसंबून जगणे, सर्व काही ख्रिस्तापासून प्राप्त करणे, सर्व काही ख्रिस्ताच्या सामर्थ्याने करणे, सतत ख्रिस्ताकडे लक्ष लावणे — हे आत्मिक भरभराटीचे गुपित आहे. पौल म्हणतो, "मला सामर्थ्य देणाऱ्याच्या ठायी सर्व काही करावयास मी शक्तिमान आहे" (फिलिपै ४:१३).

तरुण पुरुषांनो, आज तुमच्या जिवाची संपत्ती म्हणून मी ख्रिस्ताला तुमच्यासमोर सादर करतो. जे काही प्राप्त करण्यासाठी तुम्ही धावधाव करता त्यासाठी त्याच्याकडे जायला सुरुवात करा असे मी तुम्हाला निमंत्रण देतो. हे पहिले पाऊल तुम्ही उचला: *ख्रिस्ताकडे जा.* तुम्हाला मित्रांचा सल्ला घ्यायचा आहे का? मग तो उत्तम मित्र आहे: "एखादा मित्र असा असतो की तो आपल्या बंधुपेक्षाही आपल्याला धरून राहतो" (नीतिसूत्रे १८:२४).

तुमच्या पापांमुळे तुम्हाला अपात्र वाटते का? घाबरू नका: त्याचे रक्त सर्व पापांची क्षमा करते. तो म्हणतो, "तुमची पापे लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील" (यशया १:१८).

तुम्हाला शक्तिहीन वाटून त्याच्यामागून तुम्ही चालू शकत नाही का? भिऊ नका: तो तुम्हाला देवाची मुले होण्याची ताकद देईल. तो तुमच्यामध्ये राहण्यासाठी पवित्र आत्मा देईल; आणि आपल्या मालकीचे म्हणून तुमच्यावर शिक्का मारील व तुम्हाला नवे ऱ्हदय देईल, आणि तुमच्या ठायी नवा आत्मा घालील (यहेज्केल ३६:२०).

तुम्ही त्रस्त व विशिष्ट दुर्बलतेने घेरले आहात का? भिऊ नका: येशू काढून टाकू शकत नाही असा दुरात्माच नाही; जीविताला होणारा असा कोणता आजारच नाही, जो येशू बरा करू शकत नाही. तुम्हाला भये, शंकाकुशंकांनी ग्रासले आहे का? त्यांना दूर सारा: तो म्हणतो, "माझ्याजवळ या" (मत्तय ११:२८); "जो माझ्याकडे येतो त्याला मी घालवणार नाहीच" (योहान ६:३७). तो तरुण मनुष्याचे मन जाणतो. त्याला तुमची संकटे, तुमच्या मोहपरीक्षा, तुमच्या अडचणी आणि तुमचे शत्रू माहीत आहेत. तो ज्या दिवसात मानवी देहात होता, तेव्हा तुमच्यासारखाच होता, नासरेथातला हा तरुण होता. तरुणाचे अंत:करण कसे असते याचा त्याला अनुभव आहे. तुमच्या दुर्बलतेच्या भावनांचा त्याला स्पर्श होतो, कारण तोही मोह परीक्षांनी आपल्यासारखाच पारखला गेला (इब्री २:१८; ४:१५). खरोखर त्याच्यासारख्या मित्रापासून व तारणाऱ्यापासून मागे फिरण्यासाठी तुम्ही कोणतीही सबब सांगू नये.

आज मी तुम्हाला करत असलेली विनंती ऐकाच: जर तुम्ही आपल्या जीवनावर प्रेम करत असाल तर येशू ख्रिस्ताशी ओळख करून घेण्याची खटपट करा.

क. तुमच्या जिवाचे महत्त्व

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या जिवाइतके महत्त्वाचे काहीही नाही याचा कदापि विसर पडू देऊ नका. तुमचा जीवात्मा सार्वकालिक आहे. तो सदासर्वकाळ जिवंत राहाणार आहे. जग व त्यातील सर्व काही नष्ट होणार आहे; मजबूत, घन, द्रव, सुंदर, व्यवस्थित रचना असणाऱ्या

अशा या संपूर्ण जगाचा अंत होणार आहे. "पृथ्वीची सृष्टीतत्वे तप्त होऊन लयास जातील" (२ पेत्र ३:१०). अधिकारी, लेखक, चित्र रेखाटणारे, इमारतींचे आलेख काढणारे, हे सर्व अल्पायुषी आहेत — तुम्ही मात्र त्यांच्यानंतरही जिवंतच असाल. एक दिवस देवदूत घोषणा करील "काळाची समाप्ती करण्यात आली आहे" (प्रकटी १०:६). पण तुमच्या जिवाविषयी असे म्हटले जाणार नाही.

मी तुम्हाला विनवतो की, हे सत्य समजून घ्या की तुमच्या जिवाचे जगणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. तुमच्या जीवनाच्या ह्या अंगाचा तुम्ही सतत पहिल्याने विचार केला पाहिजे. तुमच्या जिवाला उपद्रवी ठरणारे कोणतेही स्थळ अगर उद्योग तुमच्या उपयोगाचे नाही. तुम्हाला वाटणारी जिवाची काळजी हलकी लेखणारा कोणीही, तुमचा सोबती अगर मित्र होण्याच्या पात्रतेचा नाही. तुमच्या व्यक्तित्त्वाला, तुमच्या मालमत्तेला, तुमच्या शीलाला, इजा करणारा कोणीही मनुष्य तुम्हाला तात्पुरती इजा करीत नसतो. जो तुमच्या जिवाला बिघडवण्याच्या योजना आखतो, तो तुमचा खरा शत्रू आहे.

क्षणभर विचार करा की तुम्हाला या जगात का पाठवण्यात आले आहे. खावे, प्यावे, मजाहजा करावी आणि आपल्या देहाचे लाड पुरवावेत म्हणून नव्हे; केवळ भडक वेशभूषा करावी आणि तुमच्या वासना तुम्हाला चालवतील तसे वाटेल ते करावे म्हणून नव्हे; केवळ काम करावे, झोपावे, हसावे, बोलावे, मौज करावी, आणि वेळेशिवाय कशाचाच विचार करू नये म्हणून नव्हे. मुळीच नाही! तुमच्या बाबतीत याहून उच्च व उत्तम विचार झाला आहे; सर्वकाळासाठी तुम्हाला प्रशिक्षित करण्यासाठी तुम्हाला येथे ठेवण्यात आले आहे. तुमचे शरीर तुमच्या अविनाशी आत्म्याचे घर असावे म्हणून योजले गेले होते. अनेकांप्रमाणेच ते वेगाने देवाच्या योजनेला विरोध करत आहे, जीविताला शरीराचा सेवक बनवत आहे, शरीराला जीविताचा सेवक बनवत नाही. देवाच्या सेवकांना मंडळीला सत्य सिद्धांत शिकवण्यास मदत व्हावी म्हणून १६४६ मध्ये वेस्ट मिनिस्टर कन्फेशन ऑफ फेथ हा विश्वासांगिकार तयार केला (वेस्ट मिनिस्टर असेंब्लिने तो लिहिला) त्याची सुरुवातच पुढील कौतुकास्पद प्रश्न व त्याच्या उत्तराने होते; "मनुष्याचा प्रमुख व उच्च शेवट काय?" "देवाचे गौरव करावे व मग सदासर्वकाळ त्याच्यासोबत सुखानंदात राहावे."

तरुण मनुष्या, देव कोणाची भीडभाड धरत नाही (प्रे. कृ. १०:३४). तो कोणा माणसाच्या वेषभूषेचा, त्याच्या पैशांच्या पाकिटाचा, श्रेणीचा किंवा हृदयाचा आदर करत नाही. तो मनुष्याच्या नजरेने पाहात नाही. महालात मरण पावणाऱ्या अतिश्रीमंत पाप्यापेक्षा झोपडीत मरण पावणारा दरिद्री संत त्याच्या दृष्टीने थोर असतो. देव श्रीमंती, पदव्या, शिक्षण, सौंदर्य किंवा असे काहीही पाहात नाही. देव एकच गोष्ट पाहतो, ती म्हणजे अविनाशी जीव. देव सर्व मानवांना एकाच दर्जाने मापतो. एकच मोजपट्टी, एकच परीक्षा, एकच निकष, तो म्हणजे *त्यांच्या जिवाची अवस्था.*

हे कदापि विसरू नका. सकाळ, दुपार, संध्याकाळ आपल्या जिवाचे कल्याण सतत नजरेसमोर ठेवा. रोज सकाळी प्रगती होणार अशा इच्छेने उठा; रोज संध्याकाळी पडल्या पडल्या स्वत:ला प्रश्न करा, दिवस बरोबर घालवला का? झ्युक्सिस (ख्रि.पू. ४६४-ख्रि पू ३९६) या ग्रीसच्या सुवर्णकाळातील प्राचीन ग्रीक चित्रकाराची आठवण करा. जेव्हा लोकांनी त्याला विचारले, इतके परिश्रम घेऊन प्रत्येक चित्रासाठी तो एवढ्या टोकाच्या यातना का सहन करतो; तेव्हा तो साधे उत्तर देत असे, "मी अनंतकाळासाठी चित्रे रंगवतो." त्याच्यासारखे होण्याची लाज वाटू देऊ नका. तुमच्या मनश्चक्षुंपुढे नेहमी तुमचा अविनाशी जीव ठेवा. आणि जेव्हा लोक तुम्हाला विचारतील की असे का करतोस, तेव्हा त्याच्याच मनोवृत्तीने उत्तर द्या, "मी माझ्या जिवासाठी

जगतो." माझ्यावर विश्वास ठेवा, असा दिवस शीघ्रतेने जवळ येत आहे की लोक तेव्हा फक्त जिवाचाच विचार करतील, आणि एकच महत्त्वाचा प्रश्न असेल, *"माझा जीव तारला गेला आहे की हरवला आहे?"*

ड. देवाची सेवा करणे

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की हे लक्षात ठेवा की तरुण पुरुष असूनही देवाची सेवा करता येते. या मुद्द्यावरून सैतान जे पाश टाकतो त्याबद्दल मला भीती वाटते. ख्रिस्ती तारुण्यात ज्या कल्पना व्यर्थ व अशक्य आहेत अशांनी तुमची मने भरून टाकण्यात सैतानाने यशस्वी होऊ नये असे मला वाटते. कित्येक जण अशा प्रकारे फसवणूक झाल्याने वाहवत गेले आहेत. माझ्या असे ऐकिवात आहे की, "तुम्ही तरुणांकडून फारच धार्मिक अपेक्षा ठेवता, अशक्य गोष्टींची त्यांच्याकडून अपेक्षा ठेवता. तारुण्याचा काळ गंभीर गोष्टींसाठी नाही. आम्हाला उत्कट इच्छा असतात, आणि तुम्ही इच्छा करता तशा आम्ही त्या आपल्या नियंत्रणात ठेवाव्यात असे आमच्याकडून मुळीच अपेक्षित नाही. देवाच्या मनात आहे की आम्ही खूप मौजमजा करावी. कालांतराने धर्माचा विचार करण्याची वेळ येईलच." आणि अशा प्रकारच्या बोलण्याला जग फारच उत्तेजन देते. तारुण्यातील पापे पाहून जग डोळे मिचकावायला सतत टपूनच असते. जगाला वाटते की तरुणांनी आपल्या आयुष्याच्या वाटेवर तारुण्यसुलभ बेताल वर्तन करायला हवे. जग तरुणांविषयी हे गृहीत धरून चालते की त्यांनी धार्मिक असूच नये, आणि त्यांनी ख्रिस्ताला अनुसरणे शक्यच नाही.

तरुण पुरुषा, मी तुला एक साधा सोपा प्रश्न विचारतो: हे सर्व तुला देवाच्या वचनात कोठे आढळेल? जगाचे हे तर्कवितर्क व बोलणे याला आधार देणारी वचने किंवा अध्याय बायबलमध्ये कोठे सापडतील? तरुण व वृद्ध असे भेद न करता बायबल सर्वांशी सारखेच बोलत नाही का? पाप हे पापच नाही का — मग ते तुम्ही २० व्या वर्षी करा, नाहीतर ५०व्या वर्षी करा? न्यायाच्या दिवशी अशी छोटीशी सबब चालणार आहे का, "मला पाप माहीत होते, पण तेव्हा मी तरुण होतो ना?" जरा सारासार विचारशक्ती वापरा अशी मी हात जोडून विनंती करतो, अशा व्यर्थ सबबी सांगू नका. ज्या क्षणापासून तुम्हाला बऱ्यावाईटातील भेद समजू लागला, त्या क्षणापासून तुम्ही देवाला हिशेब द्यायला जबाबदार आहात.

मला माहीत आहे की तरुण पुरुषांच्या मार्गात खूप अडचणी असतात; हे मी अगदी मान्य करतो. पण योग्य ते करणाऱ्यांच्या मार्गातही नेहमीच अडचणी असतात. स्वर्गाचा मार्ग नेहमीच अरुंद असत आला आहे, मग आपण तरुण असू की वृद्ध असू. अडचणी तर आहेतच, पण त्यावर मात करायला देवच आपल्याला कृपा पुरवतो. देव कठोर धनी नाही. तो तसा कधी होणारही नाही, फारोप्रमाणे कडबा न देता विटा बनवायला लावणार नाही (निर्गम ५:१६). मार्गातील साधी कर्तव्ये पार पाडणे अशक्य होणार नाही याविषयी तो काळजी घेईल. त्याने अशा आज्ञा कधीही लादल्या नाही की ज्या पाळायला मानवाला तो सामर्थ्य पुरवणार नाही (१ करिंथ १०:१३). अडचणी असतात, पण पुष्कळ तरुणांनी आतापर्यंत त्यांच्यावर मात केली आहे, आणि तुम्हीही कराल. मोशेलाही तुमच्यासारख्याच तीव्र वासना होत्याच, पण वचन त्याच्याविषयी काय म्हणते पाहा: "मोशेने प्रौढ झाल्यावर आपणास फारोच्या कन्येचा पुत्र म्हणविण्याचे विश्वासाने नाकारले; पापाचे क्षणिक सुख भोगणे यापेक्षा देवाच्या लोकांबरोबर दु:ख भोगणे हे त्याने पसंत करून घेतले; ख्रिस्ताचा अपमान सोसणे ही मिसर देशाच्या धननिधींपेक्षा उत्तम संपत्ती आहे असे त्याने गणले, कारण त्याची दृष्टी प्रतिफळावर होती (इब्री ११:२४-२६). दानीएलने बाबेलात सेवा करायला सुरुवात केली तेव्हा तो तरुण मनुष्य होता. तोही सर्व प्रकारच्या मोहपाशांनी वेढलेला होता. त्याच्या पक्षाचे फार थोडके होते आणि विरोधक भरपूर होते. तरीही दानीएलाचे जीवन

सातत्याने निर्दोष होते, इतके की त्याच्या शत्रूंनाही त्याच्या ठायी "देवाच्या नियमांसंदर्भात सोडल्यास" (दानीएल ६:५), कोणताही दोष आढळून येत नव्हता. असा काही एखादाच दाखला नाही. अशी कितीतरी नावे मी साक्षीदाखल देऊ शकेन. तरुण इसहाक (उत्पत्ती २२), तरुण योसेफ (उत्पत्ती ३९), तरुण यहोशवा (निर्गम १७:९-१४), तरुण शमुवेल (१ शमुवेल २:१८-३:२१), तरुण दावीद (१ शमुवेल १६,१७), तरुण शलमोन (१ राजे ३:४-९), तरुण अबीया (२ इतिहास १३), तरुण ओबद्या (१ राजे १८:३), तरुण योशीया (२ इतिहास ३४,३५), तरुण तीमथी (प्रे. कृ. १६:१-३) यांच्याविषयी बोलू लागलो तर मला वेळ पुरणार नाही. हे काही देवदूत नव्हते, तर त्यांचीही अंत:करणे स्वभावत: तुमच्या सारखीच होती. त्यांनाही अडचणी होत्या व त्यांच्याशी त्यांनाही लढा द्यावा लागला. वासनांचा पाणउतारा करावा लागला, संकटे सहन करावी लागली, त्यांनाही कठीण जागा भराव्या लागल्या — तुम्हा कोणाही सारखेच. पण तरुण असतानाही त्यांना देवाची सेवा करणे शक्य वाटले. असे करता येत नाही या सबबीचाच तुम्ही सातत्याने पाठपुरावा करत राहिलात तर न्यायाच्या दिवशी उठून ते तुम्हाला दोषी ठरवणार नाहीत का?

हे तरुण पुरुषा, देवाची सेवा करायचा *प्रयत्न कर*. सैतान कानात कुजबुजेल की हे अशक्य आहे, तेव्हा त्याला प्रतिकार कर. प्रयत्न करत राहा, अभिवचन देणारा देव तुझ्या प्रयत्नांना बळ देईल. जे त्याच्याकडे येण्याची धडपड करतात, त्यांची भेट घेणे त्याला आवडते. तो तुम्हाला भेटेल आणि तुम्हाला आवश्यक असलेले सामर्थ्य तुम्हाला पुरवील. जॉन बनियन (१६२८-१६८८) याने "यात्रेकरूचा प्रवास" हे पुस्तक लिहिले (१६७८), त्यात प्रमुख भूमिकेत एक ख्रिस्ती व्यक्ती पापाचा भार घेऊन प्रवासाला निघाल्याचे रूपक वापरून त्याचे परिवर्तन, पुढे पवित्रीकरण, मरण आणि गौरवीकरण दाखवताना डोंगर, राक्षस, सिंह यांच्या उपमांनी अनेक देखावे रंगवले आहेत. त्या पुस्तकात या बनियनच्या वाटसरूने ज्या मनुष्याला बोधकाच्या घरी पाहिले, त्याच्यासारखे व्हा: "माझे नाव लिही" असे म्हणत धैर्याने पुढे सामोरे जा. आपल्या प्रभूचे पुढील बोल मी अनेकदा कठोर व भावशून्य शब्दात वारंवार बोललेले ऐकतो,"शोधा म्हणजे तुम्हाला सापडेल, ठोका म्हणजे तुम्हासाठी उघडले जाईल" (मत्तय ७:७). डोंगराप्रमाणे वाटणाऱ्या अडचणी वसंतातील बर्फाप्रमाणे विरघळून जातील. राक्षसाप्रमाणे भासणाऱ्या अडथळ्यांना जर तुम्ही व्यवस्थितपणे तोंड दिले, तर दूरवरच्या दाट धुक्यांप्रमाणे ती झिजून नाहीतशी होतील. तुमच्या वाटेत आड आलेला भयावह सिंह साखळदंडांनी बांधलेला असल्याचे तुम्हाला पुरावादाखल आढळेल. जर लोकांनी अभिवचनांवर अधिक विश्वास ठेवला तर त्यांना कर्तव्यांचे कदापि भय वाटणार नाही. मात्र तुम्हाला मी दिलेला छोटासा बोध धरून ठेवा की जेव्हा सैतान तुम्हाला म्हणेल, "तुम्ही तरुण असताना ख्रिस्ती जीवन जगू शकत नाही, तेव्हा त्याला उत्तर द्या की, "अरे सैताना, माझ्यामागे हो; देवाच्या मदतीने *मी प्रयत्न करणार.*"

ई. बायबलला तुमचा मार्गदर्शक होऊ द्या.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जितके दिवस तुम्ही या भूतलावर आहात तोवर बायबलला तुमचा मार्गदर्शक व सल्लागार राहू द्या. बायबल हे पापी मानवाच्या जीवितासाठी असलेली देवाची तरतूद आहे. मानवाला जर सार्वकालिक जीवन प्राप्त करायचे असेल तर या नकाशाद्वारे तो आपला मार्ग ठरवू शकतो. आपल्याला शांती, पावित्र्य किंवा आनंद प्राप्त होण्यासाठी आपल्याला जे सर्व समजणे अत्यावश्यक आहे, ते सर्व विपुल प्रमाणात त्यात समाविष्ट आहे. जर तरुणाला आपले जीवन उत्तम प्रकारे कसे सुरू करावे याचे ज्ञान हवे असेल, तर दावीद जे म्हणतो ते त्याने ऐकावे: "तरुण आपला वर्तनक्रम कशाने शुद्ध राखील? तुझ्या वचनाप्रमाणे सावधान राहण्याने" (स्तोत्र ११९:९).

हे तरुण मनुष्या, मी तुला आज्ञापितो की बायबल वाचण्याची सवय लावून घे, ही सवय तुटू देऊ नको. सोबत्यांसोबत हास्यकल्लोळ करू नकोस की किंवा कुटुंबातील वाईट चालीरीती पाळत जगू नकोस — अशा कोणत्याही गोष्टीचे या सवयीला अडखळण होऊ देऊ नकोस. तुझ्या जवळ बायबल ठेवावे असा केवळ निर्धार करू नकोस तर बायबल वाचायला वेळ काढ. हे पुस्तक केवळ संडेस्कूलच्या मुलांसाठी व वृद्धांसाठी आहे अशा लोकमताचा पाठपुरावा करून दु:खात पडू नकोस. ह्याच पुस्तकातून दावीद राजाला ज्ञान व समजूतदारपणा ही प्राप्त झाली. हेच ते पुस्तक जे तीमथ्याला बालपणापासून अवगत होते. ते वाचण्याची कदापि लाज वाटू देऊ नकोस. "वचनाचा तिरस्कार करू नको" (नीति. १३:१३).

पवित्र आत्म्याच्या कृपेने ते तुला समजावे म्हणून ते *प्रार्थनापूर्वक वाच*. इंग्लंडमधील एसाफ येथील ॲंग्लिकन बिशप विल्यम बेव्हरीज (१६३७-१७०८) म्हणतात ते बरोबरच आहे, मनुष्याने डोळे नसल्याप्रमाणे भराभर देवाच्या वचनाची अक्षरे वाचणे म्हणजे कृपेशिवाय त्याचा आत्मा समजण्याचा प्रयत्न करणे होय."

ते *आदराने* वाचा. माणसाचे नव्हे तर देवाचे वचन म्हणून वाचा — ते बिनतक्रार या विश्वासाने वाचा की ते ज्याला मान्यता देते तेच योग्य आहे आणि ते ज्याला दोषी ठरवते ते चूकच आहे. जो सिद्धांत वचनांच्या कसोटीस उतरत नसेल, तो चुकीचा आहे असे खात्रीने समजा. म्हणजे तुम्ही पुढे मागे हेलकावत दोलायमान राहाणार नाही, आणि या शेवटच्या काळातील धोक्याच्या मतप्रणालीत वाहवत जाणार नाही. ही खात्री बाळगा की देवाच्या वचनाविरुद्ध असलेली तुमच्या जीवनातील प्रत्येक सवय पापिष्टच आहे आणि ती तुम्ही टाकून दिलीच पाहिजे. त्यामुळे तुमच्या विवेकभावाचे पुष्कळ प्रश्न मिटतील आणि तुमच्या शंकांच्या अनेक गाठी सुटतील. यहूदाच्या दोन राजांनी किती निराळ्या पद्धतींनी देवाचे वचन वाचले याची आठवण करा: यहोयाकीमाने ते वाचले, आणि लागलीच देवाच्या लिखित वचनांचे तुकडे करून अग्नीत ते जाळून टाकले (यिर्मया ३६:२३). आणि का? — कारण त्याचे अंत:करण वचनाविरुद्ध बंड करून उठले व निर्धार केला की त्या वचनांचे मी पालन करणार नाही. योशीयाने ते वाचले, आणि लागलीच कपडे फाडले व मोठ्याने देवाचा धावा केला (२ इतिहास ३४:१९). आणि का? — कारण त्याचे अंत:करण मृदू व आज्ञापालनाचे होते. वचन त्याला त्याचे जे कर्तव्य दाखवील, त्याच्या पालनासाठी वाटेल ते करायची त्याची तयारी होती. या दोहोंपैकी तुम्ही दुसऱ्याप्रमाणे करावे, पण पहिल्यासारखे करू नये!

बायबल *नियमितपणे* वाचा. "वचनात बलवान होण्याचा तो एकच मार्ग आहे" (प्रे. कृ. १८:२४). बायबलवर अधूनमधून घाईघाईने नजर टाकणे फारसे उपयोगाचे ठरणार नाही. असे जर चालू राहिले तर त्यातील खजिन्याशी तुम्ही कदापि परिचित होणार नाही आणि संघर्षाच्या वेळी पवित्र आत्म्याची तलवार तुमच्या हातात घट्ट बसल्याचे तुम्हाला जाणवणार नाही. म्हणून आस्थेने तुम्ही देवाच्या वचनाचे वाचन करून आपल्या मनात ते साठवून ठेवा, लागलीच तुम्हाला त्याचे मोल व सामर्थ्य समजून येईल. मोहपरीक्षांच्या क्षणी ती शास्त्रवचने तुमच्या अंत:करणात उफाळून येतील. शंकांच्या प्रसंगी त्यातील आज्ञा तुम्हाला योग्य ते सुचवतील. निराश झाले असता अभिवचनांचे तुम्हाला स्मरण होईल. अशा प्रकारे दाविदाच्या शब्दांमधील सत्याचा तुम्हाला अनुभव येईल." मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेवले आहे" (स्तोत्र ११९:११). आणि शलमोनाचे शब्द आठवतील, "तू चालशील तेव्हा ज्ञान तुला मार्ग दाखवील; तू निजशील तेव्हा ते तुझे रक्षण करील; तू जागा होशील तेव्हा ते तुझ्याशी बोलेल" (नीति. ६:२२).

मी या गोष्टींवर अधिक मनन करतो कारण हेच वाचनाचे वय आहे. पुष्कळ पुस्तकांचे आपण न थांबता भरभरून कौतुक करू पण त्यातील थोडकीच पुस्तके खरोखर फायदेशीर होतात. नीच दर्जाची पुस्तके छापून प्रकाशित होतात याविषयी संताप केला जातो. सर्व प्रकारच्या वर्तमानपत्रांचा केवढा तरी बुजबुजाट दिसतो. काहींचा खप फार मोठया प्रमाणात होतो, आणि त्यांचे स्वरूप या युगाची आवड किती वाईट आहे हेच दाखवून देते. अशा धोकादायक वाचनाचा पूर वाहात असताना, मी माझ्या धन्याचे पुस्तक तुम्ही वाचावे अशी विनवणी करत आहे — मी तुम्हाला आठवण देत आहे की तुमच्या जिवाचे हे पुस्तक विसरू नका. संदेष्टे व प्रेषितांचे लिखाण तिरस्करणीय लेखून वर्तमानपत्रे, कादंबऱ्या, शृंगारकथा वाचू नका. उन्नती करणाऱ्या व पवित्रीकरणाला उत्तेजन देणाऱ्या लिखाणाला आपल्या मनात जागा न देता भावनोत्कटता आणि नैतिकता व कायदे नियम सोडलेल्या बेताल लिखाणाने तुमचे एकाग्रचित्त गिळंकृत करू नये.

तरुणा मनुष्यांनो, रोजचे जीवन जगताना बायबलला योग्य आदरसन्मान द्या. तुम्ही जे काही वाचत आहात, ते प्रथम वाचा. आणि वाईट पुस्तकांपासून सावध राहा: हल्ली अशी पुस्तके पुष्कळ आहेत. तुम्ही काय वाचता याकडे लक्ष द्या. अशी पुस्तके लोकांच्या कल्पनेपेक्षाही अधिक उपद्रव करतात असे मला वाटते. वचनाशी सुसंगती व संमती किती प्रमाणात आहे ते दर्शवण्यावरून एखाद्या पुस्तकाचे मोल ठरवा. जी पुस्तके वचनाशी अधिक जुळणारी असतात ती वाचण्यासाठी उत्तम ठरवा. जी पुस्तके जास्त विसंगतीच दर्शवतात व तुलनेने मोठी तफावत दाखवतात ती वाईट आहेत असे ठरवा.

फ. देवाशी मैत्री असणाऱ्यांशी मैत्री जोडा

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जो देवाचा मित्र नाही त्याच्याशी घनिष्ठ मैत्री करू नका. माझे म्हणणे समजून घ्या. मी तुमच्याशी फक्त *परिचय असण्याविषयी* बोलत नाही. मला असे म्हणायचे नाही की तुम्ही खरी ख्रिस्ती व्यक्ती सोडून इतरांशी मुळीच संबंध ठेवायचा नाही. या जगात असे वागणे पसंत करणे शक्य नाही आणि अपेक्षितही नाही. ख्रिस्ती मतप्रणालीनुसार कोणाही मनुष्याने विनयशील नसणे अपेक्षित नाही.

पण मी तुम्हाला सल्ला देतो की *मित्रांची* काळजीपूर्वक योग्य निवड करा. एखादा मनुष्य हुशार आहे, आपल्याशी सहमत होणारा आहे, सुस्वभावी आहे, उत्साही आहे, किंवा आणखी काही आहे म्हणून एकदम त्याच्यापुढे आपले अंत:करण खुले करू नका. त्यांच्या परीने या सर्व गोष्टी चांगल्या असतील पण त्याच सर्व काही नाहीत. जो तुमच्या जिवासाठी काही उपयोगाचा नाही अशा कोणाच्याही मैत्रीत तृप्त होऊ नका.

माझ्यावर विश्वास ठेवा की या मसलतीला मी वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देत आहे असे नाही. देवहीन सोबती व मित्राशी संगत सोबत ठेवण्यात उपद्रव होऊ शकतो हे सांगण्यात इजा होण्यासारखे काही नाही. सैतानाला मनुष्याचा जीव धुळीस मिळवायला थोडीफार मदत पुष्कळ झाली. तेवढी तुम्ही दिलीत की मग तुम्ही त्याच्याशी लढण्यासाठी जी शस्त्रास्त्रे धारण केली असतील (इफिस ६:१३-१८), त्यांची तो यत्किंचितही पर्वा करणार नाही. उत्तम शिक्षण, लहानपणापासून लागलेल्या नैतिक सवयी, संदेश, पुस्तके, शिस्तबध्द घरे, पालकांनी लिहिलेली पत्रे या — सर्वांची त्याला बारकाईने माहिती असते. जर तुम्ही देवहीन मैत्रीला बिलगून राहिलात तर ह्या सर्व गोष्टींचा तुम्हाला फारसा फायदा होणार नाही. पुष्कळ खुल्या मोहांना कदाचित तुम्ही प्रतिकार करू शकाल, साधेसुधे पाश नाकारू शकाल; पण एकदा का वाईट मैत्री जडली की तुमचे शांती समाधान संपलेच म्हणून समजा. अम्नोनाने तामारशी केलेले भयंकर दुष्कृत्य ज्या अध्यायात सांगितले आहे, त्या घटनेच्या सुरुवातीलाच म्हटले आहे की, "अम्नोनाचा एक मित्र

होता तो — मोठा चतुर होता" (२ शमुवेल १३:३). एक लक्षात ठेवा की आपण फार अनुकरणप्रिय प्राणी आहोत: विधि नियम आपल्याला शिकवण देतात, पण आपल्यापुढील आदर्श आपल्याला आकर्षित करतात. आपल्या सर्वांबाबतीत हे घडत असते की, आपण ज्यांच्यासोबत राहतो त्यांची आचारपद्धती आपले मन वळवते, आणि जितकी ती माणसे आपल्याला प्रिय होतात तितके त्यांच्याकडे आपले मन अधिक भक्कमपणे वळत राहते. आपल्याला जाणीवही न होता, आपल्यावर त्यांच्या आवडीनिवडी व मतप्रणालींचा प्रभाव पडतो; त्यांना न आवडणाऱ्या गोष्टी आपण हळूहळू सोडून देतो, आणि त्यांना जे आवडते तेच उचलतो कारण आपल्याला त्यांच्याशी अधिक जवळीक साधायची असते. आणि अत्यंत वाईट गोष्ट अशी की त्यांच्यातील चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टीच आपण अधिक पटकन उचलतो. आरोग्य संसर्गजन्य नसते पण रोग संसर्गजन्य असतो. झोंबणारी थंडी लागणे सोपे असते पण आपल्यातली टवटवी व ऊब देणे अवघड असते. परस्परांतील धार्मिकता वाढवून विपुल करण्यापेक्षा ती कमी करत झिजवणे सोपे असते.

तरुण मनुष्यांनो या गोष्टी ऱ्हदयाशी बाळगा. कोणीही तुमचा सततचा सोबती बनण्यापूर्वी, त्याला सारे काही सांगण्याची तुम्हाला सवय जडण्यापूर्वी, आणि तुमच्या कोणत्याही अडचणी किंवा सुखे त्याच्याकडे घेऊन जाण्याची सवय जडण्यापूर्वीच — हे सारे करण्याआधी, मी तुमच्याशी जे काही बोलत आहे, त्यावर विचार करा. आणि स्वत:ला विचारा की, " मला ही मैत्री उपयुक्त ठरेल की नाही?"

हे खरेच आहे की, "कुसंगतीने नीती बिघडते" (१ करिंथ १५:३३). जसे कित्त्यावर अनेकदा गिरवले जाते तसे हे वचन ऱ्हदयपटलावर लिहिले जावे असे मला वाटते. उत्तम मित्र हे आपल्या अनेक आशीर्वादांतील एक आशीर्वाद आहे. ते आपल्याला पुष्कळ अधर्मांपासून दूर ठेवतील, आपल्या मार्गात चैतन्य आणतील, प्रसंगी काही शब्द सुनावतील, आपल्याला उन्नतीप्रत ओढतील, व पुढे नेत राहतील. पण वाईट मित्र नक्की वाईटच घडवून आणणार, त्याचा भार आपल्याला सतत खाली ओढत राहील आणि जगाशी जखडून ठेवील. अधार्मिक मनुष्याशी मैत्री जोडा, अखेर तुम्ही बहुतेक त्याच्या सारखेच होण्याची शक्यता अधिक आहे. अशा मैत्रीचा सर्वसाधारण परिणाम हाच होतो. चांगले जे आहे, ते वाईटासोबत खालीच जाते, पण वाईट चांगल्याकडे कधीच येत नाही. दगड देखील सातत्याने खाली येत असता, मग एक ठराविक दिशा धरतो. जगाचा एक वाक्प्रचार आहे की: "कपडे आणि संगती सोबती शीलाविषयी खऱ्या कथा सांगतात." स्पॅनिश लोकांची म्हण आहे की "एखादा मनुष्य कोठे राहतो ते मला सांगा आणि मग मी तुम्हाला तो कसा आहे ते सांगेन"

या मुद्द्यावर मी बराच उहापोह केला कारण त्याचा पहिल्या दृष्टिक्षेपात दिसते त्यापेक्षा तुमच्या जीवनाच्या भवितव्याशी अधिक संबंध आहे. जर तुम्हाला विवाहबद्ध व्हायचे असेल तर तुम्ही बहुधा तुमच्या मित्रमंडळाशी संबंधितच पत्नी शोधाल. जर यहोशाफाटाचा पुत्र यहोराम याने अहाबाच्या घराण्याशी मैत्री जोडली नसती तर बहुधा त्याने अहाबाच्या कन्येशी विवाह केला नसता (२ राजे ८:१८). विवाहात योग्य निवडीचे महत्त्व किती याचा अंदाज कोण करू शकतो? जुन्या म्हणीप्रमाणे हे पाऊल असे आहे की ते "मनुष्याला घडवते नाहीतर त्याला विरूप बनवते" दोघांच्या जीवनातील आनंद यावर अवलंबून असतो. तुमची पत्नी तुमच्या जिवासाठी सहाय्यक होईल नाहीतर इजा करील: मधली स्थिती नाही. तुमच्या अंत:करणात ती धर्माचा अग्नी वारा घालून तेवत ठेवील , नाहीतर त्यावर पाणी शिंपडून ती मिणमिणती करील. ती तुमच्यासाठी पंख बनेल नाहीतर पायातील बेडी, किंवा लगाम अथवा नाल बनेल. हे तिच्या शीलावर अवलंबून असेल. "ज्याला उत्तम पत्नी लाभते त्याला खरोखर उत्तम लाभ घडतो" (नीति. १८:२२).

अशीच पत्नी लाभावी अशी जर तुमची इच्छा असेल तर आपण मित्र कसे निवडावेत याविषयी दक्षता बाळगा.

कशा प्रकारचे मित्र निवडावेत हे मला विचारू नका. असे मित्र निवडा, ज्यांचा तुमच्या जिवाला फायदा होईल, ज्यांचा तुम्हाला खरोखर आदर वाटेल, तुम्ही मृत्युशय्येवर असताना जे तुम्हाला आपल्या जवळ असल्यास आवडेल, ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाच्या वेळी आणि न्यायाच्या दिवशी ते आपले आहेत असे म्हणण्याची तुम्हाला लाज वाटणार नाही असे मित्र करा. दावीद तुमच्यापुढे ठेवत असलेला आदर्श तुम्ही अनुसरा: तो म्हणतो, "तुझे भय धरणाऱ्या सर्वांचा, तुझे विधी पाळणाऱ्यांचा, मी सोबती आहे" (स्तोत्र ११९:६३).
शलमोनाचे शब्द आठवा: "सुज्ञांची सोबत धर म्हणजे सुज्ञ होशील; मूर्खाचा सोबती कष्ट पावतो" (नीतिसूत्रे १३:२०). मूर्खांवर अवलंबून राहू नका: आता वाईट संगत धरली असेल तर आयुष्याच्या येणाऱ्या दिवसात त्याहून वाईट संगत तुम्ही प्राप्त कराल."

४. तरुण मनुष्यांसाठी खास नियम

शेवटी सर्व तरुण पुरुषांनी पाळावेत असे आचारसंहितेचे काही नियम सल्ला म्हणून मी प्रकर्षाने मांडू इच्छितो.

अ. प्रत्येक पापाशी लढून मुक्त व्हा
देवाच्या सहाय्याने तत्परतेने एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्धार कर, तो म्हणजे प्रत्येक माहीत असलेले पाप, मग ते कितीही छोटे असले तरी ते तोडून टाका. तुम्हांपैकी प्रत्येक जण आपल्या अंतर्यामात डोकावून पाहा. आपल्या स्वत:च्या अंत:करणाची झडती घ्या. तुम्हाला देवाच्या दृष्टीने चूक असलेली एखादी सवय किंवा प्रघात तेथे आढळतो का ते पाहा. आढळला, तर क्षणाचाही विलंब न लावता त्यावर हल्ला चढवा. ते दूर करण्याचा लागलीच निर्धार करा.

चालू दिलेले पाप जितके मन:श्चक्षू अंध करते व जितका विवेकभाव मृत करते तितका खात्रीने दुसऱ्या कशानेही होत नाही. ते पाप फारच क्षुल्लक असेल, पण तरीही ते हा सर्व दुष्परिणाम घडवून आणण्यास धोकादायक असते. जहाजाला पडलेले लहानसे छिद्रही मोठे जहाज बुडवायला पुरेसे असते, आणि लहानशी ठिणगीही मोठी आग लागण्यास कारणीभूत होते — त्याचप्रमाणे मुभा देण्यात आलेले छोटेसे पापही अविनाशी आत्मा धुळीस मिळवायला पुरेसे असते. माझा सल्ला गांभीऱ्याने स्वीकारा आणि लहानसे पापही सोडू नका. इस्राएलांना आज्ञा होती की प्रत्येक लहान मोठ्या कनान्याचा वध करावा. तेच तत्त्व येथे लागू करा. आणि क्षुल्लक पापालाही दयामाया दाखवू नका. गीतरत्न जे म्हणते ते योग्यच आहे की, "द्राक्षींच्या मळ्यांची नासधूस करणाऱ्या खोकडांस, त्या *लहान* कोल्ह्यांस आम्हासाठी धरा" (गीतरत्न २:१५).

हे नक्की समजा की दुष्ट मनुष्य सुरुवातीला कधीही दुष्ट समजला जात नसतो. पण आरंभी तो काही *छोटे छोटे* व्यवहार घडू देण्याची मुभा घेतो, आणि मग मोठमोठ्या गोष्टी करण्यास धजावतो. त्यातून आणखी मोठ्या गोष्टी घडवून आणतो, त्यामुळे त्याला आताची दुरावस्था प्राप्त होते. जेव्हा हजाएलाने अलीशाकडून तो एक दिवस किती भयानक कृत्ये करणार आहे हे ऐकले, तेव्हा आश्चर्याने तो उद्गारला, "आपला दास तर कुत्रा आहे, तो असली भारी कृत्ये कशी करणार?" (२ राजे ८:१३). पण त्याने पापाला आपल्या ऱ्हदयात मूळ धरू दिले, आणि शेवटी त्याने ती सर्व पापे केली.

तरुण मनुष्या, सुरुवातीलाच पापाला प्रतिकार कर. ते लहानसेच व क्षुल्लक वाटेल, पण मी जे काही म्हणतो त्याकडे कान दे: त्यांचा प्रतिकार कर, तडजोड करू नकोस, कोणत्याही पापाला हळूच कसलाही व्यत्यय न येता तुझ्या अंत:करणात विसावू देऊ नकोस. एक जुनी म्हण आहे की, "अनर्थाची माता चिलटाच्या पंखापेक्षा मोठी नसते." सुईच्या टोकापेक्षा काही सूक्ष्म नसते. पण तिने एक छिद्र पाडले की पुढे ती सारा धागा ओढत नेते. प्रेषिताचे बोल लक्षात ठेवा, "थोडे खमीर सगळ्या गोळ्याला फुगवते,"(१करिंथ ५:६).

अनेक तरुण पुरुष तुम्हाला खेदाने व लज्जेने सांगतील की त्याने आपल्या जगिक भवितव्याच्या विनाशाचा पाठपुरावा केल्यास त्याला तो मी सांगत असलेल्या मुद्द्याशीच आणतो: की त्याने सुरुवातीलाच पापाला मोकळी वाट करून दिली. छोट्याछोट्या गोष्टीत खोटेपणा व अप्रामाणिकपणाची सवय लागू दिली, त्या गोष्टी त्याच्यामध्ये वाढून मोठ्या झाल्या. पावलागणिक तो वाईटापासून अधिक वाईटाकडे जात राहिला, इतका की अखेर एके काळी ज्या गोष्टी त्याला अशक्य वाटत होत्या त्याच त्याने केल्या — तोवर त्याने आपले स्थान गमावले, आपले शील गमावले, आपले सुखसमाधान गमावले, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपला आत्मा गमावला. आपल्या विवेकभावाच्या तटबंदीला त्याने फट पडू दिली कारण त्याला ती क्षुल्लक वाटली; पण एकदा मुभा मिळताच ती फट दररोज मोठी होऊन वाढत गेली, आणि अखेर संपूर्ण तटबंदीच कोसळली.

प्रामाणिकपणा व सत्यतेच्या बाबतीत हे खास लक्षात घ्या. क्षुल्लक गोष्टींविषयीही विवेकभाव जागृत ठेवा; "जो अल्प गोष्टींविषयी विश्वासू आहे, तो पुष्कळ गोष्टींविषयीही विश्वासू आहे" (लूक १६:१०). जग काहीही म्हणण्यात आनंद मानो, पण क्षुल्लक पाप अशी गोष्टच नसते. सर्व भव्य इमारती छोट्या छोट्या भागांनी बनवलेल्या असतात. पहिला दगड इतर सर्व दगडांइतकाच महत्त्वाचा असतो. सर्व सवयी एकापाठोपाठ घडणाऱ्या छोट्या छोट्या कृतींनी आकार घेतात आणि पहिली छोटीशी कृती मोठया परिणामांचे मूळ ठरते. नीतिकथेतील कुऱ्हाड तिचा दांडा बनवण्यासाठी वृक्षाला लाकडाच्या थोडयाशा तुकडयाची विनंती करते व मग त्याला आणखी त्रास देणार नसल्याची हमी देते. मात्र ते लाकूड मिळताच प्रथम तोच वृक्ष छाटून टाकते. तुमच्या अंत:करणात पाचरीएवढी जागा मिळण्याच्या संधीची पाप वाटच पाहत असते, की मग लागलीच तुम्ही पूर्णपणे त्याच्या कह्यात जाता. प्राचीन काळचे इंग्लिश प्युरिटन पाळक व लेखक विल्यम ब्रिज (१६३७-१७०८) यांचे सुज्ञतेचे बोल आहेत की, "आपण आणि देव या दोहोंच्या मध्ये छोटेसे काहीच नाही, कारण देव अमर्याद आहे.

चर्चच्या मनोऱ्यावरून खाली यायला दोनच मार्ग असतात: एक म्हणजे वरून खाली उडी मारायची आणि दुसरा, पायऱ्यांनी खाली उतरायचे — पण दोन्ही मार्ग तुम्हाला तळाशीच घेऊन जातात. तसेच नरकाला जाण्याचेही दोन मार्ग आहेत: एक म्हणजे उघड्या डोळयांनी त्यात प्रवेश करणे — काही लोक असे करतात. दुसरा म्हणजे छोट्या छोट्या पापांच्या पायऱ्यांनी त्यात उतरत जाणे, मला वाटते हा मार्गच सर्वसामान्यपणे वापरला जातो. थोडी पापे चालू राहू द्या, तुम्हाला आणखी अधिक पापे करावीशी वाटतील. विदेशी रोमी कवी (इ.स.३४-१२०) सुध्दा उपहासाने म्हणतो, "एकच पाप करून कोणाचे समाधान झालेय?" मग — दर वर्षी तुमचा मार्ग नियमितपणे वाईटाकडून अधिक वाईटाकडेच जात राहील. जेरेमी टेलर मनुष्यामधील पापाच्या प्रगतीचे वर्णन योग्यच करतो: तो म्हणतो, "प्रथम पाप त्याला दचकावते, मग त्याला त्याची गंमत वाटते, मग ते सहजसुलभ वाटते, मग त्यातून आनंद मिळतो, मग ते वारंवार हातून घडत राहते, मग ते सवयीचे होते, मग ते ठाम राहाते — मग मनुष्य पश्चात्तापहीन बनतो, मग हट्टी होतो, मग कधीही पश्चात्ताप न करण्याचा निर्धार करतो, आणि मग कायमचा शिक्षेस पात्र ठरतो.

तरुण मनुष्या, तुला जर येथवर असे यायचे नसेल तर आज जो नियम मी तुला देत आहे तो पुन्हा आठव: प्रत्येक ज्ञात असलेले पाप ताबडतोब थांबवण्याचा निर्धार कर.

ब. पापाची प्रत्येक संधी टाळा

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे देवाच्या सहाय्याने असा निर्धार कर की जी प्रत्येक गोष्ट पापाची संधी उपलब्ध करणारी असल्याचे सिद्ध होईल त्या प्रत्येक गोष्टीपासून दूर राहा. नॉर्विच येथील सुप्रसिद्ध ॲंग्लिकन बिशप जोसेफ हॉल (१५७४-१६५६) यांचे उत्कृष्ट विधान आहे की, "जर कोणाला अधर्माच्या कृत्यांपासून दूर राहायचे असेल तर त्याने त्याविषयींच्या संधी विस्तृत प्रमाणात टाळल्या पाहिजेत." एक प्राचीन नीतिकथा आहे की एका फुलपाखराने एकदा घुबडाला विचारले, माझ्या पंखांना आगीची सूचना मिळतेय तिच्याशी मी कसा मुकाबला करू; घुबडाने उत्तरादाखल त्याला सल्ला दिला, तिच्या धुराकडेही निरखून पाहत राहू नकोस.

पाप न करण्याचा निर्धार करणेच फक्त पुरेसे नाही; तर त्याच्या सर्व बाजूंनी होणाऱ्या आक्रमणापासून आपण काळजीपूर्वक अंतर ठेवले पाहिजे. याची पारख करण्यासाठी आपण आपला वेळ कसा वापरतो ते पाहिले पाहिजे — कोणती पुस्तके वापरतो, कोणत्या कुटुंबांना आपण भेटी देतो, कोणत्या प्रकारच्या समाजात आपण वावरतो. आपण असे म्हणून समाधान मानू नये की, "येथे काही चुकीचे चाललेय असे दिसत नाही" तर पुढे जाऊन असे म्हणावे की "पापाची संधी उपलब्ध होऊ शकते असे काही पुरावे इथे आढळतात का?"

याच एका मोठ्या कारणासाठी *आळशीपणा* प्रकर्षाने टाळायला हवा हे लक्षात ठेवा. निष्क्रिय राहणे वरवर फारसे दुष्ट दिसत नाही. पण ते वाईट विचार व व्यर्थ कल्पनांच्या संधी उपलब्ध करून देते. सैतानाला वाईटाची बीजे पेरण्यासाठी तो सताड उघडा दरवाजा आहे — ह्यामुळेच त्याची भीती बाळगावी. यरुशलेमात असताना दाविदाने आळसामुळे गच्चीत जाउन सैतानाला संधी उपलब्ध करून दिली नसती तर कदाचित त्याने बथशेबाला कधीच पाहिले नसते आणि उरीयाचा वधही केला नसता (१ इतिहास २०:१).

ह्याच एका कारणास्तव *जगिक मौजमजा* आक्षेपार्ह वाटतात. काही प्रसंगी हे दाखवणे कठीण जाते की त्यांच्यात खरोखर काही चूक किंवा वचनाला धरून नसलेले आहे का. पण बहुतेक अशा सर्व गोष्टींचा *कल* आत्म्याला उपद्रव करण्याकडे आहे हे दाखवण्यात मात्र फारशी अडचण येत नाही. त्या मनाच्या चौकटीत जगिक व इंद्रियांच्या वासनांची बीजे रुजवतात. त्या विश्वासाच्या जीवनाविरुद्ध लढा देतात. त्या रोगट, अनैसर्गिक वासनांविषयी चैतन्य निर्माण करायला हातभार लावतात. त्या देहाची वासना, डोळ्यांची वासना आणि संसाराची फुशारकी यांची सेवा करतात (१ योहान २:१६). स्वर्ग व चिरकालिक जीवनाचे दृश्य त्या अंधुक करून टाकतात. आणि चालू युगाच्या गोष्टींचे खोटे व भडक चित्र डोळ्यांसमोर ठेवत राहतात. खाजगीतील प्रार्थनेचा आत्मा, देवाच्या वचनाचे वाचन याविषयी त्या नाखुषी निर्माण करतात, आणि देवाशी सुसंवाद करणे गोठवून टाकतात. जो मनुष्य या गोष्टींमध्ये आपला वावर ठेवतो, तो सैतानाला मोक्याच्या जागा देणाऱ्यासारखा असतो. त्याला एक युध्द करायचे असते आणि तो आपल्या शत्रूला सूर्य, वारा आणि डोंगराची मदत देऊ करतो. सतत तोच मात करील असे दृश्य तो पाहू शकला तर ती एक चमत्कारिक गोष्ट ठरेल.

तरुण मनुष्या, तुझ्या ठायी जे आहे ते तुझ्या जिवाला उपद्रव करणाऱ्या सर्व गोष्टींपासून शुद्ध ठेवण्यास होईल तितके कर. सैतानासमोर पेटती मेणबत्ती धरू नको. लोक म्हणतील की तू देवाचे नीतिनियम कडकपणे पाळण्यात विशेष दक्षता बाळगणारा आहेस, या या गोष्टी फार उपद्रवी असल्याचे कुठे आढळते? पण त्यांच्या या बोलण्याची दखल घेऊ नकोस. धारदार हत्यारांशी

खेळणे धोक्याचे असते; तुमच्या अविनाशी आत्म्याशी स्वैरपणे वागणे तर त्याहून धोक्याचे असते. जो सुरक्षित राहणार असेल त्याने धोक्याच्या काठाशी येऊच नये. त्याने आपल्या अंत:करणावर दारुगोळ्याच्या कारखान्याप्रमाणे पाळत ठेवली पाहिजे. मोहाची एक ठिणगी पडणेही उपाय करण्यापलीकडचे आहे हे लक्षात घेऊन त्याने सावधगिरी बाळगली पाहिजे.

जर मोहांमुळे धुळीस मिळू नये आणि मोहपाशांच्या मार्गांपासून दूर राहावे अशी इच्छा बाळगण्याची तुम्ही स्वत: दक्षता बाळगली नाही, "आणि आम्हास परीक्षेत आणू नकोस तर आम्हास वाईटापासून सोडीव"(मत्तय ६:१३), अशी प्रार्थना करत राहिलात तर त्याचा काय उपयोग? योसेफाचे उदाहरण घ्या: त्याने आपल्या मालकिणीशी लगट करण्याच्या पापाला नकार तर दिलाच पण तिच्याशी अजिबात "शारीरिक जवळीक" होऊ न देण्याची सुज्ञता दाखवली (उत्पत्ती ३९:१०). शलमोनाचा सल्ला ऱ्हदयाशी बाळगा, दुष्टाच्या मार्गाने चालू नको इतकेच नव्हे तर "त्यापासून दूर राहा, त्याजवळून जाऊ नको, त्यापासून मागे फिर आणि आपल्या मार्गाला लाग" (नीति. ४:१५). केवळ मद्यधुंद होऊ नकोस एवढेच नाही तर "द्राक्षारस कसा तांबडा दिसतो याकडे *पाहत* बसू नकोस"(नीति. २३:३१). इस्राएलांमध्ये जर कोणी नाजीर होण्याचा नवस केला असेल तर त्याने मद्य सेवन करायचे नसे एवढेच नाही तर कोणत्याही स्वरूपाच्या द्राक्षीच्या उत्पन्नापासून अलिप्त राहायचे असे. पौल रोमकरांना रोम १२:९ मध्ये केवळ वाईट करू नका तर "वाईटाचा *वीट माना*," असे म्हणतो. तीमथीला तो लिहितो, "तरुणपणच्या वासनांपासून दूर *पळ*" (२ तीमथ्य २:२२). जितके त्यापासून दूर राहता येणे शक्य आहे तितके दूर राहा. अरे बापरे! अशी दक्षता बाळगणे किती गरजेचे आहे! गरज नसताना दीना दुष्ट शखेमकरांची जीवनरहाटी बघायला गेली आणि आपले शील गमावून आली (उत्पत्ती ३४:१,२). लोटाने पापी सदोमापाशी आपला डेरा दिला आणि त्याने जीव सोडून सारे काही गमावले (उत्पत्ती १९:१७).

तरुण पुरुषांनो, वेळीच सावध व्हा. आपल्या आत्म्याच्या शत्रूला आपल्या कितपत जवळ येण्याची मुभा द्यावी आणि स्वत:ला सुरक्षितही राखावे याच्याच प्रयत्नात सतत राहू नका. त्याला हाताच्या अंतरापासूनही दूर ठेवा. मोहपरीक्षांपासून शक्यतो स्वत:ला शुद्ध ठेवा त्यामुळे पापापासून शुद्ध राहायला मोठी मदत होईल.

क. देवाच्या नेत्रांचा कधीही विसर पडू देऊ नका

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे देवाच्या नेत्रांचा विसर पडू न देण्याचा निर्धार करा. देवाचे नेत्र!! विचार करा. सगळीकडे, प्रत्येक घरात, प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक खोलीत, प्रत्येक संगतीसोबतीत, एकटे अगर गर्दीत, तुम्ही कोठेही असा, देवाचे नेत्र तुमच्यावर असतात." परमेश्वराचे नेत्र सर्वत्र आहेत, ते बरेवाईट पाहात असतात" (नीति. १५:३). आणि ते नेत्र अंत:करण आणि कृती दोन्ही पाहत असतात.

मी तुम्हा सर्वांना विनवणी करतो की हे सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करा. हे लक्षात ठेवा की सर्व काही पाहणाऱ्या देवाशी तुमचा व्यवहार आहे. त्या देवाला कधी झोपही येत नाही की डुलकीही लागत नाही (स्तोत्र १२१:४). तो तुमच्या मनचे विचार दुरून ओळखतो, रात्रही त्याच्यासमोर दिवसासारखी प्रकाशते (स्तोत्र १३९:२,१२). तुम्ही त्या उधळ्या पुत्राप्रमाणे आपल्या बापाचे छत सोडून दूर देशाला जाल (लूक १५:१३), आणि तुम्हाला वाटेल की तिथे तुमच्या वर्तनावर पाळत ठेवायला कोणी नाही — पण तुमच्यापूर्वी देवाचे कान व नेत्र तेथे हजर असतात. तुम्ही आपल्या पालकांना किंवा मालकांना फसवू शकाल; त्यांच्याशी खोटे बोलाल, त्यांच्यासमोर एक आणि त्यांच्यामागे दुसरेच वर्तन कराल — पण देवाला तुम्ही फसवू शकत नाही. तो तुम्हाला अगदी बारकाईने सर्वस्वी जाणतो. आज येथे हजर असता तुम्ही काय बोललात हे

देखील तो जाणतो. या क्षणी तुमच्या मनात काय विचार चालू आहेत हे तो जाणतो. तुमची अगदी गुप्त पातके त्याच्या मुखप्रकाशात आहेत. तुम्ही सावधान राहिला नाहीत तर ती एक दिवस तुम्हाला लाजिरवाणे करीत जगासमोर उघड होतील (१ करिंथ ४:५).

ह्याची जाणीव आपल्याला किती अल्प प्रमाणात असते! आपल्याला कोणीतरी पाहत आहे याची तरुणांनी जाणीव ठेवली असती तर सतत करीत असलेल्या कित्येक गोष्टी त्यांनी केल्या नसत्या. कल्पना विश्वातील कोठडीत जे कित्येक व्यवहार घडतात ते दिवसाच्या प्रकाशात केले नसते. तरुण पुरुष एकांतात अनेक विचार मनात बाळगून ठेवतात, खाजगीत काही शब्द बोलतात, खाजगीत काही कृत्ये करतात, ती कृत्ये जगापुढे उघड झाल्यास त्यांना लाज वाटेल अशी असतात. कोणाच्या तरी पावलांची चाहूल लागल्याने कित्येक दुष्ट कृत्यांस आळा बसल्याचे घडले आहे. दारावर थाप पडल्याने कित्येक पापकृत्ये घाईने थांबवून तातडीने बाजूला सारली गेली आहेत. पण हे सारे किती दरिद्री व मूर्खपणाचे आहे! आपण जेथे कोठे जाऊ तेथे आपल्याला प्रत्यक्ष पाहाणारा साक्षीदार असतोच. दाराला कडी लावा, डोळ्यांवर झापड आणा, खिड्यांच्या झडपा लावा, बत्ती विझवा — त्याचा काहीही फायदा होणार नाही. देव सर्वत्र आहे: तुम्ही त्याला कोंडून ठेवू शकत नाही आणि तुम्हाला पाहण्यापासून त्याला प्रतिबंध करू शकत नाही. "त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही सृष्ट वस्तू नाही; तर ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडेवाघडे आहे" (इब्री ४:१३). जेव्हा मालकिणीने मोह आणला तेव्हा तरुण योसेफाला हे चांगलेच समजलेले होते त्याला पाहील असे घरात कोणी हजर नव्हते की कोणी मानवी नेत्र त्याच्याविरुद्ध साक्ष द्यायला नव्हते. पण योसेफ अदृश्य देव पाहत असल्याप्रमाणे जगणारा होता. तो म्हणाला,"एवढे घोर कर्म करून मी देवाचा अपराधी कसा होऊ?"(उत्पत्ती ३९:९).

तरुणांनो, मी तुम्हाला मी स्तोत्र १३९ वाचा असा बोध करत आहे. तुम्ही ते पाठ करावे असे मी तुम्हाला सुचवतो. जगाचे व्यवहार करताना त्यातून कसोट्या लावा: नेहमी स्वत:ला विचारा, " देव मला पाहातो याचे मला स्मरण आहे ना?"

देवाच्या नजरेसमोर असल्याप्रमाणे जीवन जगा. अब्राहामाने हेच केले; तो देवासमोर *चालला.* हनोखाने हेच केले: तो *देवासमागमे चालला.* स्वर्ग असाच असेल: देवाचे चिरकाल सान्निध्य असेल. देवाला रुचणार नाही असे काहीच *करूच* नका. देवाला ऐकायला आवडणार नाही असले काही *बोलू* नका. तुम्ही लिहिलेले जे देवाला आवडणार नाही असे काही *लिहू* नका. जेथे गेल्यास देव तुम्हाला शोधून काढील अशा स्थळी *जाऊ* नका. ज्या पुस्तकाविषयी देवाने तुम्हाला "मला दाखव" असे विचारलेले तुम्हाला आवडणार नाही असे पुस्तक तुम्ही *वाचू* नका. "तू काय करत आहेस?" असे देवाने विचारलेले तुम्हाला आवडणार नाही असे काही करण्यात वेळ घालवू नका.

ड. सार्वजनिक कृपेच्या सर्व साधनसंपत्तीचा वापर करा

कृपेची साधने

महत्वाची गोष्ट अशी की सार्वजनिक कृपेच्या सर्व साधनसामग्रीचा परिश्रमपूर्वक वापर करा. (कृपेची साधनसामग्री म्हणजे मनुष्याच्या अंत:करणात तारण व पवित्रीकरण सिद्धीस नेण्यासाठी जी साधने वापरण्यास देव संतुष्ट असतो.) जेव्हा जेव्हा संदेश व प्रार्थनेसाठी देवाचे मंदिर खुले असेल तेव्हा तेव्हा नियमितपणे जा, तथे हजर असणे तुमच्या हातात आहे. प्रभूचा दिवस नित्यनेमाने पवित्रपणे पाळा, आणि असा निर्धार करा की सात दिवसांपैकी प्रभूचा हा दिवस तुम्ही येथून पुढे नेहमी त्याच्या हक्काच्या मालकासाठीच वापराल.

मी तुमच्या मनावर चुकीचा प्रभाव कधीही पाडणार नाही. असे सांगत सुटू नका की मी तुम्हाला शिकवले की चर्चच्या नित्यनेमाच्या गोष्टी करणे म्हणजे संपूर्ण धर्मपालन आहे. असे काही मी तुम्हाला मुळीच सांगत नाहीये. मला तुम्ही औपचारिक गोष्टी करणारे परूशी बनवायचे नाहीये. (परूशी म्हणजे प्राचीन काळचा यहूद्यांचा एक लोकगट होता, ते यहूदी परंपरांचे कडक पालन करणारे होते आणि त्यामुळे इतरांशी धार्मिकतेची तुलना करण्याच्या गर्वाचे पाप ते करत होते) जर तुम्हाला वाटत असेल की एखाद्या विशिष्ट इमारतीत, एका ठराविक वेळी, आठवड्याच्या एखाद्या ठराविक दिवशी शरीराने हजर राहण्याने तुम्ही ख्रिस्ती होता व देवाला भेटण्यास सज्ज होता, तर मी तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगतो की तुमची अगदी खेदजनक फसवणूक झाली आहे. अंत:करणपूर्वक नसलेली कोणतीही भक्ती व्यर्थ असून काही उपयोगाची नाही. तेच खरे आराधक आहेत, "जे आत्म्याने व खरेपणाने देवाची उपासना करतात": देव अशा उपासकांच्या शोधात आहे (योहान ४:२३).

पण कृपेची साधने तारण करणारी नाहीत म्हणून त्यांना तुच्छ लेखायचे नाही. सोने काही खाद्य नसते; तुम्ही ते खाऊ शकत नाही. पण म्हणून ते निरुपयोगी आहे असे म्हणून तुम्ही ते फेकून देऊ शकत नाही. तुमच्या जिवाचे *सार्वकालिक* कल्याण कृपेच्या साधनांवर अवलंबून नाही; पण हे देखील खात्रीपूर्वक खरे आहे की त्यांच्याशिवाय तुमचा जीव उत्तम काही करू शकणार नाही; हा सर्वसामान्य नियम आहे. देव *कदाचित* एलीयाला नेल्याप्रमाणे सर्व तारण पावलेल्यांना अग्निरथांमधून स्वर्गाला घेऊन जाईल (२ राजे २:११); पण तसे तो करत नाही. तो त्या सर्वांना दृष्टांत, स्वप्ने, चमत्कारिकपणे मध्यस्थी करून, स्वत:चा काही विचार न करता त्यांना काही वाचनाची गरज भासू न देता *शिकवू शकतो*, पण तो तसे करत नाही. आणि का करत नाही? कारण हा देव साधनांचा वापर करून काम करतो, आणि त्याचा तो नियमच आहे की सर्व मानवांशी व्यवहार करताना तो त्याची साधनसामग्रीच वापरणार. मूर्ख माणूस शिड्या आणि माचोळ्यांचा वापर न करता उतावळेपणाने घर बांधील, पण उलट शहाणा मनुष्य अशा साधनांना मुळीच तुच्छ लेखणार नाही.

या मुद्द्यावर मी जरा अधिक उहापोह करू इच्छितो कारण साधनसामग्रीच्या विरोधातील वादांनी सैतान तुमची मने भरील. किती माणसे त्या साधनसामग्रीचा वापर करतात या आकडेवारीकडे तो तुमचे लक्ष वेधील आणि ती वापरणे उपयोगाचे नसल्याचे तुम्हाला भासवील. तो कुजबुजेल, "ते बघ, जे चर्चला जातात, ते चर्चला न जाणाऱ्यांपेक्षा काही फारचांगले नाहीत हे तुला दिसते ना?" पण यामुळे तुम्ही ढळू नका. एखादी गोष्ट योग्य प्रकारे वापरली नाही म्हणून त्यावर वाद घालत बसणे योग्य नाही. कृपेची साधने काही चांगले घडवू शकत नाहीत म्हणून त्यांचा पाठपुरावा करायला नको कारण पुष्कळ लोक त्यांचा वापर करूनही त्यांच्यावर काही चांगला परिणाम झाल्याचे दिसत नाही असे नसते. पुष्कळ लोक औषध घेतात पण बरे होत नाहीत म्हणून आपण औषधांचा तिरस्कार करू शकत नाही. इतर लोक अयोग्य प्रकारे खातात पितात म्हणून कोणी मनुष्य खाणे पिणे सोडून देण्याचा विचार करून आजारी पडत नाही. इतर गोष्टींप्रमाणेच कृपेची साधने मोलाची आहेत; पण आपण त्यांचा वापर कोणत्या वृत्तीने व पद्धतीने करतो यावर सर्व काही मोठ्या प्रमाणात अवलंबून असते.

सुवार्तेची घोषणा

हा देखील मुद्दा मी विचारात घेत आहे, कारण प्रत्येक तरुणाने नियमितपणे ख्रिस्ताच्या सुवार्तेची घोषणा ऐकायला हवी असे मला वाटते. ह्याचे महत्त्व किती अपार आहे ते मी तुम्हाला शब्दांत व्यक्त करू शकत नाही. देवाच्या आशीर्वादाने, सुवार्तेची सेवा तुमच्या जिवाच्या *परिवर्तनाचे* साधन होऊ शकेल, तुम्हाला ख्रिस्ताविषयीच्या तारणाच्या ज्ञानात चालवू शकेल, सत्यात व

कृत्यात तुम्हाला देवाचे मूल बनवू शकेल. या कारणास्तव आपण सर्वकाळ आभारी असायला हवे. या घटनेमुळे देवदूत स्वर्गात आनंद करतात. असे घडले नसले तरी सुवार्तेच्या सेवेत *नियंत्रणाखाली* ठेवण्याचे प्रभावी सामर्थ्य आहे. त्या नियंत्रणाखाली प्रत्येक तरुणाने यावे अशी मी कळकळीची इच्छा करतो. अजून जे देवाकडे वळले नसतील अशा हजारो जणांना ती पापापासून दूर राखते. सुवार्तेमुळे ते जरी अजून तारण पावलेले ख्रिस्ती झाले नसतील तरी ते समाजाचे उत्तम नागरिक बनले आहेत. सुवार्तेच्या विश्वासूपणे केलेल्या घोषणेमध्ये एक रहस्यमय सामर्थ्य आहे. ती ऐकून अंत:करणाने स्वीकार करणाऱ्या मोठ्या लोकसमुदायाला ती चैतन्य देते. पापाविषयीचा ओरडा आणि पावित्र्याविषयीची स्तुती ऐकणे; ख्रिस्ताला उंचावलेले व सैतानाच्या कृत्यांविषयी स्पष्ट बोललेले ऐकणे, स्वर्गाचे राज्य व त्यातील आशीर्वादांचे वर्णन ऐकणे, जग व त्याची रिक्तता उघड केलेली ऐकणे — रविवारमागून रविवार, आठवड्यांमागून आठवडे हेच ऐकणे याचा जिवावर सुपरिणाम झाला नाही असे क्वचितच होते. मग ती सुवार्ता कोणत्याही दुराचाराला व गोंधळाच्या अशांततेला मोकळी वाट मिळणे कठीणच करून टाकत राहते. मनुष्याच्या अंत:करणावर ती पूर्ण ताबा ठेवण्याचे काम करते. देवाचे पुढील वचन या प्रकारे सुपरिणाम करते असे मला वाटते: "माझे वचन — माझ्याकडे विफल होऊन परत येणार नाही" (यशया ५५:११) इंग्लिश सुवार्तिक जॉर्ज व्हीटफिल्ड (१७१४-१७७० यांचा जन्म ग्लुसेस्टर येथे इंग्लंडमध्ये झाला होता. विद्यार्थी दशेत असताना त्यांनी वेल्स्लीसोबत काम केले होते. खुल्यावर सुवार्ता सांगण्याचे काम केले. देवाने त्यांचा "महासंजीवनाच्या" काळात इंग्लंड व अमेरीकन वसाहतीत खूप वापर करून घेतला) यांच्या म्हणण्यात महान सत्य आहे, "तुरुंगे मनुष्याला नरकापासून राखू शकत नाहीत, पण सुवार्ता अनेकांना तुरुंगांपासून राखते."

प्रभूचा दिवस

या विषयाला जवळचा आणखी एक मुद्दा मला येथे मांडू द्या. कशानेही तुम्हाला प्रभूचा दिवस मोडायचा मोह होऊ देऊ नका. मी याकडे आग्रहाने तुमचे लक्ष वेधू इच्छितो. जाणीवपूर्वक संपूर्ण प्रभुवार देवाला द्या. या पवित्र दिवसाविषयीची अनादराची वृत्ती दिवसेंदिवस वेगाने भयंकर वाढत आहे, आणि तरुणांमध्ये ती काही कमी नाही. रविवारी प्रवास, नौकाविहार, भेटीगाठी, सहली आयोजित केल्या जाणे हे दरवर्षी पूर्वीपेक्षा अधिक अंगवळणीचे पडत चालले आहे, आणि मनुष्याच्या जिवाला त्याचा विस्तृत प्रमाणात उपद्रव होत आहे.

हे तरुणा, या मुद्द्याविषयी आवेशी राहा. गावात राहा नाहीतर शहरात राहा. एक दिशा ठरवून टाक. तुझ्या प्रभूच्या दिवसाचा अनादर करणार नाही असा निर्धार कर. "आजचा दिवस तुझ्या शरीराच्या विसाव्यासाठी गरजेचा आहे, "हा गोड वाटणारा पण लबाड वाद चालवून घेऊ नकोस. तुझ्या सभोवतालच्या लोकांचा हा कित्ता गिरवू नकोस. सोबत्यांच्या निमंत्रणाला बळी पडू नकोस — ठरवून दिलेल्या नियमापासून या कोणत्याही गोष्टी तुला परावृत्त न करोत की: *देवाचा दिवस देवालाच दिला जाईल.*

एकदा प्रभूच्या दिवसाविषयी बेफिकीर राहिलात, की शेवटी तुमच्या आत्म्याविषयी बेफिकीर राहाल. या निष्कर्षाप्रत पोहंचवणाऱ्या पायऱ्या सहजसुलभ आणि नियमित आहेत. प्रभूच्या दिवसाचा अनादर करण्याने सुरुवात करा, की लवकरच तुम्ही देवाच्या मंदिराचा अनादर करू लागाल. देवाच्या मंदिराचा आदर करणे थांबवलेत की लवकरच देवाच्या पुस्तकाचा आदर करणे थांबवाल. देवाच्या पुस्तकाचा आदर करणे थांबवलेत की हळूहळू देवाचा तुम्ही मुळीच सन्मान करणार नाही. प्रभूचा दिवस न पाळण्याचा पाया माणसाने घातला की त्याच्या घराच्या कळसाच्या शिळेवर "देव नाही" हे शब्द आढळल्यास मला आश्चर्य वाटणार नाही. सर मॅथ्यू हॅले (१६०९-१६७६) देहांत शिक्षेस पात्र अशा मोठ्या गुन्ह्याची शिक्षा ठोठावणारे न्यायाधीश होते.

त्यांचे एक लक्षणीय विधान आहे, " ते न्यायाधीशाच्या स्थानावर बसले असता देहांत शिक्षेस पात्र असल्याची खातरी पटलेल्यांपैकी फार थोडकेच आपल्या गुन्ह्याची कबुली देत नसत; बाकी असे त्यांना आढळले की चौकशी केल्यावर ते सुरुवातीला सांगत की त्यांच्या दुराचाराची सुरुवात प्रभूच्या दिवसाकडे दुर्लक्ष करण्यातून झाली.

हे तरुण मनुष्या, प्रभूच्या दिवसाचा आदर करण्याचा विसर पडलेल्या सोबत्यांच्या संगतीत तू सापडला असशील, पण देवाच्या सहाय्याने निर्धार कर की तू तो आठवणीने पवित्रपणे पाळशील. जेथे सुवार्तेची घोषणा केली जाते अशा चर्चला नियमितपणे जाण्याने या दिवसाचा आदर कर. विश्वासूपणे होणाऱ्या सेवेच्या अधीन स्थिर हो. एकदा स्थिरावलास की तुझी जागा कधीच रिकामी राहू देऊ नकोस. माझ्यावर विश्वास ठेव की महान आशीर्वाद तुझ्या मागून चालून येतील: "तू शब्बाथाची पायमल्ली करणार नाहीस, माझ्या पवित्र दिवशी आपला उद्योगधंदा करणार नाहीस, शब्बाथ आनंददिन आहे, परमेश्वराचा पवित्र व सन्मान्य दिन आहे असे म्हणून त्याचा आदर करशील, व त्या दिवशी आपले कामकाज करणार नाहीस, आपला धंदा चालवणार नाहीस, वायफळ गोष्टी बोलत बसणार नाहीस; तर तू परमेश्वराच्या ठायी हर्ष पावशील, तू देशाच्या उच्च स्थलांचे जयोत्सवाने आक्रमण करशील" (यशया ५८:१३,१४). एक गोष्ट नक्की की: तुम्ही स्वर्गाला जाण्यास पात्र आहात की नाही याची कसोटी व निकष हाच की तुमच्या प्रभूच्या दिवसाविषयीच्या भावना काय आहेत. प्रभूचा दिवस म्हणजे स्वर्गाचा सुगंध व तेथील आगामी सुखाची झलक होय. जो मनुष्य त्याला भार समजतो, आणि सुसंधी मानत नाही, त्याच्या अंत:करणाचा खात्रीने महान बदल होणे गरजेचे आहे.

इ. प्रार्थना करा

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तुम्ही कोठेही असा, तुम्ही प्रार्थना कराल असा निर्धार करा. मानवाच्या जिवाचा श्वास प्रार्थनेत आहे. प्रार्थना नसेल तर आपल्याला नावाला जीवन असेल व ख्रिस्ती म्हणून गणना होत असेल, पण देवाच्या दृष्टीने आपण मृत आहोत. देवाच्या दयेसाठी व शांतीसाठी धावा करण्याची भावना असणे हे कृपेचे लक्षण होय. आणि आपल्या जिवाच्या गरजा त्याच्यासमोर सादर करण्याची सवय आपल्याला दत्तकपणाचा आत्मा प्राप्त झाल्याच्या लक्षणाचा पुरावा आहे. आपल्या आत्मिक गरजांविषयी दिलासा मिळण्यासाठी नेमलेला मार्ग म्हणजे प्रार्थना होय. ती मोठा खजिना खुला करते आणि झरा वाहू देते. आपण *मागत नाही* तर आपल्याला *मिळणार नाही* (याकोब ४:२).

पवित्र आत्म्याचा वर्षाव आपल्या अंत:करणावर व्हावा म्हणून परिश्रम घेण्याचा मार्ग प्रार्थना होय. येशूने पवित्र आत्मा हा कैवारी पाठवण्याचे अभिवचन दिले. तो त्याची सर्व मोलवान दाने, नवीकरण, पवित्रीकरण, शुद्धीकरण, सबलीकरण, आनंद, उत्तेजन, प्रकाशित करणे, शिकवण देणे, मार्गदर्शन करणे, सत्यात चालवणे, घेऊन येण्यास तयार असतो. पण तो आपली काकुळतीची विनवणी ऐकायची वाट पाहातो.

पण आता मला दु:खाने हे सांगू द्या की येथेच मनुष्ये फार वाईट प्रकारे कमी पडतात. फार थोडे प्रार्थना करताना आढळतात — पुष्कळ लोक गुडघे टेकण्याची कृती करतात पण फारच थोडके प्रार्थना करतात, फार थोडके देवाचा धावा करतात; थोडकेच त्याच्या नावाने हाक मारतात, थोडकेच तो सापडावा म्हणून शोध घेतात; भुकेने व तहानेने व्याकुळ होऊन फार थोडके दार ठोकतात, थोडकेच मल्लयुद्ध करतात, थोडकेच देवापासून उत्तर मिळण्यासाठी प्रकर्षाने लढा देतात, फार थोडके त्याला आराम घेऊ देत नाहीत, अगदी थोडके सातत्याने प्रार्थना करतात, फार थोडे अथक अखंड प्रार्थना करतात. होय: थोडकेच प्रार्थना करतात! ही गोष्ट एक रहाटी म्हणून

गृहीत धरली जाते, पण क्वचितच आचरली जाते. ही बाब सर्वांच्या कामाची आहे, पण कोणीही ती फारशी अमलात आणत नाही.

तरुणांनो, माझ्यावर विश्वास ठेवा, जर तुमच्या जिवाचे तारण व्हायचे आहे तर तर तुम्ही प्रार्थना केलीच पाहिजे. देवाची मुले काही मुकी नाहीत. जर तुम्हाला जगाला, दैहिकतेला व सैतानाला प्रतिकार करायचा असेल (१योहान २:१६), तर तुम्ही प्रार्थना केलीच पाहिजे. आधीच शोध न घेता संकट आल्यावर आयत्या वेळी सामर्थ्य प्राप्त होण्यासाठी शोध घेण्यात काही अर्थ नाही. जे कधीच प्रार्थना करत नाहीत त्यांच्यात तुमची गणना केली जाईल. जो देवाला कधीच काही मागत नाही अशा व्यक्तीसोबत तुम्हाला झोपावे लागेल — माझ्या शब्दांकडे अजूनही लक्ष द्या, तुम्ही प्रार्थना कराच.

मी जाणतो की तुम्हाला खूप अडचणी आहेत; संधी, वेळ आणि स्थळाची अडचण. अशा मुद्द्यांवर मी काही नियम लावून देण्याचे धाडस करणार नाही. हे मी तुमच्याच विवेकभावावर सोपून देतो. परिस्थितीनुसार तुम्ही मार्ग ठरवा. आपल्या प्रभू येशूने डोंगरावर प्रार्थना केली, इसहाकाने शेतात प्रार्थना केली; हिज्कीया आपल्या बिछान्यावर पडून असता त्याने भिंतीकडे वळून प्रार्थना केली; दानीएलाने नदीकाठी प्रार्थना केली; प्रेषित पेत्राने घराच्या धाब्यावर प्रार्थना केली. माझ्या कानावर आले आहे की काही तरुणांनी तबेल्यात कडब्याच्या गंजीवर बसून प्रार्थना केली. हे सांगण्यामागचा आशय इतकाच की: "तुमचे एकांतवासात जाणे म्हणजे काय" हे तुम्हाला समजले पाहिजे (मत्तय ६:६). एक ठरलेला वेळ असला पाहिजे की तुम्ही आपल्या देवाशी समोरासमोर येऊन बोलले पाहिजे; दररोज तुम्ही ठराविक वेळी देवाशी बोलले पाहिजे. *तुम्ही प्रार्थना केलीच पाहिजे.*

याशिवाय सर्व सल्ला मसलत निरुपयोगी आहे. इफिस ६ मध्ये पौल जी शस्त्रसामग्री सांगतो, त्यात वचन १८ मध्ये प्रार्थना हे शेवटचे अस्त्र सांगितले आहे, पण त्याचे खरे तर अग्रस्थानाचे महत्त्व आहे. जर तुम्हाला जीवनाच्या अरण्यवासातील प्रवास सुखरूप पार पाडायचा असेल तर हेच ते जडान्न तुम्ही रोज खाल्ले पाहिजे. यामुळे प्राप्त होणाऱ्या ताकदीनेच तुम्ही देवाच्या डोंगराची पुढची वाटचाल करू शकाल. मी ऐकले आहे की धार लावणारा काही वेळा चुंबकाच्या तुकड्याचे अच्छादन तोंड झाकण्यास वापरतो, त्यामुळे त्याच्याभोवती उडणारे लोखंडाचे कण तो चुंबक आकर्षून घेतो, व ते कण त्याच्या फुप्फुसात जाण्यापासून अटकाव होतो व त्याचा जीव वाचतो. प्रार्थना हे अच्छादन तुम्ही सतत तुमच्या मुखावर ठेवायला हवे. अन्यथा या पापी जगाच्या रोगट वातावरणात इजा न होता काम करणे तुम्हाला अवघड होऊन जाईल. *तुम्ही प्रार्थना कराच.*

तरुणांनो, याची खात्री बाळगा: मनुष्य गुडघ्यावर जो वेळ घालवतो त्याच्या इतका उत्तम वेळ तो कशातच घालवत नसतो. तुम्हाला कितीही कामे असली तरी त्यासाठी वेळ काढा. इस्राएलांचा राजा दावीद याचा विचार करा: तो काय म्हणतो? "संध्याकाळी, सकाळी व दुपारी मी काकळुतीने आपले गाऱ्हाणे करीन आणि तो माझी वाणी ऐकेल" (स्तोत्र ५५:१७). दानीएलाचा विचार करा. संपूर्ण राष्ट्राच्या कामाची धुरा त्याच्या हाती होती तरी तो दिवसातून तीन वेळा प्रार्थना करायचा — हेच त्या दुष्ट बाबेलात सुरक्षित राहण्याचे त्याचे रहस्य होते. शलमोनाला विचारात घ्या: तो आपल्या राजवटीची सुरुवात प्रार्थनेने व देवाकडे सहाय्य मागण्याने करतो, म्हणूनच त्याची भरभराट होते. नहेम्याकडे पाहा: आपला धनी, राजा अर्तहशस्त, याच्यासमोर उभा असतानाही तो आपल्या स्वर्गीय देवाच्या सान्निध्यात जाण्यासाठी वेळ काढतो (नहेम्या २:४). या सर्व देवभीरू लोकांनी तुमच्यासमोर आपले आदर्श ठेवले आहेत, तसेच तुम्हीही करा.

प्रियांनो, देव तुम्हा सर्वांना कृपेचा व विनंत्या मांडण्याचा आत्मा देवो! "माझ्या बापा, माझ्या तारुण्यातील मार्गदर्शक तूच आहेस, असे तू आतापासून मला म्हणणार नाहीस काय?" (यिर्मया ३:४). मी आनंदाने तुम्हाला माझे हे सर्व भाषण विसरून गेलात तरी चालेल अशी परवानगी देतो, पण एवढे हे प्रार्थनेचे महत्त्व दर्शवणारे हे तत्व तुमच्या ऱ्हदयाला भिडून प्रभावी ठरू दे.

५. समारोप

या गोष्टी खऱ्या आहेत का?
आता मी घाईने आवरते घेतो. मी सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी पुष्कळांना आवडणार नाहीत आणि ते स्वीकारणारही नाहीत; पण मी तुमच्या विवेकभावाला आव्हान करतो: या गोष्टी खऱ्या नाहीत? तरुणांनो, तुम्हा सर्वांना विवेकभाव आहे. सध्या पतनामुळे भ्रष्ट होऊन धुळीस मिळालेला असा विवेकभाव आपणा प्रत्येकाला आहे. (पतन: एदेन बागेत देवाची आज्ञा मोडून आदाम व हव्वेने आपला मार्ग निवडला व देवाच्या कृपेच्या आशीर्वादांपासून ते पापाच्या गुलामगिरीत गेले). आपल्या प्रत्येकाच्या ऱ्हदयाच्या कोपऱ्यात देवाचा एक साक्षीदार असतो — तो साक्षीदार आपण चूक केल्यावर आपल्याला दोषी ठरवतो आणि योग्य ते केल्यावर त्याला मान्यता देतो. त्या साक्षीदाराला मी आज एक विचारणा करतो की: *मी ज्या गोष्टी बोलत आहे, त्या खऱ्या नाहीत का?*

तर मग तरुणांनो, जा, आणि आज निर्धार करा की तुमच्या तारुण्याच्या दिवसात तुम्ही आपल्या निर्माणकर्त्याला ओळखाल. कृपेचे दिवस सरण्यापूर्वी, वय जाता जाता तुमचा विवेकभाव कठीण होण्यापूर्वी व सतत तुडवण्याने मृतवत् होण्यापूर्वी — तुम्हाला वेळ आहे, शक्ती आहे, आणि संधी आहे तोच — जा, व विस्मरणात न जाणाऱ्या सार्वकालिक कराराने तुमच्या प्रभूशी जडा. आत्मा सतत गळ घालत राहणार नाही. विवेकभावाचा आवाजही तुम्ही दर वर्षी प्रतिकार करत राहिल्याने अस्पष्ट व अगदी मंद होत जाईल. अथनैकर पौलाला म्हणाले, "याविषयी आम्ही तुझे पुन्हा ऐकू." पण तेच त्यांचे शेवटचे ऐकणे ठरले (प्रे.कृ.१७:३२). घाई करा. विलंब लावू नका. रेंगाळत दिरंगाई करत राहू नका.

इतरांना समाधान
जर तुम्ही माझा सल्ला ऐकलात तर आपले पालक, आप्तजन व मित्र परिवाराला तुम्ही किती *अवर्णनीय समाधान द्याल* याचा विचार करा. तुम्हाला आता तुम्ही जे आहात तेथवर आणून तुम्हाला घडवण्यात त्यांनी किती वेळ, पैसा, आरोग्य खर्ची घातले! तुमच्याकडून काही तरी विचार झालेला पाहण्यास ते पात्र आहेत. तरुणांना त्यांच्या सामर्थ्याने मिळणाऱ्या आनंद व सुखाला कोण मानतात? एसाव (उत्पत्ती २५-२७), हफनी व फिनहास (१ शमुवेल १-४), व अबशालोम (२ शमुवेल १३) या पुत्रांमुळे होणाऱ्या यातना व दु:खाचे कारण कोण सांगू शकेल? शलमोनाचे बोल किती खरे आहेत, "मुलगा शहाणा तर बाप सुखी; मुलगा मूर्ख तर आई दु:खी" (नीति. १०:१). अरे, या गोष्टींवर विचार करा आणि आपली अंत:करणे प्रभूला द्या. अनेकांप्रमाणे तुमचेही तारुण्य घोडचुका करण्यात गेले, तुमचा मर्दपणा संघर्ष करण्यात गेला, आणि तुमच्या वृध्दापकाळाचे दिवस दु:खात गेले असे म्हटले जाऊ नये.

सत्कृत्ये करण्याची साधने
जगासाठी काही *चांगले करण्याकरता तुम्ही उत्तम साधन कसे होऊ शकता, यावर विचार करा.* बहुतेक सर्व विख्यात संतांनी देवाला प्राप्त करून घेण्याची खटपट लहान वयातच केली. मोशे,

शमुवेल, दावीद, दानीएल — या सर्वांनी आपल्या तारुण्यातच प्रभूची सेवा केली. तरुण सेवकांचा सन्मान करण्यात देवही विशेष आनंद मानतो. लक्षात ठेवा, इंग्लंडचा तरुण राजा ६ वा एडवर्ड याचा देवाने सन्मान केला. मग आपल्या काळातील तरुणांनी त्यांच्या जीवनाच्या बहराच्या काळात आपली जीवने देवाला समर्पित केली तर त्यांच्याविषयी देखील आपण खात्रीपूर्वक अशीच अपेक्षा का बाळगू नये? प्रत्येक महान व चांगल्या कामासाठी प्रतिनिधींची गरज असते आणि त्यासाठी योग्य माणसे मिळत नाहीत. सत्याच्या प्रसारासाठी लागणारी सर्व यंत्रणा आहे, पण त्यावर काम करणारे हातच उपलब्ध नाहीत. पैसा सहज, भरपूर उपलब्ध होऊ शकतो, पण माणसे मिळत नाहीत. नवीन मंडळ्यांसाठी सेवक हवेत, नवीन ठाण्यांसाठी मिशनरी हवेत, दुर्लक्षित जिल्ह्यांना भेटी द्यायला लोक हवेत, नवीन शाळांसाठी शिक्षक हवेत. अनेक चांगल्या कारणांसाठी लागणाऱ्या प्रतिनिधींची गरज भागत नसल्याने सर्व काम ठप्प आहे. देवभीरू, विश्वसनीय, विश्वासू लोकांद्वारे वर नमूद केलेल्या पदांसाठी पुरवठा होणे गरजेचे आहे. वरील अपेक्षेपेक्षा मागणी मोठी आहे.

या काळातील तरुणांनो, *देवाला तुम्ही हवे आहात.* हे वय विशेषत: कार्यरत राहण्याचे आहे. आम्ही पूर्वीचा स्वार्थ झटकून टाकत आहोत. वाडवडिलांप्रमाणे आळस व उदासीनतेने झोपून राहून पुरुष आता इतरांविषयी बेफिकिरी दाखवत नाहीत. त्यांना काइनाप्रमाणे "मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे? " (उत्पत्ती ४:९), असे म्हणण्याची लाज वाटायला लागली आहे. तुमच्यापुढे उपयोगी पडण्याचे मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. फक्त त्यात शिरकाव करण्याची तुमची इच्छा हवीय. पीक फार आहे, पण कामकरी थोडे आहेत (लूक १०:२). सत्कर्मांसाठी आवेशी असा. या, सर्वसमर्थ देवाच्या कामाच्या कारणास्तव या. हे काही प्रमाणात देवाप्रमाणे केवळ "चांगले असणे नव्हे तर चांगली कामे करणे"(स्तोत्र ११९:६८) देखील आहे. तुम्ही असे तुमच्या तारणाऱ्या प्रभूच्या पावलांवर पाऊल टाकून चालायचे आहे." तो सत्कर्मे करीत फिरत असे" (प्रे.कृ. १०:३८). असे राहणे म्हणजे दाविदाप्रमाणे राहणे होय "त्याने आपल्या पिढीत देवाच्या इच्छेप्रमाणे सेवा केली" (प्रे. कृ. १३:३६).

मग अविनाशी आत्म्याचा हाच मार्ग असल्याविषयी कोणाला शंका राहील? यहोरामाप्रमाणे सर्वांस अप्रिय होऊन हे जग सोडण्यापेक्षा (२ इतिहास २१:२०), योशीयाप्रमाणे सर्व आपल्यासाठी शोक करतील, असे मरणे कोणाला आवडणार नाही? काय चांगले आहे? — आळशी, नीच, खायला काळ अन् भुईला भार ठरणारा निरुपयोगी भारवाहक; आपल्याच शरीरसुखासाठी, आपल्याच स्वार्थासाठी, आपल्याच वासनांसाठी, आपल्याच गर्वासाठी जगणारा की — आपल्या सहकाऱ्यांना उपयोगी पडण्यासाठी गौरवी कारणांकरता खर्च करणारा व खर्ची पडणारा: म्हणजे १७५९-१८३३ मधील विल्बरफोर्ससारखे व्हा (तो परोपकारी, मुत्सद्दी राजकारणी होता. त्याने ब्रिटनमधील गुलामांचा व्यापार बंद करण्यास खूप परिश्रम केले, व अखेर त्यात यशस्वी झाला.) किंवा १८०१-१८८५ मधील ॲन्थनी शॅफ्ट्सबरी सारखे व्हा. (या देवाच्या माणसाने इंग्लंडमधील अनेक अमानवी अत्याचारांच्या प्रथा घालवून सुधारणा करण्यास स्वत:ला बांधून घेतले होते.) तुमच्या देशाला व जगाला आशीर्वाद व्हा. किंवा १७२६-१७९० मधील जॉन हॉवर्डसारखे व्हा (तो इंग्रज परोपकारी व तुरुंगात सुधारणा करणारा वकील होता. त्याने तुरुंगाची अमानवी स्थिती सुधारण्यास व सर्वांसमोर आणण्यास आपले जीवन समर्पित केले होते.) तो कैद्यांचा व बंदीवानांचा मित्र होता. किंवा तुम्ही १७२६-१७९८ मध्ये होऊन गेलेल्या ख्रिश्चन श्वार्टझ सारखे पण होऊ शकता. (जर्मनीहून दक्षिण भारतात येऊन त्याने मिशनरी म्हणून ४० हून अधिक वर्षे सेवा केली. पुष्कळ मंडळ्या व शाळांची स्थापना केली.) विदेशांच्या भूमीत तो शेकडो अविनाशी जिवांचा आध्यात्मिक पिता बनला. नाहीतर तुम्ही रोबर्ट मरे मॅकेन या देवाच्या माणसासारखे व्हा. (१८१३-१८४३ मध्ये १९व्या शतकात तो अत्यंत देवभीरू स्कॉटिश पाळक

होऊन गेला. तो २९व्या वर्षी मरण पावला.) तो प्रकाश देणारा पेटता दीप, सर्व मनुष्यांकडून वाचले जाणारे ख्रिस्ताचे पत्र, मार्गात येणाऱ्या प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीच्या ऱ्हदयाला चैतन्य देणारा होता. अशांविषयी कोण शंका घेईल? कोण क्षणभर तरी शंका घेईल?

तरुणांनो आपल्या जबाबदाऱ्यांविषयी विचार करा. सत्कर्मे करण्यातील सुसंधी व सुखदायी जीवनाचा विचार करा. आजच उपयोगी पडण्याचा निर्धार करा. ताबडतोब आपले ऱ्हदय ख्रिस्ताला द्या.

तुमच्या स्वत:च्या जिवाला आनंद
शेवटी, जर तुम्ही देवाची सेवा केली तर केवढा *आनंद* तुमच्या जिवाला मिळेल, याचा विचार करा — जीवनाची वाटचाल करताना आनंद, आणि यात्रेकरूचा हा प्रवास संपल्यावर शेवटीही आनंदच. काहीही व्यर्थ कल्पना तुमच्या कानावर पडल्या असतील तरी माझ्यावर विश्वास ठेवा; माझ्यावर विश्वास ठेवा की धार्मिकाला या जगातही प्रतिफळ मिळते. खरोखर देवभीरूपणाला या जीवनासाठी देवाचे अभिवचन आहेच आणि पुढील काळासाठीही आहे. देव तुमचा मित्र आहे या भावनेत प्रचंड शांती आहे. तुमची अपात्रता कितीही मोठी असली तरी तुम्ही ख्रिस्तामध्ये पूर्ण आहात, याची जाणीव असण्यात खरे समाधान आहे ते — हे की तुम्हाला चिरकालिक वाटा आहे, आणि तुम्ही चांगला वाटा निवडून घेतला असून तो तुमच्याकडून कदापि काढून घेतला जाणार नाही (लूक १०:४२).

माघार घेऊन पतन पावलेल्याच्या अंत:करणात त्याचेच मार्ग भरलेले असतात; "पण सत्पुरुष आपल्या ठायी तृप्त असतो." (नीति १४:१४). जगिक मनुष्याची आयुष्याची वर्षे एकामागून एक जात असता ती अधिकाधिक काळोखाची होत राहतात; पण ख्रिस्ती मनुष्याची वाट झळाळत्या प्रकाशझोतासारखी अखेरपर्यंत अधिकाधिक तेजस्वी बनत जाते. जेव्हा जगिक लोक त्याच्या हातातून निसटत चाललेले असतात व मरत असतात, व जगाचा सूर्य त्यांच्यासाठी कायमचा मावळत असतो तेव्हा त्याचा सूर्य नुकताच उगवत असतो.

तरुणांनो, ह्या गोष्टी सत्य आहेत. या बोधाच्या शब्दांचा अनुभव घ्या. त्यांचा पिच्छा पुरवा. वधस्तंभ घ्या आणि ख्रिस्ताला अनुसरा. *देवाला शरण जा.*

प्रश्नावली

वैयक्तिक उजळणी व गटात्मक चर्चेसाठी

तुम्हाला प्राप्त झालेले ज्ञान अधिक भक्कम होण्यासाठी व तुमच्या लागूकरणासाठी खालील प्रश्नांची रचना केली आहे.

या पुस्तकातील सर्व मुद्द्यावर मार्गदर्शनासाठी निराळी अभ्यासपुस्तिका उपलब्ध आहे (only in English). तुम्ही पत्रद्वारा, स्वतंत्रपणे वैयक्तिक किंवा गटातही अभ्यास करू शकता. त्यासाठी वेबसाईट आहे school@mountzion.org.

१. वाईट सवयी आपल्या कल्याणाला का आणि कशा अडखळण ठरतात?
२. अ. आपल्याला बहकवण्यासाठी सैतान कशा कुयुक्त्या योजतो, ते सारांशाने सांगा.
   ब. सैतान कसा " शक्तिशाली," "अस्वस्थ" व चतुर आहे याचे वर्णन करा.
३. गर्विष्ठ वर्तनक्रमाचे वर्णन करा.
४. "दैहिक वासनांचा" जिवाशी कसा लढा चालतो?
५. सुखसौख्ये "अधिकृत" व "प्रमाणात" का असली पाहिजेत? हे आपण कसे करावे?
६. अ. बायबल कसे विश्वसनीय आहे?
   ब. काही लोक बायबलचा अधिकार का मानत नाहीत?
७. अ. बायबलनुसार असलेल्या पापाच्या परिणामांचे वर्णन करा.
   ब. पापाने आपल्या स्वभावात घडवून आणलेल्या भयानक बदलाचे वर्णन करा.
८. लोक ख्रिस्ताकडे न येण्याची काही कोणती कारणे देतात? त्या प्रत्येकाला बायबल काय उत्तर देते?
९. बायबल वाचणे याचा अर्थ काय?
   अ. "प्रार्थनापूर्वक"? ब. "आदराने"? क. "नियमितपणे"?
१०. जेरेमी टेलर यांनी जीवनात हळूहळू पाप कसे वाढत जाते याविषयी दिलेल्या पायऱ्यांची यादी करा.
११. अ. "कृपेची साधनसामग्री" याचा अर्थ काय?
   ब. प्रार्थनेचे फायदे कोणते?
१२. या संदेशात ज्ञानाचे अनेक बोध आहेत. तुम्हाला सर्वाधिक कोणता उठून दिसतो? *(विशेषत: दुसऱ्या प्रकरणाच्या प्रत्येक विभागाचा शेवट पाहा, व तिसऱ्या व चौथ्या प्रकरणांचे प्रमुख मथळे लक्षात घ्या.)*
१३. या संदेशाशी संबंधित खालील प्रत्येक वचनाचा अर्थ काय?
   अ. रोम. १२:३
   ब. कलसै. ३:१२
   क. १ करिंथ १०:१३